इचलकरंजी ICHALKARANJI ▸ वर्ष - ४१ ▸ अंक - २९६ ▸ शनिवार,ता.२८ फेब्रुवारी २०२६ ▸ पाने १२
इचलकरंजी आर.एन.आय.रजि.नं.63119/94 ▪ पोस्टल रजि.नं. KLR/78/ 2024-2026

### रोहित पवारांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

**मुंबई,ता.२७–**

राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत नेते माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताप्रकरणी आमदार रोहित पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही भेट घेतली. यावेळी पवार यांनी चौकशीत पारदर्शकता यावी, दादांचे देवगिरी बंगल्यावर स्मारक व्हावे, सुदीप जाधव यांच्या पत्नीला नोकरीत कायम या प्रमुख तीन मागण्या केल्या आहेत. दरम्यान गुन्हा दाखल करण्याबाबत काही पोलीस अधिकाऱ्यांशी चर्चा करुन तांत्रिक अडचणींबाबत काय आहे हे समजून घेतो, असे आश्वासन मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्याची माहिती आहे.

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर – सांगली – सातारा – बेळगांव

### अवैध प्रवासी वाहतूक रोखा–सरनाईक

**मुंबई,ता.२७–**

राज्यभरात वाढत चाललेल्या अवैध प्रवासी वाहतुकीमुळे सार्वजनिक सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असून कायदेशीर वाहतूक व्यवस्थेलाही मोठा फटका बसत आहे. परवाना, फिटनेस प्रमाणपत्र, विमा किंवा नियमानुसार परवानगी नसताना प्रवासी ने-आण करणाऱ्या वाहनांमुळे अपघातांचा धोका वाढत असून प्रवाशांचे जीव धोक्यात येत आहेत. अशा अवैध प्रवासी वाहतूकीवर निर्बंध आणावेत त्यासाठी १ मार्चपासून राज्यभर प्रभावी मोहीम राबवावी असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मोटार परिवहन विभागाला (आरटीओ) दिले.

www.emahasatta.com | e-mail : mahasatta@gmail.com | mahasattaadvt@gmail.com | किंमत ₹ ५.००

# मद्य घोटाळ्यातून केजरीवाल, सिसोदियांची निर्दोष मुक्तता

## 'आम आदमी'ला संपवण्यासाठी भाजपाचे षडयंत्र–केजरीवाल


निकालावर प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया देताना अरविंद केजरीवाल शेजारी मनिष सिसोदिया.

**नवी दिल्ली,ता.२७–**

**दिल्लीच्या अत्यंत वादग्रस्त अबकारी धोरण प्रकरणात राऊस अव्हेन्यू न्यायालयाने महत्त्वपूर्ण निकाल देत दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल तसेच त्यांचे निकटवर्तीय सहकारी मनिष सिसोदिया यांना सर्व आरोपांतून निर्दोष मुक्त केले.**

न्यायालयाने स्पष्ट शब्दांत नमूद केले की,केवळ आरोप किंवा दावे पुरेसे नसतात.आरोपांना ठोस आणि ठोस पुराव्यांची साथ असणे अत्यावश्यक आहे.तपास यंत्रणेकडून सादर करण्यात आलेले पुरावे कमकुवत आणि अपुरे असल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने दोन्ही नेत्यांना क्लीन चिट दिली.

या प्रकरणात सर्वप्रथम उत्पादन शुल्क विभागाचे माजी आयुक्त कुलदीप सिंग यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली.त्यानंतर मनिष सिसोदिया यांना दिलासा देण्यात आला आणि अखेरीस अरविंद केजरीवाल यांनाही सर्व आरोपांतून मुक्त करण्यात आले.न्यायालयाने आपल्या आदेशात नमूद केले की,संवैधानिक किंवा सार्वजनिक पदावर (पान २ वर)

# अफगाणच्या हल्ल्यात पाकचे ५५ सैनिक ठार

**इस्लामाबाद,ता.२७–**

**अफगाणिस्तानकडून झालेल्या हल्ल्यानंतर पाकिस्तानने उघड युद्धाची घोषणा केली आहे. पाकिस्तानी सैन्याने अफगाणिस्तानातील कंदहार आणि काबूलसह अनेक प्रमुख शहरांवर बॉम्बहल्ले केले. सुमारे दोन तास चाललेल्या या हवाई कारवाईत पाकिस्तानने १३३ अफगाण लढवय्ये ठार केल्याचा दावा केला आहे. तर, तालिबानचे प्रवक्ते जबीहुल्लाह मुजाहिद यांनी या हल्ल्यात ५५ पाकिस्तानी सैनिक मारल्याचा दावा केला आहे. दरम्यान, पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांनी सोशल मीडियावर तालिबानला कठोर इशारा देत त्यांना भारताचा मोहरा असल्याचा आरोप केला.**

आपल्या 'एक्स' पोस्टमध्ये अफगाणिस्तानला इशारा देताना संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांनी उघड युद्धाची घोषणा केली. त्यांनी धमकीच्या सुरात म्हटले की, आमच्या संयमाचा अंत झाला आहे. आता तुमच्यात आणि आमच्यात खुले युद्ध सुरू झाले आहे. आता दमा-दम मस्त कलंदर होईल. ते पुढे म्हणाले की, पाकिस्तानचे सैन्य समुद्रापारून आलेले नाही. आम्ही तुमचे शेजारी आहोत आणि तुमच्या प्रत्येक लहान-मोठ्या हालचालीची आम्हाला माहिती आहे. तालिबानविषयी आपल्या पोस्टमध्ये संरक्षणमंत्र्यांनी (पान २ वर)



### पाकचे फायटर जेट पाडल्याचा दावा

**तालिबानने दावा केला आहे की. त्यांनी पाकिस्तानचे अमेरिकन बनावटीचे एफ–१६ लढाऊ विमान पाडले आहे. अफगाणिस्तानने सोशल मीडियावर जळत असलेल्या एफ–१६ विमानाच्या अवशेषांचा व्हिडिओ शेअर केला आहे. व्हिडिओमध्ये विमानाच्या मागील भागावर पाकिस्तानी ध्वज दिसत असून त्यावर '८५५१०' हा सिरीयल नंबरही स्पष्टपणे लिहिलेला दिसत आहे. मात्र, या व्हिडिओच्या सत्यतेची स्वतंत्रपणे पुष्टी करण्यात आलेली नाही.**

# राज्य बँक घोटाळाप्रकरणी सुनेत्रा पवार यांना दिलासा

**मुंबई,ता.२७(प्रतिनिधी)–**



**उपमुख्यमंत्रीपदी आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांना महाराष्ट्र राज्य सहकारी बँक घोटाळा प्रकरणात मुंबई हायकोर्टाने मोठा दिलासा दिला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने आर्थिक गुन्हे शाखेचा क्लोजर रिपोर्ट स्वीकारला आहे.**

अजित पवारांच्या अकाली निधनानंतर

## न्यायालयाने क्लोजर रिपोर्ट स्वीकारला

उपमुख्यमंत्रीपदी विराजमान झालेल्या आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार सध्या राज्यासह, पक्षाची सूत्रं हातात घेत आहेत. यादरम्यान त्यांच्यासमोर अनेक आव्हान असून, हे अडथळे पार करत पुढील वाटचाल करत आहेत. यादरम्यान त्यांना एक मोठा दिलासा मिळाला आहे. मुंबई हायकोर्टाने त्यांना मोठा दिलासा दिला आहे. हा दिलासा त्यांना शिखर (पान २ वर)

# जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष निवड १७ मार्चला

**कोल्हापूर ता.२७ (प्रतिनिधी)**

**कोल्हापूर जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्षांची निवड १७ मार्च २०२६ रोजी होणार असून, जिल्ह्यातील बारा पंचायत समित्यांच्या सभापती व उपसभापतींची निवड १० मार्च रोजी पार पडणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून २७ फेब्रुवारी रोजी निवड कार्यक्रम जाहीर करण्यात आला.**

## पंचायत समिती सभापती निवड १० मार्चला होणार

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुका ७ फेब्रुवारी रोजी पार पडल्या होत्या, तर ९ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर झाले. मात्र, अध्यक्ष-उपाध्यक्ष व सभापती निवडीचा कार्यक्रम जाहीर न झाल्याने सदस्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली होती. दरम्यान, दोन दिवसांपूर्वी (पान २ वर)



# लढाऊ हेलिकॉप्टर 'प्रचंड'मधून उड्डाण करणाऱ्या मुर्मू पहिल्या राष्ट्रपती


## कॉकपिटमधून देशाला संदेश, शूर सैनिकांना शुभेच्छा

**जयपूर,ता.२७–**

**राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शुक्रवारी राजस्थानमधील जैसलमेर येथे स्वदेशी हलक्या लढाऊ हेलिकॉप्टर 'प्रचंड'मध्ये उड्डाण केले. भारत–पाकिस्तान सीमेच्या जवळ 'प्रचंड'मध्ये सह–पायलट म्हणून उड्डाण करत त्यांनी इतिहास रचला. स्वदेशी लढाऊ हेलिकॉप्टरमध्ये सह–पायलट म्हणून उड्डाण करणाऱ्या त्या पहिल्या राष्ट्रपती ठरल्या आहेत.**

एलसीएच 'प्रचंड'ने जैसलमेर येथील भारतीय वायुदल (आयएएफ) स्थानकावरून उड्डाण केले. उड्डाणापूर्वी कॅप्टनने राष्ट्रपतींना आवश्यक माहिती दिली.ऑलिव्ह–हिरव्या रंगाचा गणवेश आणि हेल्मेट परिधान करून त्यांनी कॉकपिटमधून हात हलवून (पान २ वर)

**एलसीएच 'प्रचंड' हे भारताचे पहिले स्वदेशी डिझाईन आणि विकसित केलेले लढाऊ हेलिकॉप्टर आहे. याची निर्मिती हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड– एचएएल यांनी केली आहे. प्रगत एव्हिऑनिक्स, स्टेल्थ वैशिष्ट्ये,रात्रीच्या हल्ल्याची क्षमता तसेच एअर–टू–ग्राऊंड आणि एअर–टू–एअर क्षेपणास्त्रे, रॉकेट्स आणि वीस मिमी तोफसारख्या अत्याधुनिक शस्त्रसज्जतेमुळे एलसीएच भारतीय वायुदलाची युध्दक्षमता लक्षणीयरीत्या वाढवतो.**



### प.बंगालला भूकंपाचा धक्का

**कोलकाता,ता.२७–**

**शुक्रवारी दुपारी पुन्हा एकदा संपूर्ण बंगालला जोरदार भूकंपाचे धक्के जाणवले.कोलकाता आणि आसपासच्या जिल्ह्यांमध्ये दुपारी जोरदार भूकंपाचे धक्के जाणवले.अचानक झालेल्या भूकंपामुळे लोक घाबरले आणि घरे आणि कार्यालये सोडून रस्त्यावर आले.**

प्राथमिक (पान २ वर)

# बांगलादेशी नागरिकाला जन्म प्रमाणपत्र? चौकशीची मागणी

**कोल्हापूर,ता.२७(प्रतिनिधी)**



**भाजप नेते यांनी किरीट सोमय्या शुक्रवारी कोल्हापूर दौऱ्यात जिल्हाधिकारी अमोल येडगे यांची भेट घेऊन जिल्ह्यातील एका गावात कथित बांगलादेशी नागरिकाला जन्म प्रमाणपत्र दिल्याच्या आरोपाबाबत चौकशीची मागणी केली. त्यांच्या या दौऱ्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.**

कोल्हापुरात भाजप जिल्हा कार्यालयात सोमय्या यांनी पत्रकार परिषद घेतली. त्यानंतर त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेत विविध मुद्द्यांवर चर्चा केली. विशेषत: बांगलादेशी नागरिकांच्या संदर्भातील नोंदी आणि जन्म माणपत्रांबाबत त्यांनी प्रशासनाकडे

### किरीट सोमय्या यांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली

माहिती मागवली. महाराष्ट्रात आतापर्यंत सुमारे तीन लाख जन्म प्रमाणपत्रे देण्यात आली होती, त्यापैकी काही प्रमाणपत्रे रद्द करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. नवी पनवेल येथे दोन महिन्यांत दोन हजार जन्म प्रमाणपत्रे देण्यात (पान २ वर)

# कोल्ह्याच्या हल्लात दहाजण जखमी

### मसुचीवाडीतील घटना

**वाळवा,ता.२७(प्रतिनिधी)–**

**वाळवा तालुक्यातील मसुचीवाडी येथे भरदिवसा कोल्ह्याने धुमाकूळ घालत तब्बल दहा जणांवर हल्ला केल्याची घटना घडली आहे.**

मसुचीवाडी–जुनेखेड रोडवरील भावंडा परिसरात हा प्रकार घडला असून, महिलांसह पुरुषांचा जखमींमध्ये समावेश आहे. या घटनेमुळे मसुचीवाडी, जुनेखेड व नवेखेड परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गाव परिसरात दबा धरून बसलेल्या (पान २ वर)

| रमजान – १० | |
|---|---|
| इफ्तारी | ०६-४५ |
| सहरी | ०५-३१ |

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
|---|---|
| १५९५०० रु. | २६८००० रु. |

अंडी ५४५ रुपये शेकडा

### हास्यतुषार –सुरेंद्र दास



सभागृहात मराठी दिनाच्या कार्यक्रमाला अनेकांची दांडी हेच का यांच मराठी भाषेवरच प्रेम..!

# आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या सनदी अधिकाऱ्यावर कारवाई

**मुंबई,ता.२७(प्रतिनिधी)–**

**राज्याच्या पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांनी माहिती देण्यासाठी बोलावलेल्या बैठकीत येण्यास स्पष्ट नकार देणाऱ्या आयएएस अधिकारी एम देवेंद्र सिंग यांच्यावर अखेर निलंबनाची कुऱ्हाड कोसळली आहे.**

तालिका अध्यक्ष दिलीप लांडे यांनी काल दिलेल्या आदेशानंतर अवघ्या २४ तासांत ही कडक कारवाई करण्यात आली आहे. नियमांचे उल्लंघन आणि मंत्र्यांच्या आदेशाचा अवमान केल्याचा ठपका ठेवत सामान्य प्रशासन विभागाने हे आदेश जारी केले आहेत.

पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांनी एका महत्त्वाच्या विषयावर चर्चा करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक बोलावली होती. या बैठकीला उपस्थित राहून माहिती देणे अपेक्षित असताना, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव असलेल्या एम देवेंद्र सिंग यांनी बैठकीस येण्यास नकार दिला.

एका आयएएस दर्जाच्या अधिकाऱ्याने थेट मंत्र्यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवल्याने विधानसभेतही याचे तीव्र पडसाद उमटले. २०११ च्या बॅचचे अधिकारी (पान २ वर)

# काँग्रेसच भाजपला सक्षम पर्याय

## २०२९ साली देशात काँग्रेसची सत्ता–सपकाळ

**मुंबई,ता.२७(प्रतिनिधी)**

**काँग्रेस पक्ष देशात व राज्यात एक सक्षम विरोधी पक्ष म्हणून काम करत आहे. काँग्रेस हाच भाजपला पर्याय आहे. आगामी काळात काँग्रेस पक्षाची ताकद आणखी वाढेल, त्यासाठी जोमाने काम करा. २०२९ साली देशात काँग्रेसची सत्ता येईल, असा विश्वास महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केला.**

काँग्रेसच्या कोकण विभागातील लोकप्रतिनिधींच्या तीन दिवसीय निवासी कार्यशाळेचा शुभारंभ प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या हस्ते शुक्रवारी चिपळूणच्या धवल घाग व्यापारी संकुल येथे झाला. यावेळी माजी खासदार हुसेन दलवाई, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन ॲड गणेश पाटील, माजी आ. हुस्नबानो खलिफे, प्रदेश काँग्रेसच्या प्रशिक्षण विभागाचे प्रमुख आशुतोष शिर्के, रत्नागिरी उत्तर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षा सोनललक्ष्मी घाग, ज्येष्ठ नेते रमेश कीर, प्रदेश उपाध्यक्ष आबा दळवी, प्रदेश सरचिटणीस गुरबिंदर सिंग बच्छर, शशांक बावचकर, ॲड. श्रद्धा ठाकूर, रत्नागिरी जिल्हा समन्वयक सुरेश कातकर यांच्यासह प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, या प्रशिक्षण कार्यशाळेत तीन दिवस विविध विषयांवर विचार मंथन केले जाणार आहे. कोकण विभागात काँग्रेस पक्ष संघटना मजबूत करण्यावर भर दिला जाणार आहे. नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला कोकणात अपेक्षित यश मिळाले नसले तरी सरकारी यंत्रणांचा गैरवापर, दडपशाही, पैशाचा मोठ्या प्रमाणात वापर अशा विपरीत परिस्थितीत काँग्रेस कार्यकर्त्यांनी मोठ्या निर्धाराने लढा दिलेला आहे. (पान २ वर)

हार्दिक शुभकामनाए..!



आदरणीय मा.श्री. संजूभाऊ को उनके ६१ वे जन्मदिन की हार्दिक शुभकामनाए !

मा.श्री. संजूभाऊ घोडावत

◆ पिंकी प्रमोद बरडिया ◆
कुसुम बेडशीटस ॲण्ड फर्निशिंग्ज
राजघराना सारीज ॲण्ड ड्रेसेस

## (पान १ वरून)

## मुर्मू पहिल्या राष्ट्रपती

उपस्थितांना अभिवादन केले.भारतीय सशस्त्र दलांच्या सर्वोच्च कमांडर या नात्याने राष्ट्रपतींनी उड्डाणादरम्यान कॉकपिटमधून देशाला संदेशही दिला.त्या म्हणाल्या, प्रचंड हेलिकॉप्टर आत्मनिर्भरतेचे प्रभावी प्रतीक आहे.सध्या मी जैसलमेर जिल्ह्यावरून उड्डाण करत आहे.आपल्या शूर सैनिकांना मी मनःपूर्वक शुभेच्छा आणि कृतज्ञता व्यक्त करते. तुम्हाला माझा सादर सलाम. जय हिंद, जय भारत. हे उड्डाण सुमारे २५ मिनिटे चालले. हेलिकॉप्टर पोखरण फायरिंग रेंज वरून गेले. जिथे भारतीय वायुदल संध्याकाळी 'वायु शक्ती' या अग्निशक्ती प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.यापूर्वी वायुदलप्रमुख एअर चीफ मार्शल ए. पी. सिंह यांनी जैसलमेर वायुदल स्थानकावर त्यांचे स्वागत केले.आजच्या उड्डाणासह राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आक्रमक हेलिकॉप्टरमध्ये उड्डाण करणाऱ्या पहिल्या भारतीय राष्ट्रपती ठरल्या आहेत. अग्रिम मोर्चावरील लष्करी प्लॅटफॉर्मशी उच्चस्तरीय सहभागाच्या मालिकेतील ही आणखी एक महत्त्वपूर्ण कामगिरी आहे. त्यांनी गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये अंबाला येथील वायुदल स्थानकावर डसॉल्ट राफेल (राफेल लढाऊ विमान) मध्ये उड्डाण केले होते. त्यामुळे भारतीय वायुदलाच्या दोन वेगवेगळ्या लढाऊ विमानात उड्डाण करणाऱ्या त्या पहिल्या राष्ट्रपती ठरल्या.एप्रिल २०२३ मध्ये त्यांनी आसाम मधील तेजपूर वायुदल स्थानकावर सुखोई-३० एमकेआय लढाऊ विमानात सुमारे ३० मिनिटांचे उड्डाण केले होते. या दरम्यान त्यांनी ब्रह्मपुत्रा आणि तेजपूर खोऱ्यावरून उड्डाण करत हिमालयाचे विहंगम दृश्य अनुभवले होते.

## पाकचे ५५ सैनिक ठार

म्हटले की, नाटो सैन्य माघारी गेल्यानंतर अफगाणिस्तानात शांतता प्रस्थापित होईल आणि तालिबान अफगाण जनतेच्या हितासाठी तसेच प्रादेशिक शांततेसाठी काम करेल, अशी अपेक्षा होती. मात्र त्यांनी आरोप केला की तालिबानने जगभरातील दहशतवाद्यांना अफगाणिस्तानात आश्रय दिला आणि दहशतवादाचा प्रसार सुरू केला. त्यांनी स्वतःच्या नागरिकांना मूलभूत मानवी हक्कांपासून वंचित ठेवले आणि महिलांना इस्लामने दिलेले अधिकार हिरावून घेतले.

पाकिस्तानने काबूल आणि कंदहारसह अफगाणिस्तानातील प्रमुख शहरांवर हवाई हल्ले केले, ज्यामुळे तालिबान सरकारकडून प्रत्युत्तरात्मक कारवाई सुरू झाली.अफगाण सैन्याने सीमापार पाकिस्तानी सैनिकांवर हल्ले केल्याचा दावा केला असून, हे आधीच्या घातक हवाई हल्ल्यांना दिलेले प्रत्युत्तर असल्याचे सांगितले. काबूलने दावा केला की ड्युरंड रेषेजवळ चार तास चाललेल्या कारवाईत ५५ पाकिस्तानी सैनिक ठार झाले. दोन तळ आणि १९ चौक्यांवर ताबा मिळवण्यात आल्याचेही सांगितले. तालिबान सरकारने म्हटले की, नंगरहारमधील एका निर्वासित छावणीवर झालेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यात आठ अफगाण लढवय्ये ठार झाले आणि ११ जखमी झाले. तसेच १३ नागरिक जखमी झाल्याचा आरोप करण्यात आला.मात्र पाकिस्तानने या आकडेवारीला आक्षेप घेतला. माहितीमंत्री अत्ताउल्लाह तरार यांनी केवळ दोन पाकिस्तानी सैनिक ठार झाले आणि तीन जखमी झाल्याचे सांगितले. वृत्तानुसार, इस्लामाबादने किमान १३३ अफगाण लढवय्ये ठार आणि २०० हून अधिक जखमी झाल्याचा दावा केला असून २७ अफगाण चौक्या नष्ट करून नऊवर ताबा मिळवल्याचे म्हटले आहे.

## प.बंगालला भूकंपाचा धक्का

माहितीनुसार, भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ४.९ ते ५ च्या दरम्यान होती.अनेक मोबाईल अलर्टमध्ये त्याची तीव्रता पाच इतकी नोंदवण्यात आली. उंच इमारतींमध्ये राहणाऱ्या लोकांना जोरदार भूकंपाचे धक्के जाणवले.हा धक्का सुमारे एक मिनिट जाणवला. भूकंप फक्त बंगालपुरता मर्यादित नव्हता तो शेजारच्या बांगलादेशातही जाणवला. भूकंपाचे केंद्र बांगलादेशातील खुलना प्रदेशात होते. पश्चिम बंगालमधील नादिया, हुगळी,पूर्व आणि पश्चिम मेदिनीपूर,उत्तर आणि दक्षिण २४ परगणा आणि सुंदरबनसह अनेक भागात जोरदार भूकंपाचे धक्के जाणवले. प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. भूकंपानंतर काही काळ भीतीचे वातावरण होते आणि अनेक भागात खबरदारी म्हणून लोक मोकळ्या जागेत उभे असल्याचे दिसून आले.

## बांगलादेशी नागरिकाला जन्म प्रमाणपत्र ?

आल्याचे उदाहरण देत, कोल्हापूर जिल्ह्यातील एका गावातही अशाच प्रकारे प्रमाणपत्र दिल्याची माहिती मिळाल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणाची सखोल चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी त्यांनी केली.सध्या सुरू असलेल्या मतदार यादी पुनरिक्षण कार्यक्रमाबाबतही त्यांनी प्रशासनाशी चर्चा केली. 'एकही बांगलादेशी नागरिक महाराष्ट्रात घुसखोरी करू नये आणि एकही पात्र महाराष्ट्राचा नागरिक मतदानापासून वंचित राहू नये,' यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे त्यांनी नमूद केले. याशिवाय, कोल्हापूर महापालिकेत २०२५ मध्ये झालेल्या काही नोंदींबाबत माहिती मागवली असून आठ दिवसांत तपशील मिळाल्यानंतर पुढील भूमिका मांडू, असे त्यांनी स्पष्ट केले.दरम्यान, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्यावरील भ्रष्टाचाराच्या आरोपांबाबत विचारले असता सोमय्या म्हणाले, 'माझी भ्रष्टाचारविरोधी मोहीम सुरूच आहे. भ्रष्टाचाराची प्रकरणे समोर आणणे हे माझे काम आहे. त्यानंतर संबंधित यंत्रणा आणि न्यायालयीन प्रक्रिया पुढे काम करते.'ठाकरे सरकारच्या काळात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी झाल्याचा दावा त्यांनी व्यक्त केला.

## सुनेत्रा पवार यांना दिलासा

बँक घोटाळा प्रकरणी मिळाला आहे.महाराष्ट्र राज्य सहकारी बँक घोटाळा प्रकरणी सुनेत्रा पवारांना मोठा दिलासा मिळाला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने आर्थिक गुन्हे शाखेचा क्लोजर रिपोर्ट स्वीकारला असून सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांचा आक्षेप अर्ज आणि अंमलबजावणी संचालनालयाचा हस्तक्षेप अर्ज फेटाळून लावला आहे. यामुळे दिवंगत नेते अजित पवार यांच्यासह उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, रोहित पवार यांच्यासह ७० जणांना मिळालेल्या क्लीन चीटवर आज पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. २००७ या काळात तत्कालीन संचालक मंडळाने निकष डावलून साखर कारखान्यांनी सूतगिरण्यांना कर्ज वाटप केले होते. एनपीए झालेल्या साखर कारखान्यांना पुन्हा कर्ज देऊन कर्ज न फेडल्यास कवडीमोल भावाने संचालकांच्या नातेवाईकांनी कारखाने मिळवल्याचा आरोप करण्यात आला होता. या सगळ्या प्रकरणांमध्ये अंमलबजावणी संचालनालयने कोर्टात कठोर भूमिका घेत हस्तक्षेप अर्ज टिकवण्यासाठी मोठे प्रयत्न केले होते. मात्र मुंबई हायकोर्टाने हा अर्ज फेटाळून लावल्याने आता महाराष्ट्र राज्य सहकारी बँक प्रकरणावर पडदा पडला आहे.राज्य सहकारी बँकेने २००५ ते २०१० या कालावधीत मोठ्या प्रमाणात कर्जवाटप केले होते. सहकारी साखर कारखाने, सहकारी सूत गिरण्या, कारखाने आणि काही कंपन्यांना हे कर्जवाटप करण्यात आले होते. ही सर्व कर्ज बुडीत निघाली होती. सुरिंदर अरोरा यांनी २०१० साली मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली. कर्ज देताना नियमांचे उल्लंघन झाल्याचा आरोप त्यांनी केला होता. हा घोटाळा २५ हजार कोटींचा असल्याचा आरोप त्यांनी केला होता.

# श्री योगेश्वरी देवस्थानाला मुंबईच्या भक्ताकडून एक कोटीची देणगी

बीड,ता.२७–

**महाराष्ट्रातील भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या श्री योगेश्वरी देवीच्या मुंबई येथील भक्ताने मंदिराच्या शिखर बांधकामासाठी एक कोटी रुपयांची देणगी दिली.नाव न सांगण्याच्या अटीवर देणगी दिली.**

अंबाजोगाई येथील श्री योगेश्वरी देवीच्या मंदिराचे असलेले शिखर हे शंभर वर्षापूर्वीचे आहे.त्याचे बांधकाम चुन्यात असल्याने ते आता तकलादू झाले आहे.

या शिखराच्या कामाचा जीर्णोध्दार करणार असल्याचे योगेश्वरी देवल कमिटीने जाहीर केले.याची माहिती मुंबई येथील भक्ताला माहीत झाली. या शिखराच्या कामासाठी किमान ८० ते ९० लाख रुपयांचा खर्च येणार असल्याचे त्यांना समजले.त्यांनी श्री योगेश्वरी देवल कमिटीच्या विश्वस्तांकडे एक




कोटी रुपयांचा धनादेश पाठवून दिला. त्या धनादेशाची रक्कम बँकेत जमादेखील झाली.आता या रकमेतून मंदिराच्या शिखराच्या जीर्णोद्धाराचे काम या आठवड्यात सुरू होत आहे. या कामासाठी तामिळनाडू येथील खास कारागीर नक्षीकाम करत या शिखराचे बांधकाम पूर्ण करणार आहेत.

# उच्च व तंत्रशिक्षणमध्ये पदभरती प्रक्रियेतील बदलाचा विचार करू

## ना.चंद्रकांतदादा पाटील

मुंबई,ता.२७ (प्रतिनिधी)–

शालेय शिक्षण विभागातील शिक्षकांप्रमाणेच उच्च व तंत्रशिक्षणमध्ये पदभरती प्रक्रिया राबविण्याबाबत शासन नक्कीच सकारात्मक विचार करेल असे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले.

राज्यातील शासन मान्य विद्यापीठ व महाविद्यालयातील पदभरतीसाठी पवित्र पोर्टलप्रमाणे निर्माण करणार का असा विधानसभेत प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. या प्रश्नास उत्तर देताना ते बोलत होते.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, शासन मान्य विद्यापीठ व महाविद्यालयातील पदभरतीसाठी भरती प्रक्रिया करताना आठ सदस्यांचे मुलाखत पॅनल असते. या मुलाखत पॅनलमधील सदस्यांनी गुण द्यायचे असतात. यामध्ये संचालकाचा सहभाग ना हरकत देण्यापुरताच असतो.

प्रत्येक पॅनलमधील दिलेल्या सदस्याचे गुण एकत्रित करून विद्यापीठाला कळविले जातात. विद्यापीठाने त्याला मान्यता द्यायची असती. मात्र तरीही शिक्षण विभागाप्रमाणे अथवा त्यापेक्षा सुधारित भरती प्रकिया करण्यासाठी सूचना आली आहे त्याच्यावर उच्च व तंत्रशिक्षण विभाग नक्की विचार करेल असे उत्तर त्यांनी दिले.

# मद्य घोटाळ्यातून केजरीवाल,सिसोदिया यांची निर्दोष मुक्तता

(पान १ वरून)

असलेल्या व्यक्तींवर गंभीर आरोप करताना तपास यंत्रणेकडे ठोस,विश्वासार्ह आणि सुसंगत पुरावे असणे गरजेचे आहे.केवळ तर्क,अनुमान किंवा अपूर्ण कागदपत्रांवर आधारित आरोप न्यायालय स्वीकारू शकत नाही.

हे प्रकरण २०२२-२३ च्या दिल्ली अबकारी धोरणाशी संबंधित होते. या धोरणात कथित अनियमितता आणि गैरव्यवहार झाल्याचा आरोप करत सीबीआयने गुन्हा दाखल केला होता.त्यानंतर ईडीने मनी लॉन्ड्रिंगच्या आरोपांवरून स्वतंत्र तपास सुरू केला.आरोपपत्रात अनेक त्रुटी असल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने काही महत्त्वाच्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देण्यात तपास यंत्रणेला अपयश आल्याचे नमूद केले. पुराव्यांची साखळी स्पष्टपणे सिध्द करण्यात आलेली नसल्यामुळे आरोपींना दोषी ठरवणे शक्य नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

निकालानंतर प्रथमच प्रतिक्रिया देताना अरविंद केजरीवाल भावूक झाल्याचे दिसून आले. ते म्हणाले की, आम्ही सुरुवातीपासून सांगत आलो की, सत्याचा विजय होणारच. भारतीय न्यायव्यवस्थेवर आमचा पूर्ण विश्वास आहे.ज्यांनी आम्हाला न्याय दिला त्या न्यायमूर्तींचे आम्ही आभारी आहोत.आमच्याविरोधात पूर्णपणे खोटा गुन्हा तयार करण्यात आला होता, हे आज सिध्द झाले.केजरीवाल भ्रष्ट नाहीत,मी आयुष्यात इमानदारी कमावली आहे.

न्यायालयाने आमच्या प्रामाणिकतेवर शिक्कामोर्तब केले, असेही त्यांनी सांगितले.आम आदमी पार्टीला संपवण्यासाठी राजकीय षडयंत्र रचण्यात आले आणि पक्षाच्या प्रमुख नेत्यांना तुरुंगात डांबण्यात आले.

या प्रकरणात आम आदमी पक्षाच्या अनेक नेत्यांना अटक करण्यात आली होती. जामीन अर्ज अनेक वेळा फेटाळण्यात आले होते आणि तपास प्रक्रियेमुळे राजकीय वातावरण तापले होते. विद्यमान मुख्यमंत्र्यांनाही अटक करून दीर्घ काळ कोठडीत ठेवण्यात आल्याचा उल्लेख करत केजरीवाल यांनी हा प्रसंग स्वतंत्र भारताच्या इतिहासात अभूतपूर्व असल्याचे म्हटले. न्यायालयाच्या निर्णयामुळे पक्षावरील कायदेशीर दबाव काही प्रमाणात कमी झाल्याचे मानले जात आहे.

दरम्यान, या निकालाबाबत सीबीआयने असमाधान व्यक्त केले आहे. आदेशाचा सविस्तर अभ्यास करून उच्च न्यायालयात अपील दाखल करण्यात येईल असे सीबीआयच्या वकीलांनी सांगितले. त्यामुळे हे प्रकरण पुढील न्यायालयीन टप्प्यात जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

एकूणच, दिल्लीच्या मद्य धोरणाशी संबंधित या गाजलेल्या प्रकरणात आलेल्या निर्णयामुळे राष्ट्रीय राजकारणात मोठी चर्चा रंगली आहे. न्यायालयाने दिलेल्या निरीक्षणांमुळे तपास यंत्रणांच्या कामकाजाच्या पध्दतीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तथापि, अपील प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर या प्रकरणाचा अंतिम निकाल भविष्यातील न्यायालयीन घडामोडींवर अवलंबून राहणार आहे.

## कायदा प्रवेशासाठी मोफत प्रशिक्षण वर्ग

इचलकरंजी,ता.२७–

**बी.ए. एलएल.बी. व एलएल.बी. प्रवेशासाठी सीईटी सेलचा एंट्रन्स एक्झाम फॉर्म भरलेल्या तसेच फॉर्म भरण्यास इच्छुक विद्यार्थ्यांसाठी दत्ताजीराव कदम लॉ कॉलेज, इचलकरंजी यांच्या वतीने शनिवारी मोफत प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे.**

शनिवारी, सकाळी ११ वाजता श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालयाच्या सभागृहात दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) तथा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती मोनाली एस. गावडे यांच्या उपस्थितीत हे प्रशिक्षण होणार आहे. अशी माहिती प्राचार्य डॉ. सी.एस.बागडी यांनी केले आहे.

# अजित पवार यांचा मृत्यू धुक्याने का धोक्याने ?–राज ठाकरे

मुंबई,ता.२७(प्रतिनिधी)–

**अजित पवार गेल्यानंतर अनेक संशयाची भूत फिरत आहेत. अपघात हा धुक्याने झाला की धोक्याने हे सुरू आहे. असे मनसेप्रमुख राज ठाकरे पत्रकार परिषदेत बोलताना म्हणाले. दरम्यान रोहित पवार यांनी आज राज ठाकरे यांची भेट घेत अजितदादांच्या मृत्यू प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी, यासाठी व्यापक पाठिंबा मिळावा अशी मागणी केली. या भेटीनंतर राज ठाकरे यांनी सरकारवर जोरदार टीका करत हा विषय राजकारणाच्या पलीकडचा असून महाराष्ट्रासाठी अत्यंत दुर्दैवी असल्याचे म्हटले.**

रोहित पवारांनी हा प्रश्न सुरू असलेल्या विधानसभा अधिवेशनात मांडावा तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदारांनी तो लोकसभेत उपस्थित करावा, असा सल्ला आपण दिल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

राज ठाकरे यांनी सांगितले की, रोहित पवार यांनी तीन वेगवेगळ्या ठिकाणी एफआयआर नोंदवण्याचा प्रयत्न केला, मात्र तिन्ही ठिकाणी तो नोंदवून घेण्यात आला नाही. मरीन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात अधिकारी एफआयआर टाईप करत असताना संबंधित डीसीपींनी येऊन तो नोंदवू नये, अशा सूचना दिल्याचा आरोप त्यांनी केला.

अजित पवारांसारख्या मोठ्या नेत्याच्या मृत्यूबाबत एफआयआर घेतला जात नसेल, तर सामान्य नागरिकांच्या तक्रारींचे काय होणार, असा सवाल राज ठाकरे यांनी उपस्थित केला.

जर हा केवळ अपघात असेल आणि त्यात कोणताही घातपात नसेल, तर तक्रार नोंदवण्यास सरकारकडून अडथळे का आणले जात आहेत, असा थेट प्रश्न त्यांनी विचारला. यामुळे संपूर्ण प्रकरणाभोवती संशयाचे सावट निर्माण होत असल्याचे ते म्हणाले. एफआयआर नोंदवून त्यानुसार चौकशी करणे ही अत्यंत साधी प्रक्रिया असताना सरकार पोलीस यंत्रणेवर दबाव टाकत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

राज ठाकरे यांनी सुनेत्रा वहिनींनी या प्रकरणावर स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. त्या सध्या उपमुख्यमंत्री पदावर आहेत आणि अजित पवार त्यांचे पती होते, त्यामुळे या अपघाताबाबत त्यांनी गांभीर्याने विचार करून भूमिका मांडली पाहिजे, असे ते म्हणाले.

विमान अपघाताच्या संदर्भात बोलताना राज ठाकरे यांनी 'ब्लॅक बॉक्स' कधीच नष्ट होत नाही, असे सांगत त्याबाबत अद्याप स्पष्ट माहिती का दिली गेली नाही, असा प्रश्न उपस्थित केला. सीआयडी आणि सीबीआय चौकशी नेमकी कुठपर्यंत पोहोचली आहे, तसेच डीजीसीएचा प्राथमिक अहवाल अद्याप का सादर झाला नाही, याबाबतही त्यांनी नाराजी व्यक्त केली. एका महिन्यात प्राथमिक अहवाल देण्याचे आश्वासन देण्यात आले होते, मात्र तो अद्याप जाहीर झालेला नसल्याने लोकांच्या मनात शंका निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

# कोल्ह्याच्या हल्ल्यात दहाजण जखमी

(पान १ वरून)

कोल्ह्याने अचानक नागरिकांवर झडप घातली. आपल्या मेंढ्या घेऊन फिरणाऱ्या एका धनगरावरही या कोल्ह्याने हल्ला केला. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे नागरिकांमध्ये एकच खळबळ उडाली.

घटनेची माहिती मिळताच वनक्षेत्रपाल रमेश कांबळे, वनपाल दादासो बर्गे, वनरक्षक अश्विनी वाघमारे, इनुस मणेर, गौरव गायकवाड व रमेश पोळ यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थितीची पाहणी केली. वनखात्याने संपूर्ण परिसर पिंजून काढला असून, कोल्हा मसुचीवाडी परिसरातील ओढ्याकडे गेल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. मात्र ओढ्यातील दाट झुडपे व खोलीमुळे त्याचा शोध लागलेला नाही. पुढील शोधमोहीम सुरू असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. हल्ल्यात जखमी झालेल्या सर्वांना तातडीने ईश्वरपूर सिव्हिल हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. वैद्यकीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सर्वांची प्रकृती स्थिर आहे.या हल्ल्यात विशाल नायकवडी, लता कुंभार, रूपाली कुंभार, विक्रम देशमुख (सर्व मसुचीवाडी)अरविंद पवार, भागिरथी पवार(जुनेखेड) पुष्पा सावंत (इटकरे), तानाजी घुटुगडे (विरळी ता. माण), योगेश कोळेकर (क. महांकाळ) व आप्पासाहेब वाघमारे हे जखमी झाले आहेत.

दरम्यान, वनखात्याच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे. एकटे शेतात किंवा निर्जन स्थळी जाणे टाळावे, लहान मुलांची विशेष काळजी घ्यावी आणि संशयास्पद हालचाल दिसल्यास तात्काळ वनविभागाला कळवावे, असा इशारा देण्यात आला आहे.

## १७ मार्चला निवड होणार

(पान १ वरून)

ग्रामविकास विभागाने जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवून २० मार्च २०२६ पूर्वी निवड प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानुसार आता निवड कार्यक्रम निश्चित करण्यात आला आहे.

१७ मार्च रोजी जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीसाठी सदस्यांची विशेष सभा होणार आहे. तर १० मार्च रोजी पंचायत समिती सभापती व उपसभापती निवडीसाठी संबंधित सभांचे आयोजन करण्यात येणार आहे.

दरम्यान, कोल्हापूर जिल्हा परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांना २० जागा, भारतीय जनता पक्षाला १२, शिवसेनेला ९ जागा मिळाल्या आहेत. जनसुराज्य शक्ती पक्षाचे ६ सदस्य तर आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर यांच्या नेतृत्वाखालील शाहू आघाडीचे ४ सदस्य निवडून आले आहेत. हे सर्व महायुतीचे घटक मानले जात आहेत. तर काँग्रेस पक्षाला १४ जागा आणि शिवशाहू आघाडीला १ जागा मिळाली आहे. महायुतीमध्ये अध्यक्षपदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपाने दावा केल्याने राजकीय हालचालींना वेग आला असून, अध्यक्षपदाची निवड रंगतदार होण्याची शक्यता आहे.

## आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या सनदी अधिकाऱ्यावर कारवाई

(पान १ वरून)

असलेल्या सिंग यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात आली होती, ज्याचा शेवट आता त्यांच्या निलंबनात झाला आहे.

**कडक अटींसह निलंबनाचे आदेश जारी**

अतिरिक्त सचिव व्ही. राधा यांच्या स्वाक्षरीने हे निलंबनाचे आदेश काढण्यात आले आहेत. अखिल भारतीय सेवा (शिस्त व अपील) नियम १९६९ अंतर्गत मिळालेल्या अधिकारांचा वापर करून राज्य सरकारने ही कारवाई केली आहे. निलंबन काळात एम देवेंद्र सिंग यांचे मुख्यालय मुंबई असेल आणि त्यांना विभागीय आयुक्तांच्या परवानगीशिवाय शहर सोडता येणार नाही. विशेष म्हणजे, या काळात त्यांना कोणताही खासगी व्यवसाय किंवा नोकरी करता येणार नाही. जर त्यांनी नियमांचे उल्लंघन केले, तर त्यांच्यावर अधिक कठोर कारवाई करण्याचा इशाराही शासनाने दिला आहे.

# कोल्हापूर-रत्नागिरी जोडणाऱ्या घाटमार्गांच्या कामांना गती द्या

मुंबई,ता.२७(प्रतिनिधी)–

कोल्हापूर आणि रत्नागिरी या दोन जिल्ह्यांना जोडणाऱ्या प्रमुख तीन घाटमार्गांच्या कामांना गती देण्याचे निर्देश सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी मंत्रालयात झालेल्या बैठकीत दिले.

अणुस्कुरा-गावडी (ता.शाहूवाडी) ते लांजा (जि. रत्नागिरी) येथील भांबेड-धनगरवाडी रस्ता, पावनखिंड-गजापूर-विशाळगड पायथा (ता.शाहूवाडी) ते संगमेश्वर तालुक्यातील देवडे-भोवडे जोडणारा नवीन घाटमार्ग, राष्ट्रीय महामार्ग १९३ पासून बाजारभोगाव-किसरूळ-काळजवडे-पोंबरे-कोलीक-पडसाळी ते किजिडी घाटास जोडणारा रस्ता या घाटमार्गासंदर्भात या बैठकीत चर्चा करण्यात आली. बैठकीस आम. डॉ. विनायक कोरे, आमदार किरण सामंत, आम.चंद्रदीप नरके, सचिव (रस्ते) संजय दशपुते, मुख्य अभियंता संतोष शेलार, मुख्य अभियंता (कोकण) शरद राजभोज, अधीक्षक अभियंता (कोल्हापूर) तुषार बुरूड, कार्यकारी अभियंता चंद्रकांत आयरेकर, जिल्हा वन अधिकारी (कोल्हापूर) संजय वाघमोडे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

कोल्हापूर-रत्नागिरी दरम्यानचे हे रस्ते देवडे-भोवडे ते विशाळगड घाट, काजिर्डा ते पडसाळी घाट आणि भांबेड ते गावडी घाट अशा तीन प्रमुख घाटांना जोडतात. सह्याद्री पर्वतरांगांतील लांजा व संगमेश्वर तालुक्यातील अनेक मुख्य गावांना हे मार्ग जोडत असल्याने दळणवळण सुलभ होईल, घाटमाथ्यावरील नागरिकांचे जीवनमान उंचावेल तसेच पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणातील काही जिल्हे थेट जोडले जातील, असे मंत्री भोसले यांनी सांगितले.

वन विभागाच्या आवश्यक सर्व परवानग्या पूर्ण करून रस्त्यांच्या कामांतील अडथळे तातडीने दूर करावेत. आवश्यक ठिकाणी पूल, दिशादर्शक फलक बसवावेत, घाटमार्गांसाठी योग्य सुरक्षात्मक उपाययोजना कराव्यात. तसेच या मार्गांवर एसटी बसेस नियमित धावतील अशा पद्धतीने रस्त्यांची आखणी करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

## काँग्रेसच भाजपला सक्षम पर्याय

(पान १ वरून)

यापुढे कोकण विभागात काँग्रेसचा विचार सर्वदूर पोहचवण्याचा प्रयत्न करा, असे सपकाळ म्हणाले. याप्रसंगी माजी खासदार हुसेन दलवाई यांनी मार्गदर्शन केले.प्रदेश उपाध्यक्ष ॲड. गणेश पाटील यांनी कार्यशाळेच्या उद्देशाबद्दल सविस्तर विवेचन केले तर प्रास्ताविक आशुतोष शिर्के यांनी केले.

**राज्यसभा काँग्रेसने तर विधान परिषद शिवसेनेने लढवावी**

यावेळी पत्रकारांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे हे राज्यसभेतील विरोधी पक्ष नेते आहेत. राष्ट्रीय पातळीवर काँग्रेस पक्षाची भूमिका पाहता राज्यसभा निवडणूक काँग्रेस पक्षाने लढवावी व मविआचे नेते माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी विधान परिषदेची निवडणूक महाविका आघाडीकडून लढवावी, असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.




कै. सुरज खोत

॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥

कै. सुरज दत्तात्रय खोत यांचे आकस्मित निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना !

श्री प्रतिष्ठान, खोतनगर
समस्त खोत परिवार, तारदाळ

रक्षाविसर्जन : आज शनिवार दि. २८/०२/२०२६ रोजी सकाळी ८ वाजता तारदाळ येथे होणार आहे.

॥ प्रथम पुण्यस्मरण ॥



कै. राजाराम परशराम शिंदे
मृत्यू : ११ मार्च २०२५

चंदनापरी देह झिजवला,
कष्टातूनी वसंत फुलविला,
उरली नाही साथ आम्हाला
पप्पा...आठवण येते क्षणाक्षणाला..!

कै. राजाराम परशराम शिंदे यांच्या प्रथम पुण्यस्मरणदिनी आमची भावपूर्ण श्रध्दांजली !

समस्त शिंदे परिवार, तारदाळ

# स्थायीसह विविध समिती सभापतींची निवड ९ मार्चला

इचलकरंजी,ता.२७–

महापौर,उपमहापौर निवडीनंतर आता स्थायी समिती, महिला व बालकल्याण समिती,परिवहन समिती, शिक्षण समिती आणि मागासवर्गीय कल्याण समितीच्या सभापतींसह चार प्रभाग समित्यांच्या सभापतींची निवड ९ मार्चला सकाळी ११ वाजता होणार आहे. सदरच्या निवडी अप्पर जिल्हाधिकारी संजय शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार आहे.

दरम्यान,स्थायी समिती सभापती पदासाठी भाजपामध्ये अनेकजण इच्छुक आहेत.त्यामुळे कोणाला संधी मिळणार याकडे लक्ष लागून राहिले आहे.

स्थायी समितीसाठी सुरेश हाळवणकर व प्रकाश आवाडे गटामध्ये रस्सीखेच सुरू आहे. शिक्षण व परिवहन समितीसाठीही अनेकजण इच्छुक आहेत. तीन समित्या या हाळवणकर गटाला, तर दोन समित्या या आवाडे गटाला मिळण्याची शक्यता आहे. प्रभाग समिती कार्यालयांतर्गत येणाऱ्या १, २ आणि ३ या प्रभाग समित्यांमध्ये भाजपाचे संख्याबळ जास्त आहे, तर प्रभाग क्रमांक ४ मध्ये शिव–शाहू विकास आघाडीचे संख्याबळ मोठे आहे. त्यामुळे तीन ठिकाणी भाजपचे, तर एका ठिकाणी शिव–शाहू विकास आघाडीचे प्रभाग समिती सभापती होणार आहेत.




हार्दिक शुभेच्छा!

आमचे परममित्र, माजी नगरसेवक
मा. श्री. नंदू उर्फ बाबासो
आण्णासो पाटील यांना
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

श्री. नंदू उर्फ बाबासो पाटील

* संजय उर्फ बबलू सुतार * मयूर संजय सुतार
* दिपक सतिश कोरे * सुतार,कोरे परिवार, इचलकरंजी.





हार्दिक शुभेच्छा!

आमचे आधारस्तंभ व
मार्गदर्शक, माजी नगरसेवक
श्री. नंदू उर्फ बाबासो
आण्णासो पाटील
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा !

मा. श्री. नंदू उर्फ बाबासो
आण्णासो पाटील

रूही टेक्स्टाईल, इचलकरंजी
समीर अस्लम मुजावर * वसिम इसाक मुजावर
अनिस इसाक मुजावर * रेहान बाबासो मुजावर
मुजावर परिवार, तोडकर मळा,
गावभाग, इचलकरंजी



हार्दिक शुभेच्छा



आमचे मार्गदर्शक,
माजी नगरसेवक
मा.श्री. नंदू उर्फ बाबासो
आण्णासो पाटील
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!

मा. श्री. नंदू उर्फ
बाबासो आण्णासो पाटील

विनायक शिंगारे | रजत खोत | राजेंद्र दरिबे
विजय माने | रविंद्र कचरे | मयुर सुतार



हार्दिक शुभेच्छा



आमचे
आधारस्तंभ, मार्गदर्शक
व माजी नगरसेवक
श्री. नंदू उर्फ
बाबासो आण्णासो पाटील
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!

श्री. नंदू उर्फ बाबासो आण्णासो पाटील

महेंद्र नानासो खोत | धर्मेंद्र नानासो खोत
सुनिल नानासो खोत | रोहीत राजाराम खोत
प्रथमेश धर्मेंद्र खोत | अथर्व सुनिल खोत
आशिष सुनिल खोत
खोत परिवार, गावभाग, इचलकरंजी.



आमचे नेते



मा. मदन कारंडे (साहेब)



मा. उदयसिंग पाटील



मा. रणजीत जाधव



मा. नितीन कोकणे

आमचे परममित्र
मा.श्री. अमोलभैय्या
कोकणे
यांना
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!



मा.श्री. अमोलभैय्या कोकणे

मच्छिंद्र नगारे - युवा उद्योजक
ॲड. शिवराज चुडमुंगे
अध्यक्ष, भा.ज.पा. जिल्हा कायदा आघाडी पूर्व ग्रामीण
अभिजीत कवडे (रूईकर) - उद्योजक
स्नेहल निल्ले साहेब - उद्योजक
प्रमोद बागडे * विनायक कांबळे



हार्दिक शुभेच्छा!



आमचे परममित्र,
माजी नगरसेवक,
मा. श्री. नंदू उर्फ
बाबासो आण्णासो
पाटील यांना
वाढदिवसानिमित्त
हार्दिक
शुभेच्छा!

मा. श्री. नंदू उर्फ बाबासो
आण्णासो पाटील

| | | |
|---|---|---|
| प्रकाशराव दत्तवाडे | विलासराव गाताडे (मामा) | पापालाल मुजावर |
| राजू उर्फ रशिद कलावंत | बाबासाहेब पाटील-वखारवाले | गजानन लोंढे |
| संजय उर्फ बबलू सुतार | चंद्रकांत बिदंगे | संपत जामदार |
| मनोहर हिराणी | अस्लम बापू मुजावर | किशोर पाटील |
| अशोक बारटक्के | शांताप्पा मगदूम | दस्तगीर मुजावर (डी.ए.) |
| मनोज कागवाडे | राजू चव्हाण | आनंदा पेटकर |
| आर.डी. पाटील | मनोहर हेरलगे | शिवाजी काळे |
| दिलावर गवंडी | आशिष पाटील | जयपाल हेरलगे |
| रजत खोत | | |

N. P. ग्रुप, गांवभाग, इचलकरंजी.






आपल्या सर्वांच्या प्रेमाने आणि आशिर्वादाने आम्ही
११ व्या वर्षात यशस्वी पदार्पण करीत आहोत...!
धन्यवाद...! असेच प्रेम व सहकार्य लाभू द्या...!
आपल्या सेवेत सदैव असणारे 'श्री मोटर्स यामाहा'

१० वा वर्धापन दिन...



प्रोप्रा. अमित बळवंत कुंभार
M.9527582727

श्री मोटर्स यामाहा

या 'अधिकृत यामाहा शोरुमच्या' १० व्या वर्धापनदिनानिमित्त
हार्दिक हार्दिक हार्दिक शुभेच्छा..!

...शुभेच्छुक...

आदित्य ऑटो, सोलापूर
टाकळीकर ग्रुप, सोलापूर
मनोमय युवक मंडळ, जय सांगली नाका, इचलकरंजी
सर्व मित्रपरिवार व आप्तेष्ट

SHREE MOTORS : SANGLI NAKA, OPP. BALAJI BAKERY, ICHALKARANJI. M.7249145004, 7249145003



६० वा ...वर्धापन ...दिन

आपल्या आकांक्षाच्या क्षितिजाला 'अर्थ' देणारी बँक...
सुवर्णमहोत्सवी
वारणा बँक



सहकारमहर्षि
स्व. तात्यासाहेब कोरे



अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्या. मुंबई यांची आर्थिकदृष्ट्या मागास अर्थसहाय्य योजना

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ यांची व्याज परतावा कर्ज योजना

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत कर्ज योजना
वैयक्तिक व्याज परतावा कर्ज योजना
(Effective Interest Rate 0%)*

सौर ऊर्जा कर्ज योजना
* (सबसिडी योजना लागू)
व्याजदर १०.५०%

पंतप्रधान रोजगार निर्मिती योजना (पीएमईजीपी)

वास्तू गृहकर्ज योजना
* आपली वास्तू गृह कर्ज योजना (व्याजदर १०.०५%)
* वारणा शेतकरी गृह कर्ज योजना (व्याजदर १०.५०%)

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांसाठी कर्ज योजना (PMFME)

वाहन तारण कर्ज
नवीन थ्री / फोर व्हीलर व कमर्शिअल
वाहन खरेदी व्याजदर : १०.००%
व महिलांकरिता व्याजदर : ९.५०%

बँकेमार्फत देण्यात येणाऱ्या सुविधा

- रूपे कार्डद्वारे देशातील कोणत्याही NFS/ATM वरून पैसे काढणे, POS व E-COM सुविधा
- कॉर्पोरेट एजन्सी मार्फत जनरल व लाईफ विमा सुविधा
- एस.एम.एस. व मोबाईल बँकिंग सुविधा
- लॉकर सुविधा
- UPI RTGS/ NEFT सुविधा

श्री वारणा सहकारी बँक लि., वारणानगर
प्रधान कार्यालय: वारणानगर, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर. फोन ०२३२८-२२४२८६/८७ Visit : www.waranabank.com
मोबाईल - कोल्हापूर : ८६०५०१८१७८, ९१४५४६००३०, ८६०५००९०४६. इचलकरंजी व सांगली: ९७६६३९९६४४ / मुंबई : ९७६३७१६११० पुणे : ९७६३७१६३९३

■ संपादकीय ■

# आघाडीतला प्रादेशिकतावाद

लोकसभेची निवडणूक २०२४ मध्ये झाली. त्याच्या काही महिने अगोदर विरोधी पक्ष एकत्र आले होते. त्यांनी देशपातळीवर इंडिया किंवा भारतीय जनता पार्टीच्या भाषेत इंडी नावाची अथवा आयएनडीआयए नामक आघाडी स्थापन केली होती. उद्देश हा होता की केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारला कडवे आव्हान देता यावे. कागदावरची मांडणी असेही दर्शवत होती की आघाडीची मोट घट्ट बांधली गेली तर सत्ता परिवर्तन होऊ शकते.आघाडीचे निमंत्रक कोण आणि नेतृत्व कोणी करायचे यावर तेव्हाही बराच काथ्याकुट झाला. आघाडीची निमंत्रण पत्रिका वाटत फिरणारे बिहारचे मुख्यमंत्री लग्नातल्या जावयासारखे रूसून नंतर आघाडीतूनच बाहेर पडले. ममता बॅनर्जी आणि अखिलेश यादव यांची नावेही नेतृत्वासाठी चालवली गेली. नंतर अखिलेश यांनी स्वत:च्या मर्यादा ध्यानात घेतल्या आणि ममतांच्या नावाला पाठिंबा जाहीर केला. माळ मात्र पडली ती काँग्रेसचे राहुल गांधी यांच्या गळ्यात अन् ते स्वाभाविकही होते. त्याचे कारण राहुल देशभर पसरलेल्या काँग्रेसचे नेते आहेत. प्रादेशिक नेत्यांनी त्यांच्या राज्यातील लोकसभेच्या सर्व जागा जिंकल्या तरीही ते काँग्रेसची बरोबरी करू शकत नाहीत ही वस्तुस्थिती आहे व झालेही तसेच. लोकसभेत काँग्रेसची ताकद वाढली,भाजपची किंचित कमी झाली. मोदींना पंतप्रधान पदापासून रोखण्यात इंडियाला अपयश आले. तेव्हापासून इंडिया आघाडीचे नाव माध्यमातून बादच आहे. अधूनमधून एखाद्या राज्याच्या विधानसभा निवडणुकीच्या वेळी ते डोकावते.ही आघाडी संपली आहे असे सगळे गृहीत धरून चालले आहेत. काँग्रेसच्या चिदंबर आदी बड्या नेत्यांनीही अप्रत्यक्षपणे तसे वर्षभरापूर्वीच सूचित केले. अन्य नेते आणि खुद्द राहुल गांधीही यासंदर्भात काही बोलले नाहीत. इंडिया आघाडीचे पुन्हा स्मरण करण्याचे कारण म्हणजे गेल्या पंधरा दिवसांत ही आघाडी अचानक चर्चेत आली आहे.त्यावर दोन लक्षणीय म्हणता येईल अशा नेत्यांनी भाष्य केले आहे.या नेत्यांनी जी भूमिका मांडली त्याच्याशी असहमती दर्शवणारे भाष्य अन्य दोन नेत्यांनी केले. त्यामुळे आघाडीचा पोपट अजून जिवंत असावा असे वाटू लागले आहे.सुरुवात केली मणिशंकर अय्यर यांनी.त्यांनी इंडिया आघाडीचे नेतृत्व आघाडीतील लहान पक्षांसाठी उपयुक्त आहे, काँग्रेससाठी नाही.ममता बॅनर्जी,स्टॅलिन,अखिलेश अथवा तेजस्वी यादव यांच्याकडे हे पद सोपवले गेले पाहिजे.तसेच ममता बॅनर्जी जर नसतील तर इंडिया आघाडी संपुष्टात येईल असे ते म्हणाले. गेल्या आठवड्याभरात ते बरेच बोलले.त्यातून त्यांनी राहुल गांधी यांच्यावर आणि त्यांच्या निकटवर्तीयांवर थेट टीका केली. यावर मुळात अय्यर आमच्या पक्षातच नाहीत यास्तव त्यांच्या म्हणण्याला आम्ही भीक घालत नाही अशी भूमिका काँग्रेसच्या नेत्यांनी घेतली. अय्यर शांत पाण्यात दगड भिरकावून पाणी गढूळ करण्यात यशस्वी ठरले. नंतर हीच री तामिळनाडूतील उदयनिधी स्टॅलिन यांनी ओढली. उदयनिधी हे सामान्यत: हिंदू धर्माविरोधात वक्तव्ये करून प्रकाशझोतात असतात. अन्य काही लक्षणीय कामगिरी त्यांनी अद्याप केली नाही.स्टॅलिन यांचे ते पुत्र आहेत आणि त्यांचे राजकीय वारस आहेत ही त्यांची सगळ्यांत जमेची बाजू करूणानिधी यांनी त्यांच्या हयातीत स्टॅलिन यांना उशिराच आपला उत्तराधिकारी म्हणून नियुक्त केले. त्यामानाने उदयनिधींना स्टॅलिन यांनी लवकर संधी दिली. उदयनिधी यांनी त्यांच्या पित्याकडेच इंडियाचे नेतृत्व सोपवले जावे अशी जाहीर मागणी केली आहे.मात्र स्टॅलिन राहुल गांधी यांचे गुणगान करताना हातचे काही राखत नाहीत. त्यांच्यात घट्ट बाँड दिसतो. हे जर जगाला दिसते तर उदयनिधी यांना दिसत नसेल का? किंवा आपल्या पाच-पंधरा खासदारांच्या जोरावर आपण केंद्रात नेतृत्व करण्याची अपेक्षा करणे योग्य आहे का हा प्रश्न त्यांना पडला नसेल का? ममतांना आणि त्यांच्या समर्थकांनाही किंवा गेला बाजार अखिलेश व तेजस्वी यांनाही आणि त्यांच्या समर्थकांनाही हे प्रश्न पडत असतील व त्याची उत्तरे माहिती आहेत. इंडिया आघाडीच्या नेतृत्वाचा मुद्दा केवळ आणि केवळ आपल्या फायद्यासाठीच त्यांच्याकडून उपस्थित केला जातो आहे. तामिळनाडूत विधानसभा निवडणुका आहेत आणि बंगालमध्येही. या दोन्ही राज्यांत अनुक्रमे स्टॅलिन व ममता शक्तिशाली आहेत.तरीही आपल्याला राष्ट्रीय नेता अर्थात पंतप्रधान पदाचा उमेदवार म्हणून प्रोजेक्ट केल्याने राज्यात आपली उंची अधिक वाढते याची त्यांना जाणीव असल्यामुळे समर्थकांकरवी किंवा बातम्या प्रसृत करून ही मंडळी चर्चेत राहण्याचा प्रयत्न करत असावेत. पुढच्या वर्षी उत्तर प्रदेशात निवडणुका आहेत. त्या अगोदर अखिलेश यांचे नावही अचानक त्यांच्या एखाद्या अनुयायाकडून असेच समोर आले तर आश्चर्य वाटणार नाही. प्रादेशिक पक्षांची ही हुशारी आहे. ती त्यांनी छान जोपासली आहे. आघाडीचे घटक असताना आणि नेतृत्वपदाचे तुणतुणे वाजवताना प्रत्यक्ष जेव्हा जागावाटपाची वेळ येते त्यावेळी ही मंडळी आपापल्या राज्यात अजिबात तडजोड करत नाहीत.नेतृत्वासाठी नावपेरणीचा हा भाग केवळ स्वार्थासाठी आहे, अन्य काही नाही.

# इस्त्रायल दौऱ्याचा अन्वयार्थ

**भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या इस्रायल दौऱ्यावर आहेत. पंतप्रधान मोदींचा गत नऊ वर्षांतील हा दुसरा इस्रायल दौरा. जुलै २०१७ मध्ये पहिल्यांदा मोदी इस्रायल दौऱ्यावर गेले होते.त्या वेळी दोन्ही देशांतील संबंधांना सामरिक भागीदारीचा दर्जा देण्यात आला होता.यावेळी विज्ञान- तंत्रज्ञान, नवनिर्मिती, कृषि संरक्षण, व्यापार अशा विविध क्षेत्रांत इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांच्याशी चर्चा करून दोन्ही देशांतील संबंध अधिक दृढ करण्याचा भारताचा प्रयत्न राहणार आहे.**

इस्रायलच्या दौऱ्यावर जाण्यापूर्वी मोदी यांनी दोन्ही देशांतील संबंध अधिक दृढ होतील याची खात्री असल्याचे वक्तव्य केले होते...बुधवारी पंतप्रधान मोदी इस्रायलमध्ये दाखल झाले तेव्हा त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. दोन्ही नेत्यांमध्ये प्रादेशिक आणि जागतिक मुद्यांवरही चर्चा करणार आहेत. सध्या इस्रायल जागतिक पातळीवर अनेक आव्हानांना सामोरे जात असताना भारताबरोबरचे संबंध महत्त्वाचे राहतील असे मानले जात आहे. या दौऱ्यात इस्रायलकडून आयर्न डोम सुरक्षा प्रणाली मिळवण्याचा भारताचा प्रयत्न राहणार आहे. पंतप्रधान मोदींनी इस्रायली संसद, नेसेटा संबोधित करताना भारताच्या इस्रायलशी असलेल्या घनिष्ठ संबंधांना उजाळा दिला. ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासने केलेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या इस्रायली नागरिकांबद्दल शोक व्यक्त करून मोदी यांनी दहशतवादावर प्रहार केला. दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी सातत्यपूर्ण आणि समन्वित जागतिक कृतीची गरज आहे. कारण दहशतवाद कुठेही असला तरी तो सर्वत्र शांततेला धोका निर्माण करतो,असे मोदी म्हणाले.नागरिकांच्या हत्येचे कोणत्याही कारणाने समर्थन करता येणार नाही.आपण दहशतवादाचे कोणत्याही प्रकारे समर्थन करू शकत नाही. ७ ऑक्टोबर रोजी हमासने केलेल्या अमानवी दहशतवादी हल्ल्यात ज्यांनी जीव गमावला त्याबद्दल भारतीय जनतेच्या वतीने मोदींनी सहवेदना व्यक्त केल्या.भारत या क्षणी आणि पुढील काळात पूर्ण विश्वासाने इस्रायलसोबत खंबीरपणे उभा राहील, असे आश्वासनही दिले.



दहशतवादाचा उद्देश समाजांना अस्थिर करणे, विकासात अडथळा आणणे आणि विश्वासाला तडा देणे असतो. म्हणून दहशतवादाचा सामना करण्यासाठी सतत आणि समन्वित जागतिक कृती आवश्यक आहे. दहशतवाद कुठेही असला तरी सर्वत्र शांततेला धोका निर्माण करतो.भारतानेही दीर्घकाळ दहशतवादाचे दु:ख सहन केले आहे. २६/११ च्या मुंबई हल्ल्याचे आणि इस्रायली नागरिकांसह निष्पाप लोकांचे बळी गेल्याचे स्मरण पंतप्रधान मोदींनी केले. भारत शाश्वत शांतता आणि प्रादेशिक स्थिरतेला हातभार लावणाऱ्या सर्व प्रयत्नांना पाठिंबा देतो, असे त्यांनी सांगितले. इस्रायलने आपले सर्वात प्रगत आणि आतापर्यंत जगापासून लपवून ठेवलेले 'गोल्डन होरायझन' हे हवेतून डागले जाणारे बॅलेस्टिक क्षेपणास्त्र भारताला देण्याची घोषणा केली आहे.विशेष म्हणजे अनेक देशांनी या शस्त्रासाठी इस्रायलकडे मागणी केली होती. पण इस्रायलने ही तंत्रज्ञान भागीदारी फक्त भारतासोबत करण्याचे निश्चित केले आहे.'गोल्डन होरायझन' हे असे क्षेपणास्त्र आहे जे 'सुखोई' सारख्या लढाऊ विमानामधून डागले जाऊ शकते. भारताचे 'ब्रह्मोस' हे जगातील सर्वात वेगवान क्रूझ क्षेपणास्त्र मानले जाते.त्याचा वेग ३ मॅक आहे. 'गोल्डन होरायझन' चा वेग ५ मॅकपेक्षाही जास्त आहे. या प्रचंड वेगामुळे जगातील कोणतीही रडार प्रणाली किंवा क्षेपणास्त्रविरोधी यंत्रणा त्याला रोखू शकत नाही.हे क्षेपणास्त्र शत्रूच्या भूमीतील खोलवरचे बंकर्स, मजबूत किल्ले आणि अत्यंत सुरक्षित अणु प्रकल्प नष्ट करण्यासाठी डिझाईन केलेले आहे. इस्रायलच्या क्रांतिकारी 'आयर्न बीम' या लेझर आधारित संरक्षण प्रणालीवरही शिक्कामोर्तब झाले आहे.'गोल्डन होरायझन'सारखे

**दैनंदिनी**

शस्त्र मिळणार असल्याने भारताच्या संरक्षण विभागाची ताकद वाढणार आहे.पंतप्रधान मोदींचा हा इस्रायल दौरा केवळ राजनैतिक सौजन्या पुरता मर्यादित नाही,तर तो भारताच्या लष्करी सामर्थ्याला नवी दिशा देणारा असणार आहे.पाकिस्तानसोबतच्या संघर्षाचे अनुभव, ड्रोन हल्ले आणि लांब पल्ल्याच्या चिनी क्षेपणास्त्रांचा धोका लक्षात घेता भारत इस्रायलकडून आयर्न डोम आणि आयर्न बीमसारखे तंत्रज्ञान मिळवणार आहे.इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांनी गाझापट्टीतील परिस्थितीवर चिंता व्यक्त करताना म्हटले की, इस्रायलने संपूर्ण गाझा उद्ध्वस्त केला आहे. ७५ हजारांहून अधिक लोक मारले गेले आहेत. पंतप्रधान मोदी सध्या इस्रायलमध्ये आहेत. त्यांनी पॅलेस्टिनी जनतेच्या अधिकाराबद्दल भाष्य करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. मोदी यांच्या कारकीर्दीमध्ये इस्रायल हा भारताचा महत्त्वाचा मित्र ठरला आहे.दोन्ही देशांत गेल्या काही वर्षांत व्यापारी संबंधसुध्दा चांगल्या प्रमाणात विकसित झाले आहेत. इस्रायलमध्ये निर्यात करणारा भारत हा आशियामधील चीननंतरचा दुसरा देश ठरला आहे. इस्लामिक राष्ट्रांच्या दडपशाहीसमोर झुकायचे नाही हा इस्रायलचा एक कलमी कार्यक्रम आहे.या कार्यक्रमात त्यांना मोदीसारखा मित्र मिळाला तर त्यांना तो हवाच आहे. संरक्षण वस्तूंच्या उत्पादनामध्ये इस्रायल आघाडीवर आहे. त्यांची मदत भारतासाठी फायदेशीर ठरणार आहे. भारत आणि इस्रायलमधील वाढती मैत्री पाकिस्तानसह अनेक इस्लामिक राष्ट्रांना खुपणारी असली तरी ते काहीच करू शकणार नाहीत. मोदी यांच्या इस्रायल दौऱ्यामुळे दोन्ही देशांमधील मैत्रीला एक वेगळे परिमाण मिळणार यात शंका नाही.



भारतीय लोकशाहीच्या आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इतिहासात २४ फेब्रुवारी हा दिवस सुवर्ण अक्षरांनी कोरला जाणारा क्षण ठरला आहे. ज्या नागपूर शहराने देशाला नेहमीच वैचारिक प्रेरणा आणि नवी दिशा दिली,त्या नागपूरने आता महिला सक्षमीकरणाचा एक असा अभूतपूर्व वस्तुपाठ जगासमोर मांडला आहे, ज्याची गुंज केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर जागतिक स्तरावर ऐकू येईल.''मातृ देवो भव''ही भारतीय संस्कृतीतील उदात्त व व्यापक संकल्पना केवळ घोषणांपुरती किंवा भिंतींवरील सुभाषितापुरती मर्यादित न ठेवता, तिला प्रत्यक्ष सत्तेच्या केंद्रस्थानी स्थान देण्याचे धाडस भाजप नेतृत्वाने दाखवले आहे.

# नागपूरमध्ये संपूर्ण महिलाराज

## महापौर,उपमहापौर,स्थायी समितीसह दहाही समित्यांचे अध्यक्षपद महिलांकडे

भारतीय जनता पक्ष नागपूर महानगराने घेतलेला निर्णय राजकीय पटलावर एक मोठी सामाजिक क्रांती घडवून आणणारा ठरला असून, महानगरपालिकेच्या सत्तेची संपूर्ण धुरा म्हणजेच महापौर, उपमहापौर, स्थायी समिती अध्यक्ष सोबतच संपूर्ण सभापतींचे पद महिलांच्या हाती सोपवून एक नवा इतिहास रचला आहे.जिथे आज भारताच्या सर्वोच्च घटनात्मक पदावर राष्ट्रपती म्हणून श्रीमती द्रौपदी मुर्मू विराजमान आहेत, तर देशाची अर्थव्यवस्था अर्थमंत्री म्हणून श्रीमती निर्मला सीतारामन अत्यंत समर्थपणे सांभाळत आहेत. जेव्हा देशाची सुरक्षा आणि तिजोरी (अर्थव्यवस्था) महिलांच्या हाती सुरक्षित राहू शकते, तेव्हा शहराचा विकासही महिलांच्या नेतृत्वात अधिक वेगाने आणि पारदर्शकपणे होऊ शकतो,हाच दृढ विश्वास या नागपुरातील निर्णयातून दिसून येतो.नागपूर महानगर पालिकेत १५१ नगरसेवकांपैकी राखीव ७६ महिलांपैकी भाजपच्या एकूण ५५ महिला नगरसेविका निवडून आल्या आहेत. शहराचे प्रथम नागरिक म्हणजेच महापौर पद श्रीमती नीता ठाकरे यांच्याकडे आणि उपमहापौर पद श्रीमती लीला हाथीबेड यांच्याकडे सोपवून शहराच्या नेतृत्वाची ज्योत मातृशक्तीला आधीच प्रदान करण्यात आली. इतकेच नव्हे तर आता महापालिकेची सर्वात शक्तिशाली समजली जाणारी आणि शहराच्या तिजोरीच्या चाव्या ज्यांच्याकडे असतात, त्या स्थायी समितीमध्ये भाजपच्या वाट्याला येणाऱ्या अध्यक्षासह आपल्या सर्वच्या सर्व ११ सदस्यांच्या जागी महिलांचीच निवड केली आहे. यासोबतच १० विषय समित्यांचे अध्यक्षपद,९ झोनचे सभापती पद आणि अगदी शहराच्या दळण-वळणाची जबाबदारी असणारी परिवहन समिती सभापती, या सर्वांचे नेतृत्व आता महिलाच करणार आहेत.

महिला केवळ घराची लक्ष्मी नसून त्या शहराच्या भाग्यविधात्या सुद्धा बनू शकतात,हे या निमित्ताने सिद्ध झाले आहे. या नेतृत्व करणाऱ्या महिलांचा राजकीय,सामाजिक अनुभव व शिक्षण बघता महिलांचा उल्लेख केवळ महिला म्हणून नाही तर 'तज्ज्ञ महिलांचे नेतृत्व 'असे करणे संयुक्तिक ठरते. आतापर्यंतचा इतिहास पाहता राजकारणात महिलांचा सहभाग केवळ नावापुरता राहिला आहे, जिथे पडद्यामागून पुरुषच सत्ता राबवत असत.मात्र, नागपूरचा हा शत प्रतिशत प्रयोग या संकल्पनेला छेद देणारा ठरणारा आहे.

■ वैभव बावनकर

# भोंदू साधूच असतात का?

## शासकीय जाहिरातीतील साधूच्या व्यंगचित्रावरून टिका



**महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची एक जाहिरात नुकतीच पाहण्यात आली.स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवा. भोंदूगिरीवर नाही असा संदेश या जाहिरातीतून देण्यात आला आहे.या जाहिरातीत एका साधुचे व्यंगचित्र रेखाटण्यात आले आहे.दाढी आणि जटाधारी साधूच्या दंडाखाली छटी दाखवण्यात आली असून हातात कमंडळू रेखाटण्यात आले आहे. कपाळावर भस्म,दंड, मनगट आणि जटेला रुद्राक्षाच्या माळा दाखवण्यात आल्या आहेत.तर कटीला व्याघ्रचर्म गुंडाळलेले दिसत आहे.**

या व्यंगचित्राच्या माध्यमातून भोंदू साधु असे दिसतात हे सरकारला दाखवायचे आहे का? साधूच्या कपाळावर रेखाटण्यात आलेले भस्म हे भगवान शिवांच्या वैराग्याचे प्रतीक आहे. दंडाला रुद्राक्षाच्या माळा, कटीला व्याघ्रचर्म, दंडाला छटी आणि हाती कमंडलू ही सुद्धा भगवान शिवांच्या आणि दत्तगुरूंच्या चित्रांमध्ये आणि मुर्त्यांमध्ये आपल्याला प्रकर्षाने दिसून येतात. त्यामुळे शिवभक्तांना आणी दत्त भक्तांना या साऱ्या गोष्टी वंदनीय आहेत.या साऱ्या बाबी वैराग्याचे प्रतीक असल्याने संसारातील सुख सुविधांचा त्याग केलेले साधू संत सुद्धा या गोष्टी आपल्या जवळ बाळगतात. मोहमायेचा परित्याग करून ईशचिंतनामध्ये आपले उर्वरित अखंड आयुष्य समर्पित करणारे आणि जगाच्या कल्याणासाठी हिमालय आणि तत्सम निर्जन ठिकाणी वर्षोनुवर्षे ध्यानधारणा करणारे साधू संत हे या भारतभूमीचे एक वेगळे वैशिष्ट्य आहे.

सरकारी जाहिरातीवर भोंदू म्हणून साधूचे व्यंगचित्र दाखवणे म्हणजे सरसकट सर्वच साधूंना भोंदू म्हणून हिणवण्याचा प्रकार नव्हे का? आज भोंदूगिरी केवळ हिंदू धर्मातच आहे का?आजही अनेक दर्ग्यांमध्ये भूतबाधा काढण्याच्या नावाखाली लोकांना साखळदंडाने बांधले जाते, त्यांना धुरी दिली जाते, वेताच्या काठीने मारहाण केली जाते, चटके दिले जातात. ही भोंदूगिरी सरकारला दिसत नाही का ? पांढऱ्या वेशात दारोदारी येऊन, लोकांना फुकटात पुस्तिका वाटणारी,असाध्य रोग बरे करण्याचा दावा करणारी, तुमचे देव विसर्जन करण्यास सांगणारी, लोकांच्या गरिबीचा आणि असहाय्यतेचा फायदा घेऊन काही पैशांच्या, अन्नाच्या किंवा वैद्यकीय सुविधांच्या बदल्यात त्यांचे धर्मांतरण करणारी आणि हजारोंच्या उपस्थितीत स्टेजवर एड्स, कॅन्सरसारखे असाध्य रोग आम्ही बरे करतो असे छातीठोकपणे सांगणारी सुटाबुटातील भोंदूगिरी सरकारला दिसत नाही की त्याकडे जाणून बुजून दुर्लक्ष केले जात आहे. हिंदू हा सहिष्णू आहे.त्याला धर्माचे ज्ञान आणि अभिमान दोन्ही नसल्याने त्याला नेहमीच गृहीत धरले जाते. परिणामी साधू संत म्हणजे हल्ली टिंगलटवाळीचा विषय ठरू लागला आहे. सिनेमा, वेब सिरीज, नाटके, जाहिराती यांमध्ये त्यांची नेहमीच अवहेलना केली जाते परिणामी दारी भिक्षेच्या अथवा माधुकरी मागण्याच्या हेतूने आलेल्या साधुंकडे संशयास्पद रीतीने पाहिले जाऊ लागले आहे. त्यामुळे साधूंची निंदानालस्ती करणे योग्य नाही.सध्या राज्यात असलेल्या हिंदुत्ववादी सरकारकडून तरी ही अपेक्षा नव्हती. हिंदू समाजाच्या श्रद्धेला या जाहिरातीमुळे तडा गेला आहे त्यामुळे सरकारने हिंदूंच्या भावनांची दखल घेत या जाहिरातींवरील साधूंचे चित्र हटवावे अशी मागणी केली जात आहे.

■ जगन घाणेकर

## वाचकांचा पत्रव्यवहार

### भाषिक आत्मसन्मानाचा गौरव

भारताच्या दक्षिणेकडील राज्य असलेल्या मल्याळम भाषिक केरळ राज्याचे नाव आता अधिकृतपणे केरळम झाले असून केंद्र सरकारने राज्याच्या या नव्या नावास नुकतीच मंजुरी दिली आहे.त्यामुळे आता मल्याळी भाषिकांच्या राज्याच्या नामबदलाच्या दीर्घकाळ मागणीचा,भाषिक अस्मितेचा आणि सांस्कृतिक आत्मसन्मानाचा गौरव झाला आहे. खरे तर स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील अनेक राज्यांची नावे कालानुरूप बदलली गेली आहेत.मूळ अस्सल भारतीय नावे देण्यासाठी अनेक शहरांचे आणि राज्यांचे यथोचित नामकरण केले गेले. पूर्वीच्या युनायटेड प्रॉव्हिन्सेसचे नाव बदलून १९५० मध्ये उत्तर प्रदेश करण्यात आले. सेंट्रल प्रॉव्हिन्स आणि बेरारचे मध्य प्रदेश (१९५०), मद्रासचे तामिळनाडू (१९६९), म्हैसूरचे कर्नाटक (१९७३), उत्तरांचलचे उत्तराखंड (२०००) आणि ओरिसाचे ओडिशा (२०११) ही काही राज्यांच्या नामांतराची उदाहरणे. शहरांची आणि राज्यांची ही नवीन नावे म्हणजे भारताच्या दोन हजार वर्षांहून अधिक काळाच्या प्राचीन, ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि भाषिक आत्मसन्मानाचे संचित आहे.

■ प्रदीप मोरे

### राजकीय सद्भावना लयाला

राजकारण पूर्वीपासून आहे व एकमेकांवर टीका करणे नवीन नाही. काही वर्षांपूर्वी टीका विषयाला मुद्याला धरून व संयमित स्वरूपात असे.चुकून एखादा असभ्य शब्द वापरला गेला तर लगेच दिलगिरी व्यक्त होई.आता परिस्थिती पूर्णपणे बदलली असून जहरी टीका, सूड घेण्याची भाषा,काहीही उपमा देऊन अपमान करणे,एकेरी उल्लेख करणे, या गोष्टी सहजपणे होत आहेत. राजकारणातील सद्भावना व सामंजस्य पूर्णपणे लयास गेले की काय? पूर्वी विरोधकांबद्दल आदरभाव असे व जनहिताचे विषय घेऊन विरोध होत असे.आता निवडणूक काळात तर टीव्ही चॅनेलवर राजकीय नेत्यांचे वादविवाद, कोणी कोणास काय म्हणाले याच बातम्या असतात.

■ प्र.मु.काळे


# कॉपीमुक्त परीक्षा अभियानाची वास्तवता

कॉपीमुक्त अभियान प्रभावी ठरल्यामुळेच सामूहिक कॉपी, गैरप्रकार उघडकीस आल्याचा दावा राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने केल्याची बातमी वाचनात आली.तसेही दरवर्षी दहावी बारावीच्या परीक्षा सुरू होताच 'कॉपीमुक्त अभियान' यशस्वी ठरत असल्याचे दावे केले जातात; पण त्याच वेळी राज्यात विविध ठिकाणी कॉपीचे प्रकार उघडकीस येतात. काही ठिकाणी सामूहिक गैरप्रकार, तर काहीवेळा पेपरफुटीची प्रकरणेही समोर येतात. या विरोधाभासी चित्रामुळे प्रश्न पडतो की, उपाययोजना असूनही अपेक्षित परिणाम का दिसत नाही? भरारी पथके, सीसीटीव्ही, पोलिस बंदोबस्त, अचानक तपासण्या अशा कडक उपाययोजना केल्या जातात. काही विद्यार्थ्यांवर कारवाईही होते. मात्र, वर्षानुवर्षे अभियान राबवूनही कॉपी पूर्णतः थांबत नाही.पेपरफुटीची प्रकरणे तर अधिक गंभीर आहेत. कारण त्यात प्रश्नपत्रिका तयार करणे व वितरण प्रक्रियेतील सुरक्षेवरच प्रश्नचिन्ह उभे राहते.अशा घटनांमुळे प्रामाणिक विद्यार्थ्यांवर अन्याय होतो. कॉपी ही केवळ विद्यार्थ्यांची चूक नाही. गुणांवर आधारित स्पर्धा,निकालाचा दबाव, पालकांच्या अपेक्षा आणि 'कसेही करून यश मिळवणे' ही मानसिकता यामागे कारणीभूत आहे. म्हणूनच केवळ दंडात्मक कारवाई पुरेशी ठरणार नाही.परीक्षापद्धतीत बदल, कौशल्याधारित प्रश्न, सुरक्षित तंत्रज्ञानाचा वापर आणि मूल्यशिक्षण यांवर भर दिल्यासच 'कॉपीमुक्त अभियान'खऱ्या अर्थाने यशस्वी ठरेल.अन्यथा घोषणा आणि कारवाई यांच्यापुरतेच हे अभियान मर्यादित राहील.



■ दीपक गुंडये

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**शनिवार ता.२८.२.२०२६**,विक्रमसंवत २०८२,शिवशक ३५२,शालिवाहन शके १९४७,विश्वावसुनाम संवत्सरे उत्तरायणे, शिशिर ऋतो,फाल्गुन मासे, शुक्ल पक्षे, द्वादशी तिथी, २०.४५ नंतर त्रयोदशी तिथी, पुनर्वसु नक्षत्र, ९.३६, नंतर पुष्य नक्षत्र कर्करास, सौभाग्य योग, १७.०३ नंतर शोभन योग, बव करण, ९.३८ नंतर बालव करण २०.४५ पर्यंत,दिनमान ११.४१ सुर्योदय ६.५५,सुर्यास्त १८.३६ (कोल्हापूरचे) राहूकाळ सकाळी ९ ते १०.३०, मध्यम दिवस, धान्य कापणी, संग्रह, सकाळी ९.३० नंतर सोने खरेदीस, घबाड ९.३६पर्यंत.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## * राशीभविष्य

**मेष-** आज तणावमुक्तीसाठी तुमच्या मुलांसोबत मौल्यवान वेळ घालवा. मुलांच्या संगतीत राहून तुम्ही आनंद उपभोगू शकाल. तुमचे व्यक्तिमत्व सुधारण्यासाठी कठोर प्रयत्न करा.

**वृषभ-** वेळ आणि धन याची कदर तुम्ही केली पाहिजे अथवा येणारी वेळ समस्यांनी भरलेली राहू शकते.पाहुण्यांचा सहवास आनंददायी असणारा दिवस.

**मिथून-** आज तुमचा रिकामा वेळ घरातील सफाई करण्यात व्यतीत होऊ शकतो. अचानक पाहुण्यांच्या आगमनाने आखलेले प्लॅन विस्कळीत होतील.

**कर्क-** कुटुंबियांच्या गरजांना प्राथमिकता द्या.त्यांच्याबरोबर आनंदी आणि दु:खी प्रसंगात सामील व्हा. आज तुम्ही मेहनत केलीत तर यश निश्चित मिळेल.

**सिंह-** प्रभावी ठरणाऱ्या आणि महत्त्वाच्या पदांवरील लोकांशी संपर्क साधता यावा आणि संबंध वाढवावेत यासाठी तुम्हाला वेगवेगळ्या कार्यक्रमांना हजेरी लावणे ही चांगली संधी ठरेल.

**कन्या-** तुम्हाला आर्थिक समस्यांचा सामना करावा लागू शकतो.तुमच्या नवीन योजना,प्रकल्प याविषयी तुमच्या पालकांना विश्वासात घेऊन सांगण्यासाठी काळ उत्तम आहे.

**तुळ-**आजच्या दिवशी घडणाऱ्या घटना एकाच वेळी चांगल्या आणि निराशाजनक असतील, त्यामुळे तुम्ही गोंधळून आणि थकून जाल.जुने मित्र भेटतील.

**वृश्चिक-** आपल्या संवेदनशील वागण्याने आयुष्याला अर्थ प्राप्त होतो हे ध्यानात ठेवा.तुम्ही किती काळजी करता हे आपल्या वागण्यातून त्यांना दिसू द्या.

**धनु-**कुटुंबातील व्यक्तीसोबत जवळच्या नातेवाईकांकडे भेट देण्यास जाण्याची शक्यता आहे आणि यासाठी दिवस ही ठीक आहे.पैसे मिळविण्याच्या नव्या संधी लाभदायक असतील.

**मकर-** दिवसभर जरी तुम्ही धन कमावण्यासाठी प्रयत्न करत असाल परंतु, संध्याकाळी तुम्हाला धन लाभ होऊ शकतो. आपल्या जोडीदाराच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करु नका.

**कुंभ-** मित्रपरिवार आणि कुटुंबियांबरोबर एखादा कार्यक्रम आयोजित कराल. ध्यानधारणेचा तुम्हाला फायदा होईल. कामानिमित्त प्रवास घडेल.

**मीन-** तुमचा विश्वास आणि ऊर्जाशक्ती आज उच्च असेल. आजच्या दिवशी आपल्या व्यक्तिमत्वाला निखारण्यात लावू शकतात. व्यर्थ वेळ घालवण्यापेक्षा हे उत्तम आहे.

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् अॅन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई-दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६०, सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.* कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री.दि.पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# सरकारकडून ऊस अनुदानासाठी ३०० कोटींची तरतूद

## मंत्री शिवानंद पाटील यांची माहिती;प्रतिटन ५० रुपये अनुदान मिळणार

बेंगळुरू,ता.२७(प्रतिनिधी)-

**कर्नाटक राज्य सरकारने जाहीर केल्याप्रमाणे २०२५-२६ हंगामात साखर कारखान्यांना ऊसपुरवठा केलेल्या शेतकऱ्यांना प्रतिटन ५० रुपये आर्थिक साहाय्य देण्यासाठी ३०० कोटी रुपये मंजूर केल्याची माहिती ऊस विकास व साखरमंत्री शिवानंद पाटील यांनी दिली.**



गत ८ नोव्हेंबर रोजी साखर कारखानदार आणि ऊस उत्पादकांच्या बैठकीत मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी एफआरपी (फेअर ॲण्ड रेम्युनरेटिव्ह प्राइस) व्यतिरिक्त प्रतिटन १०० रुपये आर्थिक सहाय्य देण्याचा निर्णय जाहीर केला होता. या १०० रुपयांपैकी ५० रुपये राज्य सरकारकडून आणि ५० रुपये संबंधित साखर कारखान्यांकडून देण्यात येणार आहेत. त्यानुसार सरकारने आपल्या वाटपाचे ३०० कोटी मंजूर केले आहेत, असे मंत्री पाटील यांनी स्पष्ट केले.

साखर कारखान्यांच्या प्रस्तावांच्या आधारे ऊस विकास आयुक्त जिल्हाधिकाऱ्यांना निधी वितरित करणार आहेत. शेतकऱ्यांनी साखर कारखान्यांना पुरविलेल्या उसाच्या प्रमाणानुसार त्यांच्या बँक खात्यांत प्रतिटन ५० रुपये थेट जमा करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.तसेच ऊसपुरवठा केलेल्या शेतकऱ्यांना कारखान्यांच्या व्यवस्थापन मंडळांनीही प्रतिटन ५० रुपये आर्थिक सहाय्य द्यावे, अशा सूचनाही संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना दिल्याचे मंत्री पाटील यांनी सांगितले.

राज्य २०२५-२६ च्या गाळप हंगामात राज्यातील ८१ साखर कारखान्यांनी ऊस गाळप केला. त्यापैकी २९ कारखान्यांमध्ये हंगाम संपला, आतापर्यंत ५२१ लाख मेट्रिक टन ऊस गाळप झाला आहे. तर या हंगामात सुमारे ६०० लाख मेट्रिक टन ऊस गाळप होण्याचा अंदाज आहे.

यंदा अतिवृष्टीमुळे उसाच्या उत्पादनात सरासरी घट झाली आहे.त्याचा फटका शेतकऱ्यांना बसला असून दरवाढीविषयी शेतकऱ्यांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला होता.ऊसशेतीचा वर्षागणिक वाढत चाललेला खर्च व त्याप्रमाणात मिळणाऱ्या तुंटपुंज्या उत्पन्नामुळे शेतकऱ्यांमध्ये उदासीन भावना होती.आता सरकारने जाहीर केलेल्या अनुदानासाठी तरतूद केल्याने शेतकऱ्यांना काही अंशी का असेना दिलासा मिळणार आहे.

**आठ दिवसांत हंगाम संपणार**

**मार्चच्या पहिल्या आठवड्यात हंगाम संपण्याची शक्यता असून, ६०० लाख मेट्रिक टन गाळपाच्या अंदाजावर आधारित ३०० कोटी रुपयांचे अनुदान वितरित केले असल्याचे मंत्री शिवानंद पाटील यांनी नमूद केले.**



केरूर : मलकारी सिद्धेश्वर व अरण्यसिद्धेश्वर देवाच्या यात्रेत भंडाऱ्याच्या उधळणीत न्हाऊन गेलेले भाविक.

# केरूरमध्ये लाखो भाविकांची उपस्थिती

## भंडाऱ्याच्या उधळणीत मलकारी सिद्धेश्वर-अरण्यसिद्धेश्वर यात्रा उत्साहात

चिकोडी,ता.२७(प्रतिनिधी)-

**केरुर (ता.चिकोडी) येथील कर्नाटक महाराष्ट्रातील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान व कुलदैवत असलेल्या श्री मलकारी सिद्धेश्वर मंदिर व श्री अरण्यसिद्धेश्वर मंदिर येथील यात्रेला यंदा लाखो भाविकांची उपस्थिती होती.गेले पाच दिवस सुरु असलेल्या यात्रेची सांगता भंडाऱ्याच्या मुक्त उधळणीने झाली.**

यात्रेच्या शेवटच्या दिवशी सकाळी ठीक आठ वाजता श्री मलकारी सिद्धेश्वर व अरण्यसिद्धेश्वर देवांची पालखी मोठ्या उत्साहात उचलण्यात आली. पालखीवर भाविकांनी भंडाऱ्याची उधळण केली. देवाच्या मानकऱ्यांसह, यात्रा समिती सदस्यांच्या उपस्थितीत मानाचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. दुपारी देवास अभिषेक,निवाळकी व भाकणूक विधी पार पडले.

मंदिर परिसरात सकाळपासूनच दर्शनासाठी भाविकांची प्रचंड गर्दी उसळली होती. दर्शनासाठी आलेल्या गर्दीमुळे सर्व प्रमुख रस्त्यांवर वाहतुकीची कोंडी झाली होती.यात्रेनिमित्त विविध शर्यती व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. कर्नाटक व महाराष्ट्र राज्यातील अनेक स्पर्धक व शर्यत शौकिनांनी सहभाग नोंदविला होता.

# संशोधन व्यवस्थापन धोरणांचे विश्लेषण महत्त्वाचे

## डॉ.बी.एस.नवी;बागेवाडी महाविद्यालयात चर्चासत्र

निपाणी,ता.२७(प्रतिनिधी)-

**जागतिक आर्थिक परिस्थिती, स्टार्ट-अप संस्कृती, संशोधनाची गरज आणि व्यवस्थापन धोरणांचे विश्लेषण महत्त्वाचे आहे. नाविन्यपूर्ण पद्धती केवळ तंत्रज्ञानापुरत्या मर्यादित नाहीत, त्यामध्ये मूल्य-आधारित व्यवस्थापन, नीतिमत्ता आणि सामाजिक जबाबदारीचा समावेश असावा, असे मत राणी चन्नम्मा विद्यापीठाच्या वाणिज्य विभागाचे प्रमुख डॉ.बी.एस.नवी यांनी व्यक्त केले.**

आयक्यूएसी-प्रेरित वाणिज्य विभागाकडून स्थानिक केएलई संस्थेच्या जी.आय. बागेवाडी कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात 'वाणिज्य आणि व्यवस्थापनातील नाविन्यपूर्ण प्रयोग' या शीर्षकाखाली आयोजित राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्रात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.




निपाणीः चर्चासत्रात बोलताना डॉ.बी.एस.नवी.

यावेळी विठ्ठल शिंदे यांनी बँकिंग क्षेत्रातील डिजिटल तंत्रज्ञान आणि ग्राहक-केंद्रित सेवांचे महत्त्व स्पष्ट केले. वेगवेगळ्या राज्यांतील ६० हून अधिक प्राध्यापक आणि संशोधक विद्यार्थ्यांनी दोन परिषदांमध्ये आपले शोधनिबंध सादर केले. निवडलेल्या आणि प्रकाशित झालेल्या७५ शोध निबंधांच्या २ पुस्तकांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले. प्राचार्य डॉ.एम.एम.हुरळी यांनी अध्यक्षीय भाषण केले.

कार्यक्रमास पी.पी.यू.प्राचार्य हेमा चिक्कमठ, डॉ.एस.एम. रायमाने, शंकरमूर्ती के.एन.,एस.ए. देशपांडे, रेणू गुग्गारे, पल्लवी अनुरे, सर्व विभाग प्रमुख, विविध जिल्हे आणि राज्यांतील प्राध्यापक आणि संशोधन विद्यार्थी उपस्थित होते. प्रियंका कामत यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.बी.जी. कंकणवाडी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.नमिता नायक आणि श्रीदेवी मुंडे यांनी सुत्रसंचालन केले. स्नेहल हिरेकुडे यांनी आभार मानले.

# परीक्षेची जबाबदारी प्रामाणिक पार पाडा

## गटशिक्षणाधिकारी महादेवी नाईक यांची सूचना

निपाणी,ता.२७(प्रतिनिधी)-

**यंदाची दहावीची वार्षिक परीक्षा १८ मार्चपासून सुरू होणार असून निपाणी तालुका प्रशासनाने परीक्षेच्या पार्श्वभूमीवर व्यापक तयारी पूर्ण केली आहे. शहर व ग्रामीण भागातील एकूण १२ परीक्षा केंद्रांवर ३ हजार ७३५ परीक्षार्थ्यांची बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व परीक्षा केंद्रांवर आवश्यक सुविधा उपलब्ध करून परीक्षा कॉपीमुक्त, सुरक्षित आणि भीतीमुक्त वातावरणात पार पडावी यासाठी दिलेली जबाबदारी प्रामाणिक पार पाडा अशा सूचना गटशिक्षणाधिकारी महादेवी नाईक यांनी दिल्या.**

येथील गट शिक्षणाधिकारी कार्यालयात तालुक्यातील सर्व माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांची बैठक पार पडली. या बैठकीत परीक्षा केंद्रांवरील सुविधा, यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.



निपाणी : बैठकीत बोलताना गटशिक्षणाधिकारी महादेवी नाईक.

नाईक म्हणाल्या, दहावीची परीक्षा पारदर्शक आणि शिस्तबद्ध पद्धतीने होणे आवश्यक आहे. यासाठी दक्षता समिती नेमण्यात आली असून सर्व केंद्रांवर तसेच ब्लॉक स्तरावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. परीक्षा काळात कोणताही गैरप्रकार होऊ नये यासाठी भरारी पथके आणि बैठी पथके तैनात राहणार आहेत. प्रत्येक परीक्षा केंद्रावर पिण्याचे स्वच्छ पाणी, अखंडित वीजपुरवठा, स्वच्छता, योग्य बैठक व्यवस्था आदी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तालुक्यात एकही संवेदनशील केंद्र नसले तरी प्रत्येक केंद्रावर पोलिस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. निपाणी शहरात आठ, तर ग्रामीण भागात चार परीक्षा केंद्रे असतील. १८ मार्च ते २ एप्रिल या कालावधीत परीक्षा होणार असून रोज सकाळी १० ते दुपारी १.१५ या वेळेत प्रश्नपत्रिका घेतली जाणार आहे. बैठकीस तालुक्यातील सर्व माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक तसेच शिक्षण विभागातील अधिकारी उपस्थित होते.

# जगद्गुरु रेणुकाचार्य जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

कोगनोळी,ता.२७(प्रतिनिधी)-

**बेनाडी (ता. निपाणी) येथील गुरु सिध्देश्वर हिरेमठामध्ये रविवार ता.१ मार्च रोजी जगद्गुरु रेणुकाचार्य जयंती साजरी करण्यात येणार आहे. त्यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.**

या सोहळ्यास श्री क्षेत्र गुड्डापूर येथील शांतवीरेश्वर संस्थान हिरेमठातील १०८ गुरुपाद शिवाचार्य स्वामी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून सोहळ्यानिमित्त मठास पुष्पालंकार करण्यात येणार आहे.शनिवार ता. २८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता कबनूर येथील मुक्ताई महिला भजनी मंडळाचा कार्यक्रम होणार आहे. रविवार ता. १ मार्च रोजी पहाटे ५ वाजता श्री रेणुकाचार्य मूर्तीस रुद्राभिषेक, पूजन व बिलवार्चन पूजा विधी येडूर पाठशाळेच्या विद्यार्थ्यांकडून होणार आहे. सकाळी ११ वाजता रेणुकाचार्यांचा जन्मकाळ सोहळा व बेनाडी येथील श्री निधी भजनी मंडळ आणि आणूर येथील विठू माऊली महिला भजनी मंडळाचा कार्यक्रम होणार आहे. दुपारी १२ वाजता महाप्रसादाचे वितरण करण्यात येणार आहे.तरी बेनाडी व परिसरातील भाविकांनी मठामध्ये उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन वेदमूर्ती उमेश शास्त्री-हिरेमठ व संयोजकांनी केले आहे.



निपाणीःओंकारेश्वरी पाटील हिच्या सत्कार प्रसंगी अमर बागेवाडी,सुनिल पाटील,रविंद्र कोठीवाले,संजय मोळवाडे,इतर.

# निपाणीत ओंकारेश्वरी पाटील हिचा सत्कार

निपाणी,ता.२७(प्रतिनिधी)-

**सीएस म्हणजे कंपनी सेक्रेटरी परीक्षेचा नुकताच निकाल जाहीर झाला.या परीक्षेत निपाणीतील माजी उपनगराध्यक्ष सुनील पाटील आणि हालशुगर संचालिका गीता पाटील यांची मुलगी ओंकारेश्वरी उर्फ दक्षा सुनील पाटील हिने घवघवीत यश संपादन केले.त्याबद्दल तिचा महादेव मंदिरात महादेव यात्रा उत्सव कमिटीच्या वतीने सत्कार करण्यात आला.**

तिचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण निपाणीतील केएलई सीबीएसई स्कूलमध्ये झाले तर महाविद्यालयीन शिक्षण बेळगाव येथील गोगटे कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये झाले आहे.तिने सत्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.याप्रसंगी सुनिल पाटील, महेश बागेवाडी, अमर बागेवाडी, रविंद्र शेट्टी, रविंद्र कोठीवाले, मल्लिकार्जुन गडकरी,रावसाहेब वसेदार,चिंतामणी वाळवे, गणेश खडेद, सागर भोसले, डॉ.महेश ऐनापूरे, संजय मोळवाडे,अनिल पाटील, चंद्रकांत चौगुले,रविंद्र चंद्रकुडे, अमोल चंद्रकुडे, बाबू साजन्नावर, आनंद पणदे,सुकूमार गुरव,रावसाहेब पाटील,सोमशेखर कोठीवाले, राजशेखर कोठीवाले, सुधीर जाधव यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. सुत्रसंचालन इराण्णा शिरगावे यांनी केले तर आभार मारूती कुन्नूरे यांनी मानले.

# फेब्रुवारीतच उन्हाचा तीव्र तडाखा

कोगनोळी,ता.२७(प्रतिनिधी)-

**कोगनोळी आणि परिसरात गेल्या काही दिवसांपासून तापमानात सातत्याने वाढ होत असून गुरुवारी कमाल तापमानाने ३१ अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडला आहे. फेब्रुवारी महिन्यातच उन्हाचा चटका जाणवू लागल्याने नागरिक हैराण झाले आहेत. दुपारच्या सुमारास रस्त्यावरील वर्दळ घटल्याचे चित्र दिसून येत आहे.**

**दुपारीच बाजारपेठा ओस; थंडपेयांना वाढती मागणी**

सकाळी काहीसे आल्हाददायक वातावरण असले तरी दुपारी १२ वाजल्यानंतर उन्हाची तीव्रता वाढत आहे. मुख्य रस्ते, बाजारपेठ, आंतरराज्य मार्ग, महामार्ग परिसरात दुपारच्यावेळी तुलनेने कमी हालचाल दिसून येत आहे. अनेकांनी अत्यावश्यक कामे सकाळीच उरकण्यास प्राधान्य दिले आहे.दुपारी रस्त्यावर फक्त गरजेपोटी बाहेर पडणाऱ्यांचीच वर्दळ आहे. उन्हाच्या झळांमुळे दुचाकीस्वार आणि पादचारीत्रस्त झाले आहेत. अनेकांनी डोक्यावर रुमाल, टोपी किंवा स्कार्फ बांधूनच गॉगलचा वापर करत प्रवास सुरु केला आहे. थंड पेये, ऊसाचा रस, लिंबू पाणी, ताक, लस्सी आणि आईस्क्रीम विक्रेत्यांकडे ग्राहकांची गर्दी वाढत आहे.

# मांगूर येथे गॅस किटचे वितरण

बारवाड,ता.२७(वार्ताहर)-

**मांगूर काँग्रेस कमिटी व निपाणी तालुका अनुष्ठान कमिटी अध्यक्ष रमेश जाधव यांनी काँग्रेस कमिटी कार्यकर्त्यांच्या साथीने मांगूरमधील २३ लाभार्थ्यांना उज्वला गॅस योजनेतून गॅस कीट मंजूर करून आणले असून या गॅस किटचे वितरण साईनाथ दूध संघाचे चेअरमन आप्पासो पाटील यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.**

प्रारंभी कलंदर मुल्ला यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी बोलताना अनुष्ठान कमिटी अध्यक्ष रमेश जाधव म्हणाले की, कर्नाटकात काँग्रेस पक्ष सत्तेवर आल्यानंतर सर्व जनतेच्या हितासाठी पंचहमी योजना राबवून महिलांना व जनतेला दिलासा दिला आहे.आणि मांगूर मध्ये आतापर्यंत ५५ व आता २३ लाभार्थ्यांना गॅस मंजूर केले आहेत.तर ७५ गरजू व गरीब लाभार्थ्यांना रेशन कार्ड व भाग्यलक्ष्मी योजना मंजूर करून आणली आहे.तुम्ही सर्वांनी येणाऱ्या सर्व निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांना निवडून देऊन काँग्रेस पक्ष बळकट करावा असे आवाहन केले.यावेळी काँग्रेस कमिटी उपाध्यक्ष अनिल आडके,नागेश बन्ने,आनंदा कोंडिग्रे,संदीप जाधव, दीपक कुराडे,रमजान नदाफ,विजय भोरे,सुनील जळणे, सुरेश पाटील, रवी जाधव, महावीर घोडके,वाशीम नदाफ, बाहुबली पाटील,धोंडीराम कांबळे,सुरेश जाधव,गुंडू हळीजोळे, बंडा जाधव,आप्पा बन्ने यांच्यासह लाभार्थी महिला,काँग्रेस कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते. आभार अनिल आडके यांनी मानले.



गॅस किटचे वितरण प्रसंगी रमेश जाधव यांच्यासह काँग्रेस कार्यकर्ते.

# संकेश्वरात होळी सणाची चाहूल

संकेश्वर,ता.२७(प्रतिनिधी)-

**संकेश्वरात घुमणारा हलगीचा आवाज लोकांना होळी चार-पाच दिवसांवर असल्याची आठवण करून देणारा ठरला आहे.गावातील स्टेशनरी दुकानांत होळीला लागणारी वाद्ये विक्रीसाठी ठेवण्यात आलेली दिसत आहेत.**

येथील जुना पीबी रोडवर होळीला लागणारी वाद्ये विक्रीसाठी उपलब्ध आहेत. चामड्याच्या हलगीचा दर २५० ते १२०० रुपये आहे. फायबरची डफली ( टिमकी ) २०० ते ७०० रुपये असून बुट्टी ताशा ३००, ३५०, आणि ४०० रुपये प्रमाणे विक्री केली जात आहे..चामड्याची वाद्ये टिकाऊ असली तरीही फायबर वाद्यांना युवावर्गात चांगली मागणी राहिली आहे.

# पहिली ते नववीपर्यंतच्या परीक्षा २४ मार्चपासून

निपाणी,ता.२७(प्रतिनिधी)-

**विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षांना दि.२४ मार्चपासून प्रारंभ होणार आहे. दि.६ एप्रिलपर्यंत परीक्षा चालणार आहेत. सरकारी, अनुदानित आणि विनाअनुदानित शाळेतील पहिली ते नववीपर्यंतच्या लेखी व तोंडी परीक्षांचे वेळापत्रक शिक्षण खात्याने जाहीर केले आहे.**

सकाळच्या सत्रात १० ते ११.३० यावेळी लेखी परीक्षा तर दुपारी १२ ते १ या वेळेत तोंडी परीक्षा होणार आहेत.पहिली ते सातवीचे वेळापत्रक-२४ मार्च : प्रथम भाषा,२६ मार्च :शारीरिक शिक्षण,२७ मार्च: गणित, २८ मार्च : द्वितीय भाषा, ३० मार्च : परिसर अध्ययन,१ एप्रिल : तृतीय भाषा, २ एप्रिल : समाज विज्ञान.आठवी ते नववीचे वेळापत्रक २४ मार्च : प्रथम भाषा, २६ मार्च : शारीरिक शिक्षण,२७ मार्च : द्वितीय भाषा, ३० मार्च : गणित, १ एप्रिल : विज्ञान, ४ एप्रिल : तृतीय भाषा,६ एप्रिल : समाज विज्ञान.

# आजऱ्यात घनकचऱ्यासाठी एक कोटीची तरतूद

आजरा,ता.२७(प्रतिनिधी)-

**आजरा नगरपंचायतीने सन २०२६-२७ करीता महसूली व भांडवली जमा असे १५ लाख ८ हजारांचे शिल्लकी अंदाजपत्रक सादर केले. यामध्ये घनकचऱ्यांसाठी एक कोटीची तरतूद करण्यात आली आहे. २ कोटी ५० लाखांचा विशेष वैशिष्ठ्यपूर्ण निधी त्याचबरोबर २ कोटींच्या वैशिष्ठ्यपूर्ण निधीची तरतूदही करण्यात आली आहे. नगरलेखापाल दिलीप चिले व लेखा परिक्षक अमोल पाटील यांनी एकूण ४४ कोटी ५६ हजार रुपयांचे अंदाजपत्रक नगरपंचायत सभागृहापुढे मांडले.**



**दृष्टिक्षेपात अंदाजपत्रक...**

सन २०२६-२७ करिता एकूण महसूल जमा रक्कम रु.४,९८,८२,७९०/- इतकी अपेक्षित असून एकूण महसूली खर्च रक्कम रू.४,९६,२८,७८९/- इतका अपेक्षित आहे.तसेच एकूण भांडवली जमा रक्कम रु.३०,०१,७३,२५०/- इतकी अपेक्षित असून एकूण भांडवली खर्च रक्कम रु.३८,८९,१८,५००/- इतका अपेक्षित आहे. त्यानुसार एकूण अर्थसंकल्प रक्कम रू. ४४,००,५६,०४०/- चा असून रक्कम रू.१५,०८,७५१/- इतकी शिल्लक रक्कम अंदाजित आहे.

**नगरपंचायतीचे १५ लाखांचे शिल्लकी अंदाजपत्रक सादर**

**दुकान गाळ्यांची २५ टक्के भाडेवाढ होणार**

आजरा नगरपंचायतीची अंदाजपत्रका विषयी आज विशेष सभा झाली. नगराध्यक्ष अशोक चराटी सभेच्या अध्यक्षस्थानी होते. उपनगराध्यक्षा सौ. पूजा डोंगरे प्रमुख उपस्थित होत्या.सभेमध्ये उत्पन्न वाढीच्या दृष्टीने नगरपंचायतकडील दुकान गाळ्यांसाठी पंचवीस टक्के भाडेवाढ त्याचबरोबर महीला बालकल्याण, दुर्बल घटक, शिक्षण, क्रीडा, दिव्यांग निधी यामध्ये वाढ सुचविण्यात आली.अंदाजपत्रकात मांडलेल्या काही तरतुदीबाबत नगरसेवकांनी विविध प्रश्न उपस्थित केले. यावेळी नगरसेवक विक्रम पटेकर म्हणाले,वाढीव उत्पन्न दाखवून अंदाज पत्रक फुगवण्यापेक्षा वास्तव उत्पन्न दाखवणे गरजेचे आहे.

नगरसेवक परेश पोतदार म्हणाले, वस्तुस्थितीला धरून अंदाजपत्रकात खर्चाच्या तरतूदी कराव्यात. एकदा भरमसाठ तरतुदी केल्या तर त्या खर्च करण्याला प्राधान्य दिले जाते. त्यामुळे नाहक कांही बाबींवरचा खर्च वाढत जातो. यावेळी डॉ. स्मिता कुंभार यांनी बजेटपूर्व सभा घेण्याची गरज असतांना काही मोजक्या मंडळीना बोलावून बजेटसह विविध बाबीवर चर्चा केल्याचा आरोप करत नाराजी व्यक्त केली. सदर प्रकार हा केवळ योगायोगाने घडला असून कोणालाही पूर्व सूचना दिली गेली नसल्याचे नगराध्यक्ष चराटी यांनी सांगितले. उत्पन्न वाढीच्या दृष्टीने नगरपंचायतीच्या दुकानगाळ्यांच्या भाडेवाढीसह विविध विषयावर स्वतंत्र बैठक घेवून चर्चा करण्याचे ठरले. नगरसेवकांनी अभ्यास दौरा व नगरसेवकांचे मासिक बैठक मानधन वाढवण्याकरीता तरतुद करण्याविषयी सूचविले.

अनिकेत चराटी, परशराम बामणे, निशांत चाँद, सरफराज पटेल यांनी सूचना मांडल्या.कलावती कांबळे, अन्वी केसरकर, रहेमतबी खेडेकर,आसावरी खेडेकर, अश्विनी चव्हाण, निसार लाडजी, डॉ. इंद्रजीत देसाई, असिफ सोनेखान यांच्यासह नगरसेवक, स्वच्छता निरीक्षक अमर कांबळे,पाणीपुरवठा व विद्युत अभियंता मानसी कदम, कर निरीक्षक निहाल नायकवडी, बांधकाम अभियंता प्रविण बैले, वैभव म्हाकवेकर उपस्थित होते. प्रशासकीय अधिकारी निहाल अत्तार यांनी सभेचे कामकाज सांभाळले.



निपाणी:सहकार सप्ताहप्रसंगी ग्राहकांचे स्वागत करताना पदाधिकारी.

# निपाणी महात्मा बसवेश्वर संस्थेत ग्राहक सप्ताह

निपाणी,ता.२७(प्रतिनिधी)-

**सहकार क्षेत्रात अग्रेसर असलेल्या श्री.महात्मा बसवेश्वर क्रेडिट सौहार्द सहकारी संस्थेच्या वतीने २३ फेब्रुवारी २०२६ ते ०३ मार्च २०२६ पर्यंत ग्राहक सप्ताहाचे आयोजन सुरू आहे.**

मुख्य कार्यालयामध्ये सहकाररत्न संस्थेचे संस्थापक चेअरमन, व्हाईस चेअरमन डॉ.सी.बी.कुरबेटी, संस्थेचे चेअरमन किशोर बाली, संचालक डॉ.एस.आर.पाटील, प्रताप पटनशेट्टी, श्रीकांत परमणे, महेश बागेवाडी, सुरेश शेट्टी, अशोक लिगाडे, दिनेश पाटील, राजेश पाटील, सी.ई.ओ एस.के.अदनावर, संचालिका पुष्पा कुरबेटी, विजया शेट्टी, सुवर्णा पटणशेट्टी यांच्या हस्ते उपस्थित ग्राहकांना गुलाब पुष्प व मिठाई वाटून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.संचालक मंडळाच्या हस्ते या सप्ताहामध्ये जे ग्राहक संस्थेत भेट देतात त्यांचाही सत्कार करण्यात येत आहे.

## बारामती अभ्यास दौऱ्यासाठी संस्कृती सुतार, हर्ष वाघमोडेची निवड

चंदुर,ता.२७(वार्ताहर)-

..............................

**कोल्हापूर जिल्हा परिषद शिक्षण विभाग, राष्ट्रीय आविष्कार अभियान अंतर्गत पुणे बारामती अभ्यास दौऱ्यासाठी कन्या व कुमार विद्यामंदिर चंदुरमधील विद्यार्थी संस्कृती दिगंबर सुतार व हर्ष संदीप वाघमोडे यांची निवड करण्यात आली.**



संस्कृती सुतार    हर्ष वाघमोडे

या अभ्यास दौऱ्यामध्ये त्यांना पुणे बारामतीतील ऐतिहासिक स्थळे, शैक्षणिक संस्था आणि तिथल्या सांस्कृतिक वारशाचा अभ्यास करता येणार आहे.विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडावी आणि इतर राज्यातील शिक्षण पद्धती व संस्कृतीचा परिचय व्हावा हा या दौऱ्याचा मुख्य हेतू आहे. या विद्यार्थ्यांची निवड कष्टाचे आणि जिद्दीचे फळ आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अशा संधी मिळणे ही काळाची गरज आहे, असे गौरवोद्गार शाळेच्या मुख्याध्यापिका उल्का गवळी व आप्पासो पुंडफळ यांनी काढले. वर्गशिक्षक सतीश चौगुले, प्रतिभा आदर्शे यांचे मार्गदर्शन लाभले.

# मराठी दिनानिमित्त एकांकिकांना रसिकांची भरभरून दाद

इचलकरंजी,ता.२७-

........................

**येथे आयोजित करण्यात आलेल्या मराठी दिन महोत्सव उपक्रमात पहिल्या दिवशी सादर करण्यात आलेल्या 'ग्वाही' आणि 'घरघर' या दोन भिन्न शैलीच्या एकांकिकांना रसिकांची भरभरून दाद मिळाली आणि मराठी दिन उपक्रमाची उत्साहात सुरुवात झाली.**

येथील मनोरंजन मंडळ,श्री दगडूलाल मर्दा फाउंडेशन,रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी सेंट्रल आणि अ.भा.मराठी नाट्य परिषद इचलकरंजी शाखा यांच्यावतीने तीन दिवसीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.पहिल्या दिवशी एकांकिका उत्सवाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे नगरसेवक उदयसिंह पाटील तसेच ज्येष्ठ रंगकर्मी प्रा.मिलिंद दांडेकर आणि अतुल शहा, घनश्याम सावलानी, सतीश पाटील, राजन मुठाणे व समीर गोवंडे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन आणि नटराज प्रतिमा पूजनाने करण्यात आले. सुरुवातीला स्वागतपर मनोगत सावलानी यांनी केले तर प्रास्ताविक समीर गोवंडे यांनी केले. सूत्रसंचालन व आभार संतोष आबाळे यांनी व्यक्त केले.

उद्घाटनानंतर पहिल्या सत्रात देशभक्त रत्नापाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर या संघाने 'ग्वाही' ही परिणामकारक एकांकिका सादर केली. राजन खान यांच्या कथेचे पवन ठाकरे यांनी नाट्यरूपांतर केले होते तर विशाल चव्हाण यांनी दिग्दर्शन केले होते. एका बेसावध क्षणी सुखी संसार सुरू असलेली गृहिणी पोस्टमनच्या फसवणुकीला बळी पडते. त्यातून निर्माण होणारी गुंतागुंत शेवटी कोर्टाच्या निर्णयातून सुटते आणि ते कुटुंब उद्ध्वस्त होण्यापासून वाचते अशा आशयाची व आपण आपल्या मनाला फसवू शकत नाही हा संदेश देणारी ही एकांकिका होती. यामध्ये अक्षता बारटक्के, पार्थ पाटणे, अभिषेक हिरेमठस्वामी, अर्पिता गजगेश्वर, महेश चौगुले, हंसिका औंधकर, वेदांत डोंगरे, पियुषा खाडे,अनुष्का चव्हाण, समृद्ध मोरे, गायत्री निवळे, निल देवरुखकर व प्रणाली पाटील या कलाकारांनी सहभाग घेतला.



इचलकरंजी : मराठी दिनानिमित्त आयोजित एकांकिका उत्सवाचे उद्घाटन करताना प्रमुख पाहुणे व संयोजक पदाधिकारी.

दुसऱ्या सत्रात सोहन प्रॉडक्शन, कोल्हापूर निर्मित 'घरघर' ही कौटुंबिक तसेच विनोदी शैलीमधील एकांकिका सादर करण्यात आली. माणसाच्या मूलभूत गरजांमध्ये निवारा म्हणून घराची गरज आहे. पण सध्याच्या जगात सामान्य माणसांसाठी हे केवळ स्वप्न बनलेले आहे. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जगण्याचा कसा संघर्ष करावा लागतो याची कथा यामध्ये खुसखुशीत शैलीत मांडण्यात आली. लेखन व दिग्दर्शन प्रमोद पुजारी यांचे होते तर प्रकाश योजना श्रेयस सोनार यांची होती. पार्श्वसंगीत व नेपथ्य सोहन चव्हाण यांचे होते. यामध्ये विकास कांबळे, सई जाधव, यश शिंदे आणि अर्जुन पिसाळ यांनी कलाकार म्हणून सहभाग घेतला. दर्जेदार सादरीकरणामुळे दोन्ही एकांकिकांना प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत टाळ्यांच्या गजरात दाद दिली. येथील श्रीमंत घोरपडे नाट्यगृहात सादर झालेल्या उपक्रमात पहिल्या दिवशी शहर व परिसरातील रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सारस्वत विकास मंडळातर्फे उद्या खाद्य महोत्सवाचे आयोजन

कोल्हापूर,ता.२७(प्रतिनिधी)-

..................................

**कोल्हापूर सारस्वत विकास मंडळातर्फे येत्या रविवार, ता.१ मार्च २०२६ रोजी भव्य खाद्य महोत्सव आयोजित करण्यात येत आहे. हा महोत्सव कोल्हापूर येथील अक्षता मंगल कार्यालय, ताराराणी चौक येथे संपन्न होणार आहे.**

या खाद्य महोत्सवामध्ये पारंपरिक सारस्वतीय तसेच विविध प्रांतातील सारस्वतीय स्वादिष्ट पदार्थ आणि मासे इत्यादींचा आस्वाद घेण्याची संधी नागरिकांना मिळणार आहे. घरगुती चव, खास सारस्वतीय पाककृती, पारंपरिक गोडधोड, स्नॅक्स तसेच विविध प्रकारचे मासे व समुद्री खाद्यपदार्थांचे आकर्षक स्टॉल्स यामध्ये सहभागी होणार आहेत. तसेच विविध कलाकुसर वस्तू स्टॉल असणार आहेत.समस्त कोल्हापूरकर खाद्यप्रेमी नागरिकांनी या महोत्सवाला उपस्थित राहून विविध पदार्थांचा आस्वाद घ्यावा,असे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.



म.गांधी विद्यालयाचे एन.एम.एम.एस. परिक्षेतील यशस्वी विद्यार्थी, मार्गदर्शक शिक्षक व अन्य मान्यवर.

## म.गांधी विद्यालयाचे शिष्यवृत्ती परिक्षेत यश

सरूड,ता.२७(प्रतिनिधी)-

..............................

**रयत शिक्षण संस्था संचलित महात्मा गांधी विद्यालय, सरूड या शाळेच्या विद्यार्थ्यांनी सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात घेण्यात आलेल्या एन.एम.एम.एस. (राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती) परिक्षेत यश संपादन केले आहे.**

या परिक्षेसाठी शाळेतील एकूण ३६ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी २० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, विशेष बाब म्हणजे १० विद्यार्थ्यांनी १०० पेक्षा अधिक गुण प्राप्त केले आहेत. हे यश शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेचे व विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण परिश्रमांचे द्योतक आहे.

श्रेयश दळवी, श्रावणी कुंभार, शरद डवंग, स्वराज पाटील, साई रेडेकर, वैष्णवी पाटील, वैदही सुतार, स्वराज लाड, शरयू परीट, स्वराज दिंडे या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच पालकांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

# श्रमशक्तीतून समृद्ध गावाचे स्वप्न साकार होईल

### सरपंच सौ.प्रियांका पाटील यांचे प्रतिपादन

कोल्हापूर,ता.२७(प्रतिनिधी)-

..............................

**विद्यार्थी दशेत मिळालेले श्रमसंस्कार हे आयुष्याची खरी शिदोरी असते. 'नॉट मी बट यु' या भावनेतून जेव्हा तरुण गावाच्या मातीत मिसळतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने ग्रामविकासाला गती मिळते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये रुजलेली ही सामाजिक बांधिलकी भविष्यात सुसंस्कृत समाज घडवेल व त्यातूनच समृध्द गावाचे स्वप्न साकार होईल, असे प्रतिपादन पाचगावच्या सरपंच सौ. प्रियांका पाटील यांनी केले.**



डी.वाय.पाटील कॉलेजच्या कार्यक्रमप्रसंगी पाहुण्या सरपंच सौ.प्रियांका पाटील यांचे स्वागत करताना प्रमुख मान्यवर.

डी.वाय.पाटील अभिमत विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनीअरिंग अँड मॅनेजमेंट आणि मेडिकल कॉलेजच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप प्रसंगी त्या बोलत होत्या.

यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.विश्वनाथ भोसले म्हणाले, विद्यापीठाचे सर्व विद्यार्थी समाजसेवेला आपले आद्य कर्तव्य मानतात. स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक ऐक्य जपण्यासाठी हे तरुण राष्ट्रसेवक म्हणून सदैव तत्पर राहतील. मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ.राजेश ख्यालप्पा म्हणाले, ग्रामविकासासोबतच आरोग्य साक्षरता अत्यंत महत्त्वाची आहे. वैद्यकीय आणि अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन ग्रामीण भागात आरोग्यविषयक जागृती, स्वच्छतेबाबतच ग्रामस्थांचे प्रबोधन करून एक आरोग्यसंपन्न गाव घडवण्याच्या दृष्टीने महत्वाचे पाऊल टाकले आहे. कार्यक्रमास उपसरपंच दिपाली गाडगीळ, केंद्र शाळा मुख्याध्यापक अशोक पाटील, विद्यामंदिर शांतीनगरच्या मुख्याध्यापिका मंगल देवठाणेकर, डॉ.अद्वैत राठोड, डॉ. रेणुका तुरंबेकर, डॉ. पुरुषोत्तम पेटारे, डॉ.जगन्नाथ शेटे, सर्व स्वयंसेवक, प्राध्यापक व ग्रामस्थ उपस्थित होते. या शिबिरासाठी कुलपती डॉ.संजय डी.पाटील, आम. सतेज डी.पाटील, ऋतुराज पाटील, पृथ्वीराज पाटील व डॉ.राकेश कुमार शर्मा यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

## पाणी पुरवठा विभागाच्यावतीने थकीत व अनधिकृत कनेक्शनवर कारवाई

कोल्हापूर,ता.२७(प्रतिनिधी)-

..................................

**कोल्हापूर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा विभागाकडील वितरण शाखा व पाणीपट्टी शाखा यांच्यामार्फत थकबाकी व अनधिकृत कनेक्शन धारकांवर संयुक्त कारवाई करण्यात येत आहे.**

शहर तसेच ग्रामीण भागातील मोठे थकबाकीदार तसेच अनधिकृत नळ कनेक्शनधारकांचे नळ कनेक्शन खंडीत करण्याची कारवाई पाणी पुरवठा विभागामार्फत करण्यात येत आहे. यामध्ये ता.२६ फेब्रुवारी २०२६ अखेर थकबाकी असलेली ६४ कनेक्शन व ३३ अनधिकृत कनेक्शन खंडीत करुन रोख रक्कम रुपये ५ लाख ६१ हजार ४२० रुपये इतकी थकीत रक्कम वसुल करण्यात आली.

सदरची कारवाई शहरातील लक्षतीर्थ वसाहत, चंबुखडी, शिगंणापुर, मातंग वसाहत, झोपडपट्टी एरिया, भगतसिंग वसाहत, राजारामपुरी ७, ८ व ९ वी गल्लीमध्ये, झोपडपट्टी एरिया, गंगावेश, दत्तगल्ली, पाडळकर मार्केट परिसर, लक्ष्मीपुरी, जय शिवराय चौक, श्रेयश पार्क, गजानन महाराजनगर, कावळा नाका परिसर, संजय गांधी सोसायटी, गोल्डस जिम, ताराबाई पार्क इत्यादी भागामध्ये कारवाई करुन कनेक्शन खंडीत करण्यात आली.

## महिलांनी उद्योगशील बनावे-सौ.महाडिक

कोल्हापूर,ता.२७(प्रतिनिधी)-

..................................

**महिलांना यशस्वी उद्योजक बनवण्यासाठी भागीरथी संस्था निश्चितच पाठबळ देईल. शासनाच्या अनेक अर्थसहाय्य करणाऱ्या योजना आहेत. त्यांचा लाभ मिळवून देण्याबरोबरच, भागीरथी पतसंस्थेच्या माध्यमातून महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्यासाठी प्रयत्नशील आहे. त्याचा लाभ घेवून महिलांनी उद्योगशील बनावे, असे आवाहन भागीरथी संस्थेच्या अध्यक्षा सौ.अरूंधती महाडिक यांनी केले.**



भागीरथी संस्थेच्यावतीने आयोजित एकदिवसीय कार्यशाळेप्रसंगी सौ.अरुंधती महाडिक व अन्य महिला.

भागीरथी महिला संस्थेच्या वतीने, महिलांसाठी कौशल्यातून स्वावलंबन आणि आर्थिक सक्षमीकरण या एक दिवसीय कार्यशाळेत सौ.महाडिक बोलत होत्या. प्रारंभी लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या जीवनप्रवासाबाबत माया देसाई यांनी माहिती दिली. प्रशिक्षीका सुजाता नाईक यांनी महिलांना विविध प्रकारच्या बॅगा आणि पर्स तयार करण्याचे प्रशिक्षण दिले.

सहभागी महिलांकडून अशा वस्तू बनवून घेण्यात आल्या. या कार्यशाळेला शरयू भोसले, माया देसाई, डॉ. डी. आर. इंगवले, डॉ.सोनल मंगल यांच्यासह भागीरथी संस्थेच्या सभासद उपस्थित होत्या.


मनोरंजन मंडळ | श्री दगडूलाल मर्दा फौंडेशन
रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी सेंट्रल
अ.भा.मराठी नाट्य परिषद इचलकरंजी शाखा
कविश्रेष्ठ कुसुमाग्रज जन्मदिन
मराठी दिन महोत्सव
आजच शनिवार २८ फेब्रुवारी २०२६ रात्री ९.१५ वाजता | श्रीमंत घोरपडे नाट्यगृह, इचलकरंजी





हिमशिखा, पुणे प्रस्तुत...
महाराष्ट्रातील दोन महत्वाचे लोककला प्रकार...
कीर्तन आणि लावणी - बतावणी यांचा मिलाप.
संत परंपरा, संत चरित्रांचं, विचारांचं आजच्या जगाशी नातं काय याचा धांडोळा घेणारा संगीतमय प्रवास...
लेखन व दिग्दर्शन - ऋचिका खोत   संशोधन सहाय्य - स्वामीराज भिसे
दिग्दर्शन सहाय्य - ज्ञानराज होले   नृत्य दिग्दर्शन - वैष्णवी निंबाळकर
संगीत संयोजन व संगीत साथ - जगन्नाथ शिंदे, समीरन बर्डे, ज्ञानराज होले
कलाकार - ऋचिका खोत, स्वामीराज भिसे
उपक्रम सहकार्य :
| म.सा.प. इचलकरंजी शाखा | मनोरंजन वाचनालय, इचलकरंजी.
सहप्रायोजक
TJS सोनेरी क्षणांसाठी मे. तुळजाराम सुरचंद शहा | LOKARE'S PAWAN PROCESSORS SINCE 1984
सर्व रसिकांना सस्नेह निमंत्रण



श्रीहरी   शुक्रवार, ता.२७/०२/२०२६ पासून दुपारी १ व ४ वाजता
मस्त रोमँटीक हिंदी चित्र
नशिली भाभी
प्रौढांसाठी   रोज १ खेळ- ७ वा.
A रसियाँ A

श्रीदत्त   शुक्रवार, ता. २८ पासून रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
ल्युसी क्युज लेडीज
A फक्त प्रौढांसाठी A

पंचवटी DOLBY 7.1 DIGITAL PLUS   शुक्रवार २७ पासून
ॲडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरू राहील
ऑनलाईन बुकींग book my show
अधिक माहितीसाठी संपर्क : 9623150103
रोज ४ खेळ *१२*३*६*९ वा.




द केरला स्टोरी-२ (हिंदी)

५६ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत   भाग्यरेखा DOLBY DIGITAL
नवीन डॉल्बी डिजिटल साऊंड सिस्टीम
गर्दीचा २ रा आठवडा
रोज ४ खेळ *१२*३*६*९ वा.



पुन्हा एकदा साडे माडे तीन (मराठी)

गुरु   शुक्रवार ता.२७ पासून
ऑनलाईन बुकींग book my show
१२.३० * ३.३० व ९.३० वाजता
सैराट नंतरचा सुपरहिट मराठी चित्रपट




रुबाब (मराठी)

सायं.६.३० वा.
प्रत्येक राष्ट्रभक्ताने पहावाच असा अप्रतिम चित्रपट




शतक (हिंदी चित्रपट)

कल्पना   लेजर प्रोजेक्टरसहीत   शुक्रवार ता. २७ पासून
रोज २ खेळ १२ व ३ वा.
सध्याच्या वस्तूस्थितीला अनुसरून सत्य घटनेवर आधारीत थरारक कथा भाग १ पेक्षाही जबरदस्त स्टोरी भाग२




केरला स्टोरी भाग-२ (हिंदी चित्रपट)

रोज २ खेळ ६ व ९ वा.




तेरे नाम (हिंदी चित्रपट)

RK CINEMA 3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070   book my show




" द केरला स्टोरी 2 " - हिंदी ( U/A 16+ )
10:00 AM, 11:00 AM, 12:30 PM, 01:30 PM
03:30 PM, 04:30 PM, 06:30 PM, 07:30 PM
09:45 PM, 10:30 PM
" ओ' रोमियो " - हिंदी ( A ) 11:30 AM, 06:15 PM
" तेरे नाम " - हिंदी ( U/A ) 03:00 PM, 09:15 PM
आता कोणताही शो पहा 70/-* पासून पुढे

फोर्च्युन सिनेफ्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on book my show
OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क +91 88 88 01 51 11




द केरला स्टोरी २ (HIN) (U/A)
10.00am, 12.30, 03.00, 04.15, 05.30, 06.45, 08.00, 09.15, 10.30pm
ओ रोमियो (HIN) (A)
10.30pm
अंग अंग सुनबाई! काय म्हणताय सूनबाई (MAR) (U/A)
05.00pm
क्रांतीज्योती विद्यालय मराठी माध्यम (MAR) (U/A)
07.45pm
शतक (HIN) (U)
10.30am
आज पहा कोणताही शो फक्त 60 रु. मध्ये.
तसेच पेप्सी आणि पॉपकॉर्न वरती मिळवा 50% सूट..


## हुपरीत रविवारी हिंदु राष्ट्र जागृती सभा

हुपरी,ता.२७(वार्ताहर)-

..............................

**छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्शावर धर्माधिष्ठित हिंदु राष्ट्र स्थापन करण्याच्या उद्देशाने, रविवार, ता.१ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता हुपरी येथील हुतात्मा स्मारक येथे भव्य हिंदु राष्ट्र-जागृती सभेचे आयोजन करण्यात आले आहे.**

या सभेला भाग्यनगरचे आमदार आणि श्रीराम युवा सेनेचे संस्थापक टी. राजासिंह यांची प्रमुख उपस्थिती असेल. त्यांच्यासह सनातन संस्थेच्या स्वाती खाडये आणि हिंदु जनजागृती समितीचे राज्य संघटक सुनील घनवट मार्गदर्शन करतील. देशावर आणि हिंदु धर्मावर होणाऱ्या आघातांविषयी जागरूकता निर्माण करणे तसेच भारताला हिंदु राष्ट्र घोषित करण्यासाठी हिंदूंना एकत्रित करणे, हा या सभेचा मुख्य उद्देश आहे,

या सभेच्या प्रचारासाठी शनिवार, २८ फेब्रुवारीला सकाळी ९.३० वाजता जवाहर चौपाटी येथून भव्य वाहनफेरी काढण्यात येणार असून शिवमूर्ती, माळभाग येथे तिची सांगता होईल. या सभेला आणि वाहनफेरीला हिंदूंनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन हिंदु जनजागृती समिती आणि स्थानिक संघटनांनी केले आहे.

# दावोस करारातून रोजगार निर्मितीची आकडेवारी जनतेसमोर ठेवावी

## आम.जयंत पाटील यांची मागणी; विविध मुद्द्यांकडे सरकारचे वेधले लक्ष

ईश्वरपूर,ता.२७(प्रतिनिधी)-



**राज्य सरकारने दावोस येथे १८ देशातील विविध कंपन्यांशी ३० लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार केले आहेत. त्यातून राज्यातील ४० लाख युवकांना रोजगार मिळणार असल्याचे राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात सांगितले आहे. मग गेल्या ३-४ वर्षात दावोस येथे झालेल्या करारातून युवकांना किती रोजगार मिळाला? याची आकडेवारी सरकारने जनतेसमोर ठेवावी, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते,माजी मंत्री आ.जयंत पाटील यांनी केले.**

आ.पाटील यांनी राज्यपालांच्या अभिभाषणानंतर विधानसभेच्या सभागृहात बोलताना विविध मुद्द्यांवर भाष्य केले. राज्यपालांच्या अभिभाषणात स्व.अजितदादांच्या निधनाबद्दल चकार शब्द नसल्याबद्दल त्यांनी प्रथम खंत व्यक्त केली. राज्यपालांच्या भाषणात दरवेळी महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाचा उल्लेख करायचा आणि प्रश्न वाऱ्यावर सोडायचा, हे योग्य नाही. राज्याचे मुख्यमंत्री हे वकील आहेत, त्यांचे सर्वांशी चांगले संबंध आहेत. त्यांनी हा प्रश्न पटलावर आणून हा प्रश्न मार्गी लावून सीमावाशियांना दिलासा द्यावा,असे भाष्य केले. यावेळी त्यांनी मेडिकल कॉलेजमध्ये सीमा भागातील विद्यार्थ्यांसाठी किमान ३० जागा राखीव ठेवाव्यात, अशी मागणीही केली.

आ.पाटील आपल्या भाषणात म्हणाले, राज्यपालांच्या अभिभाषणात आपल्या महान व्यक्तिमत्त्वांचा उल्लेख केला जातो. मात्र त्यांचे विचार स्विकारले जातात का? पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी मणिकर्णिका येथे बांधलेला घाट उत्तर प्रदेश सरकारने पाडला आहे. मुख्यमंत्री यांनी स्वतः लक्ष घालून हा घाट पुन्हा बांधण्यात यावा आणि याची भरपाई उत्तर प्रदेश सरकारकडून केली जायला हवी. आपण भगवान बिरसा मुंडांचे नाव घेता,मात्र आदिवासी समाजासाठी सरकारने काय केले? याचा उल्लेख अभिभाषणात कुठेच नाही.

आ.पाटील म्हणाले,नाशिक येथील कुंभ मेळ्यास २५ हजार कोटी रुपयांच्या खर्चास मंजुरी दिली आहे. उत्तर प्रदेशमध्ये झालेल्या खर्चा पेक्षा हा खर्च ५ हजार कोटी रुपयांनी जादा आहे. या कुंभ मेळ्याची विविध कामे देताना ती दुसऱ्या राज्यातील कंत्राट दारांना न देता ती राज्यातील कंत्राटदारांना देण्यात यावीत. या कुंभ मेळ्याच्या खर्चात भ्रष्टाचार होत असल्याची सामान्य माणसांना शंका आहे. सध्या शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यास आणि महिलांना पंधराशेचे एकविसे रुपये करायला पैसे नाहीत. गेल्या कुंभ मेळ्यात सीसीटीव्हीचे काम दहा कोटी रुपयात मात्र आता ते काम तीनशे कोटी रुपयावर गेले आहे. त्यांचे स्पष्टीकरण सरकारने द्यायला हवे.

आ.पाटील पुढे म्हणाले, आपण ''महाराष्ट्र विद्यार्थी सुरक्षा संरक्षण आणि मानसिक कल्याण धोरण बनविले. मात्र महाराष्ट्रातच सर्वाधिक विद्यार्थ्यांच्या आत्महत्या सुरू झालेल्या आहेत. मैदानी खेळ बंद झाले आहेत. मोबाईलचा वापर वाढला. महाराष्ट्रातील तरुण पिढीला पुस्तके हातात देण्याचं काम आपण केलं पाहिजे. सर्व शाळांमध्ये वाचन संस्कृती रुजवली पाहिजे. मुंबई- पुणे एक्सप्रेस हायवेवरील वाहतूक कोंडीवर सरकारने लक्ष द्यावे. कर्जत-शिरूर रस्त्याच्या धूळखात पडलेल्या प्रस्तावावर सरकारने विचार करावा. यावेळी त्यांनी राज्यातील विविध मुद्द्यावर अभ्यास पूर्ण भाष्य करून सरकारचे लक्ष त्याकडे वेधून घेतले.

### नागपूर-गोवा शक्तीपीठ महामार्गावर जोरदार हल्लाबोल

**मुख्यमंत्री सांगतात, शक्तीपीठ महार्गाला कोणाचा विरोध नाही. सगळ्या जिल्ह्यातील लोक या महामार्गाचे स्वागत करत आहेत. मग शक्तीपीठ महामार्गाचे रेखांकन का बदलले? याचे उत्तर त्यांनी द्यावे. माझ्या मतदारसंघात कोणतेही मोठे तीर्थस्थान नाही. आमच्या तालुक्यातील जमीन ओलीताखाली आली आहे. एक इंचभरही माळरान नाही. मग आमच्या वाळवा तालुक्यातून हा महामार्ग नेण्याचा अट्टाहास का? निजाम शाहीच्या विरोधात लढणाऱ्या परभणी जिल्ह्यात महायुतीच्या माध्यमातून पुन्हा निजामशाही अस्तित्वात आली आहे,असे लोकांना वाटू लागले आहे. शक्तीपीठ महामार्गाच्या विरोधात आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांचीच धरपकड सरकारने केली.**

## थोडक्यात

### शिराळा तालुक्यात महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन

शिराळा,ता.२७(प्रतिनिधी)-

**महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या निर्देशानुसार शिराळा तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत तालुक्यातील सर्व मंडळ स्तरावर शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार शामला खोत -पाटील यांनी दिली आहे.**

या अभियानाची सुरुवात ७ मार्च २०२६ रोजी चरण मंडळ येथे आयोजित शिबिराने होणार आहे. त्यानंतर पुढील १४ दिवसांमध्ये मंडळ स्तरावर विविध गावांमध्ये शिबिरे घेण्यात येणार आहेत. तसेच १५ मार्च २०२६ रोजी तालुकास्तरीय शिबिराचे आयोजन करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.या शिबिरांचा मुख्य उद्देश म्हणजे सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व महिलांच्या महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित समस्या तात्काळ सोडविणे हा आहे. नागरिकांना विविध शासकीय सेवा व योजना एकाच ठिकाणी उपलब्ध करून देत 'लोकाभिमुख प्रशासन' हा उपक्रम प्रत्यक्षात राबविण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

### मिरजेत रविवारी नामदेव चैतन्य शब्दांगण साहित्य संमेलन

मिरज,ता.२७(प्रतिनिधी)-

**दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा व शब्दांगण साहित्यिक व सांस्कृतिक व्यासपीठ, मिरज यांच्यावतीने आयोजित १५ वे नामदेव चैतन्य शब्दांगण साहित्य संमेलन रविवार,ता. १ मार्च रोजी दुपारी ३ वाजता आय.एम.ए. हॉल मिरज येथे होणार आहे.**

ज्येष्ठ साहित्यिक मोहन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संमेलन होत आहे. यावेळी कवी संमेलन, पुस्तक प्रकाशन व पुरस्कार वितरण अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. सुरुवातीस कवयित्री लता ऐवळे कदम यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन होणार आहे. महापालिका उपायुक्त स्मृती पाटील यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. डॉ. रियाज मुजावर हे स्वागताध्यक्ष आहेत. डॉ. शिरीष चव्हाण, डॉ. विनोद परमशेट्टी, डॉ.अनिल मडके,अविनाश सप्रे, गौतमीपुत्र कांबळे, माजी महापौर विजयराव धुळूबुळू, नगरसेवक संजय मेंढे, निरंजन आवटी, मोहन वाटवे, गणेश माळी, करण जामदार,अतहर नायकवडी,अपर्णा शेटे, विद्याताई नलवडे उपस्थित राहणार असल्याची माहिती शब्दांगण संस्थेचे अध्यक्ष डॉ. विजय माने यांनी दिली.



संदीप कुडचीकर यांचा सत्कार करताना विक्रमसिंह मोहिते, छन्नुसिंग मोहिते आणि इतर मान्यवर.

### विद्यार्थ्यांना पालकांच्या कष्टाची जाणीव हवी-कुडचीकर

आष्टा,ता.२७(प्रतिनिधी)-

**आई वडिलांनी आपल्या पालनपोषणासाठी, शिक्षणासाठी घेतलेल्या कष्टांची, खाल्लेल्या खस्तांची जाणीव ठेवून विद्यार्थ्यांनी वाटचाल केली पाहिजे,असे प्रतिपादन युवा प्रबोधनकार वक्ते संदीप कुडचीकर यांनी केले.**

ए.व्ही.एम. इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, तळसंदे येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विक्रमसिंह मोहिते, सचिव छन्नुसिंग मोहिते,आरंभ अकॅडमीचे संस्थापक अजय वसगडेकर, अक्षय दशवंत,पालक प्रतिनिधी वैशाली जाधव, तुषार भिलारे,प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका एम.पी.जाधव, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका आर.एस.पाटील उपस्थित होते.मान्यवरांच्या हस्ते शिक्षक वृंद, कर्मचारी आणि पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी अजय वसगडेकर यांनी आजची बदलती शिक्षण प्रणाली यावर मार्गदर्शन केले.



सांगली: येथे संत गाडगे महाराज पतसंस्थेचे संचालक रमेश यादव यांना समाज भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करताना जिल्हाधिकारी अशोक काकडे, समवेत अन्य मान्यवर.

### समाज भूषण पुरस्काराने रमेश यादव यांचा सन्मान

शिराळा,ता.२७(प्रतिनिधी)-

**सांगली येथे संत गाडगे महाराज यांच्या १५० वी जयंतीचे औचित्य साधून महाराष्ट्र परीट (धोबी) सेवा मंडळ, सांगली जिल्ह्याच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'समाज भूषण पुरस्कार' व गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ कार्यक्रम पार पडला.**

यावेळी संत गाडगे महाराज नागरी सहकारी पतसंस्थेचे संचालक रमेश यादव शिराळा यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल समाज भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.सांगलीचे जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्या हस्ते हा सन्मान सोहळा संपन्न झाला.यावेळी अतिरिक्त आयुक्त राहुल रोकडे,महाराष्ट्र परीट (धोबी) सेवा मंडळाचे प्रदेश उपाध्यक्ष मनोहर साळुंखे, अनिल साळुंखे, महिला प्रदेश उपाध्यक्ष सुनिता राक्षे, सुमन परीट, राजकीय आघाडी सदस्य विनायकराव यादव, जिल्हाध्यक्ष संजय साळुंखे, महिलाध्यक्षा शर्मिला शिंदे, अशोक शिंदे, संत गाडगे महाराज पतसंस्थेचे चेअरमन रघुनाथ जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

# आ.भोसलेंच्या प्रयत्नातून कराडच्या १३५ भजनी मंडळांना अनुदान

कराड,ता.२७(प्रतिनिधी)-

**कराड दक्षिणेतील सुमारे १३५ भजनी मंडळांना प्रत्येकी २५ हजार रूपयांप्रमाणे एकूण ३३ लाख ७५ हजार रूपयांचे अनुदान मंजूर झाले. डॉ.अतुल भोसले यांच्या प्रयत्नांमुळे हे अनुदान मिळाले.**



राज्याच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या माध्यमातून अनुदानाची रक्कम लवकरच भजनी मंडळांच्या खात्यावर वर्ग होणार आहे.महाराष्ट्राच्या सांस्कृतिक कार्य विभागाकडून सांस्कृतिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांना अनुदान दिले जाते. भाजप महायुती सरकारने गणेशोत्सवाला महाराष्ट्राचा राज्य महोत्सव म्हणून दर्जा दिला आहे. यातंर्गत भजनी मंडळांना भजन साहित्य खरेदीसाठी २५ हजार रूपयांचे अनुदान देण्याची घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री अॅड.आशिष शेलार यांनी केली.त्यानुसार कराड दक्षिणमधील जास्तीतजास्त भजनी मंडळांना या अनुदानाचा लाभ मिळावा, यासाठी आ.डॉ.भोसले यांनी विशेष मोहीम राबवली.भजनी मंडळांच्या ऑनलाईन नोंदणीसाठी त्यांनी प्रयत्न केले. या माध्यमातून नोंदवलेल्या तब्बल १३५ भजनी मंडळांना प्रत्येकी २५ हजार रूपयांप्रमाणे एकूण ३३ लाख ७५ हजार रूपयांचे अनुदान मंजूर झाले. लाभार्थी भजनी मंडळांच्या खात्यात लवकरच ही रक्कम जमा होणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली.

# महाबळेश्वर अर्बन बँकेच्या अध्यक्ष,उपाध्यक्षांची बिनविरोध निवड

## अध्यक्षपदी बावळेकर तर उपाध्यक्षपदी शारवान

महाबळेश्वर,ता.२७(प्रतिनिधी)-

**महाबळेश्वर तालुक्याची अर्थवाहिनी असलेल्या दि महाबळेश्वर अर्बन को. ऑप. बँकेच्या अध्यक्षपदी जेष्ठ संचालक चंद्रकांत उर्फ सी. डी. बावळेकर यांची व उपाध्यक्षपदी युवा संचालक नदीम शारवान यांची बिनविरोध निवड पार पडली. यावेळी नवनियुक्त अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या सत्कारासाठी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.**



महाबळेश्वर अर्बन बँकेच्या अध्यक्ष,उपाध्यक्ष निवडीवेळी उपस्थित संचालक व अन्य मान्यवर.

दि महाबळेश्वर अर्बन को-ऑप बँकेचे चेअरमन समीर सुतार,व्हा चेअरमन शरद बावळेकर यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त होणाऱ्या या पदाच्या निवडीसाठी बँकेच्या सभागृहात विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. सहाय्यक निबंधक तथा अध्यासी अधिकारी अनुराधा पंडितराव यांच्या मार्गदर्शनाखाली प्रमोद चतुर,राजेश आंबेवाडकर व सुहास आंब्राळे यांच्या उपस्थितीत या विशेष सभेस सुरुवात झाली.अर्ज भरण्याच्या मुदतीत अध्यक्ष पदासाठी चंद्रकांत दगडू बावळेकर व उपाध्यक्ष पदासाठी नदीम शारवान या दोघांचे अर्ज आल्याने निवडणूक अध्यासी अधिकारी अनुराधा पंडितराव यांनी अध्यक्ष पदी चंद्रकांत दगडू बावळेकर व उपाध्यक्ष पदी नदीम शारवान यांची बिनविरोध निवड झाल्याची अधिकृत घोषणा करून नूतन अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा शाल व पुष्पगुच्छ देवून सत्कार केला.ज्येष्ठ संचालक राजेश कुंभारदरे यांनी मनोगत व्यक्त केले.

या निवडीवेळी मावळते अध्यक्ष समीर सुतार,शरद बावळेकर,ज्येष्ठ संचालक राजेश कुंभारदरे, जावेद वलगे,सतीश ओंबळे,संपत धोंडीबा जाधव,मनीषा पारठे,अनिल साळुंखे,प्रशांत कात्रट, अॅड. विजयकुमार दस्तुरे मुख्य व्यवस्थापक फकीर वलगे आदी मान्यवर उपस्थित होते.

# शिराळा तालुक्यात बिबट्यांची वाढती दहशत

## शेतकरी व ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण

शिराळा,ता.२७(प्रतिनिधी)-

**शिराळा तालुक्यात बिबट्यांची संख्या आणि वावर लक्षणीय वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या काही दिवसांत जनावरांवर हल्ल्यांच्या घटना वाढल्या असून शेतीकामावरही त्याचा परिणाम होत आहे. डोंगर, रान आणि उसाच्या शेतांमध्ये बिबट्यांचा मुक्त वावर वाढल्याने शेतकऱ्यांना शेतात काम करणे धोकादायक ठरत आहे.**



तालुक्यात सुमारे ६०० हून अधिक बिबटे व त्यांच्या पिल्लांचा वावर असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ऊसतोडीच्या हंगामात उसाच्या फडात लपून बसलेले बिबटे अचानक समोर येत असल्याने मजूर आणि शेतकरी धास्तावले आहेत. काही ठिकाणी मानवी वस्तीजवळही बिबटे दिसून आल्याच्या घटना घडल्या आहेत.अलीकडेच काही गावांमध्ये जनावरांवर हल्ले झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. त्यामुळे पशुपालकांचे मोठे नुकसान होत आहे. तसेच काही दिवसांपूर्वी एका बालकावर हल्ल्याची घटना घडल्याने ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. ज्या ठिकाणी हल्ला झाला, त्या परिसरात पुन्हा बिबट्याचे दर्शन झाल्याचे सांगण्यात येत आहे.स्थानिक नागरिक आणि शेतकरी यांनी वनविभागाकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. बिबट्यांचा बंदोबस्त करावा, पिंजरे लावावेत तसेच चांदोली अभयारण्य परिसरात प्रभावी कुंपण उभारावे, अशी मागणी होत आहे.

दरम्यान, शिराळा वनविभागाकडे सक्षम अधिकारी, प्रशिक्षित मनुष्यबळ आणि आधुनिक यंत्रसामग्रीचा अभाव असल्याची टीका होत आहे. हल्ल्यांच्या घटना घडल्यानंतरच हालचाली केल्या जात असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.बिबट्यांच्या वाढत्या हालचालींमुळे शेतकरी, मजूर आणि ग्रामस्थांमध्ये भीतीचे सावट पसरले असून प्रशासनाने ठोस पावले उचलण्याची गरज व्यक्त होत आहे.

# शंकर पाटील हे अस्सल अनुभूतीचे लेखन करणारे लेखक

## डॉ.रफिक सुरज यांचे प्रतिपादन

इचलकरंजी,ता.२७-

**ग्रामीण साहित्य अधिक जीवनसन्मुख करण्यासाठी अनेक लेखकांनी प्रयत्न केले.त्यापैकी शंकर बाबाजी पाटील आणि शंकर खंडू पाटील हे दोन महत्त्वाचे लेखक होते. त्यांनी निसर्ग हे मुख्य पात्र मानून अस्सल अनुभूतीचे लेखन केले. तसेच श्रोत्यांना मनमुराद हसवणारे कथाकथनही केले. बदलत्या मराठी ग्रामीण कथेचे हे दोघे शिल्पकार होते, असे मत ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ.रफिक सुरज यांनी व्यक्त केले.**




समाजवादी प्रबोधिनी येथील व्याख्यानात बोलताना डॉ.रफिक सुरज.

येथील समाजवादी प्रबोधिनीच्या प्रबोधन वाचनालयाच्या वतीने कविवर्य वि.वा.शिरवाडकर जन्मदिन अर्थात मराठी भाषा गौरव दिन आणि शंकर बाबाजी पाटील व शंकर खंडू पाटील या थोर साहित्यिकांच्या जन्मशताब्दीनिमित्त आयोजित व्याख्यानात 'ग्रामीण कथेचे दोन शिल्पकार' या विषयावर ते बोलत होते. प्रसाद कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. डॉ.एफ.एम. पटेल यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी अन्वर पटेल यांनी तयार केलेल्या साहित्यिक शंकर बाबाजी पाटील यांच्या जीवन कार्याची ओळख करून देणाऱ्या चित्ररूप परिचय मालिकेचे प्रदर्शन लावण्यात आले होते.

या कार्यक्रमास बंडोपंत फडणीस, सुजित सौंदत्तीकर, अशोक केसरकर ,प्रल्हाद मेटे, राजन मुठाणे, बजरंग लोणारी,भरमा कांबळे, पांडुरंग पिसे,महेंद्र जाधव, प्रा.राकेश शेटके, वैशाली नायकवडी,दयानंद लिपारे, रामभाऊ ठिकणे, रिटा रॉड्रिक्स, उज्वला जाधव, अजित मिणेकर, धुळगोंडा पाटील, शकील मुल्ला , बाबासाहेब कदम, जतीन पोतदार, शिवाजी शिंदे, के. एम. पाटील, विनोद जाधव, शिवाजी शिंदे यांच्यासह साहित्य रसिकांच्या मोठा प्रतिसाद मिळाला. सचिन पाटोळे यांनी आभार मानले.

### नागराळे येथे स्वच्छ जल, स्वच्छ मन अभियान संपन्न

कुंडल,ता.२७(वार्ताहर)-

**नदी ही केवळ जलधारा नसते, ती जीवनाची वाहिनी असते या भावनेतून स्वच्छ जल, स्वच्छ मन या अभियानाचा चौथा टप्पा पलूस तालुक्यातील नागराळे (ता. पलूस) येथील कृष्णा नदीघाटावर पार पडला.**

सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिता रमितजी यांच्या मार्गदर्शनाखाली देशातील २५ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतील ९३० शहरांमध्ये १६०० हून अधिक ठिकाणी हा उपक्रम राबविला. सुमारे १२ लाख स्वयंसेवकांनी या स्वच्छता अभियानात सहभाग घेतला. सांगली जिल्ह्यातील १७ शाखांमध्ये जलस्वच्छता करण्यात आली. नागराळे येथील कृष्णा नदीघाट आणि स्मशानभूमी परिसरात स्वयंसेवकांनी श्रमदान करत परिसर स्वच्छ केला. सरपंच शांता दिंडे व सदस्यांनीही सहकार्य केले.

# ढेबेवाडी परिसरात डोंगररांगांमध्ये वणव्यांची मालिका

## वनक्षेत्रामध्ये आगीमुळे शेकडो एकरातील वनसंपत्ती जळून खाक

ढेबेवाडी,ता.२७(प्रतिनिधी)-

**उन्हाळ्याची चाहूल लागताच जानेवारी ते मे महिन्यात डोंगररांगांना वणवे लागतात. ढेबेवाडी (ता.पाटण) येथील परिसरातील डोंगररांगांमध्ये वणव्यांची मालिका सुरू झाली आहे. ता.२६ रोजी जौजाळवाडी (ता.पाटण) येथील डोंगरावर सायंकाळी सातच्या सुमारास वणवा लागल्याचे दिसून आले.**

गेल्या काही दिवसांत अनेक महत्त्वाच्या वनक्षेत्रांना आगीने वेढले असून, यात शेकडो एकर वनसंपत्ती जळून खाक झाली आहे. मानवी हस्तक्षेप आणि वाढते तापमान यामुळे या आगी भडकत असल्याचे प्राथमिक चित्र आहे.



जौजाळवाडी (ता.पाटण) येथील डोंगरात लागलेला वणवा.

डोंगराच्या उतारावर असलेल्या व वाळलेल्या गवतामुळे आग वाऱ्याच्या वेगाने पसरत आहे. रात्रीच्या वेळी डोंगरांवर आगीच्या लांबच लांब रेषा दुरूनच स्पष्ट दिसत आहेत. काही ठिकाणी शेतातील कचरा जाळताना आग डोंगरापर्यंत पोहोचते तर काही ठिकाणी शिकारीसाठी मुद्दामून आग लावली जाते. यामुळे केवळ झाडेच नाही, तर जमिनीवरील सरपटणारे प्राणी, पक्ष्यांची घरटी आणि दुर्मिळ औषधी वनस्पती, जनावरांचा चारा हे वणव्यामध्ये भस्मसात होत आहेत. त्यामुळे जनावरांच्या चाऱ्याचा देखील प्रश्न गंभीर बनत चालला आहे.

ढेबेवाडी विभागात वन विभागाचे कार्यक्षेत्र मोठ्या प्रमाणात असल्याने प्रत्येक ठिकाणी वनकर्मचारी पोहचेलच असे नाही. त्यामुळे डोंगर परिसर वणव्यापासून वाचवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. हे काम केवळ वनविभागाचे आहे असे समजून चालणार नाही. वणव्यापासून डोंगर वाचवणे ही सर्वच नागरिकांची जबाबदारी आहे.

### समाजकंटकांवर कडक कारवाई करणार

डोंगररांगांना लागणारे वणवे रोखण्यासाठी गावोगावी माहिती दिली जात आहे. शिवाय त्याचे प्रबोधनही करण्यात येत आहे. तरीही, दुर्गम भागात आग विझवताना वन कर्मचाऱ्यांची मोठी ओढाताण होत आहे. वणवा लावणे हा कायद्याने गुन्हा आहे. डोंगरांना आग लावणाऱ्या समाजकंटकांवर कडक कारवाई केली जाईल. नागरिकांनी निसर्गाचे रक्षण करण्यासाठी सतर्क राहावे. डोंगराळ भागात काडीपेटी किंवा लायटरचा वापर टाळावा. वाळलेले गवत जाळताना ते पूर्णपणे विझल्याची खात्री करा. आग लागल्याचे दिसताच त्वरित वन विभाग किंवा स्थानिक प्रशासनाला कळवा.

**-राजेश नलवडे,वनक्षेत्रपाल पाटण.**




# होळीच्या दिवशी शुक्र ग्रह तयार करणार मालव्य योग

मार्चच्या सुरुवातीला म्हणजेच २ मार्चला शुक्र कुंभ राशीतून त्याच्या उच्च राशीत मीन राशीत संक्रमण करेल. शुक्राच्या मीन राशीत प्रवेशामुळे मालव्य योग तयार होईल. याव्यतिरिक्त, कुंभ राशीत सूर्य,मंगळ, बुध आणि राहू यांची चार ग्रहांची युती होईल. मीन राशीत शुक्र आणि शनि यांची युती देखील होईल. यासोबतच, १५ मार्च रोजी सूर्य मीन राशीतही संक्रमण करेल आणि मीन राशीत त्रिग्रही योग तयार होईल. होळीच्या दिवशी मालव्य योग आणि शुक्र आणि शनिची युती काही राशींसाठी फायदेशीर ठरू शकते. मालव्य योगाचा कोणत्या राशींच्या लोकांना फायदा होणार आहे ते जाणून घ्या

वृषभ रास

मार्चमधील ग्रहांच्या हालचालींचा वृषभ राशींच्या लोकांवर सकारात्मक परिणाम होतो. शुक्र ग्रह तुमच्या घरात उच्च राशीमध्ये असल्यांने उत्पन्नाचे स्त्रोत वाढतील. तसेच तुम्हाला पदोन्नती देखील मिळू शकते. या काळात व्यवसायात वाढ होऊ शकते. सामाजिक संबंध सुधारतील. तुम्हाला तुमच्या पालकांकडूनही पाठिंबा मिळेल.

मिथुन रास

मार्च महिना तुमच्यासाठी आर्थिक समृद्धी घेऊन येणारा राहणार आहे. तुमच्या सुखसोयींमध्ये वाढ होऊ शकते. या काळात कला, गायन,वादन,अभिनय इत्यादी कलात्मक क्षेत्रात मोठे यश मिळवू शकाल. कामाच्या ठिकाणी तुमच्या कामाचे कौतुक होऊ शकते. तुम्हाला संपत्ती मिळू शकते.जर तुम्ही कुठेतरी गुंतवणूक केली असेल तर तुम्हाला चांगले परतावे मिळण्याची शक्यता आहे.

वृश्चिक रास

वृश्चिक राशीच्या लोकांसाठी मार्च महिना खूप महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांसाठी हा महिना विशेष आहे. जर तुम्ही एखाद्याला पैसे उधार दिले असल्यास तुम्हाला ते परत मिळू शकतात. आर्थिक परिस्थिती सुधारेल. या काळात तुम्ही कुटुंबासोबत चांगला वेळ घालवाल. करिअरमध्ये तुम्हाला नवीन संधी मिळतील.तुम्ही एखाद्या शुभ कार्यक्रमात सहभागी होऊ शकता.

कुंभ रास

सूर्य आणि शुक्र कुंभ राशीच्या कुंडलीमध्ये दुसऱ्या घरामध्ये संक्रमण करणार आहे. तुमच्यामधील क्षमता वाढू शकते. तुमच्या क्षमता कामाच्या ठिकाणी सर्वांना प्रभावित करू शकतात. कामाच्या ठिकाणी तुम्हाला अतिरिक्त जबाबदाऱ्या मिळू शकतात. परदेशी व्यापारामुळे लक्षणीय आर्थिक फायदा होऊ शकतो. नोकरीच्या शोधात असलेल्यांना नोकरी मिळण्याची शक्यता आहे. तुमचे आरोग्यही चांगले राहील.



# होळीच्या पहिले घरातून बाहेर काढा या गोष्टी, घरात प्रवेश करेल सकारात्मक ऊर्जा

होळीचा सण जवळ आला आहे त्यामुळे घरामध्ये साफसफाईला आणि होळीच्या तयारीला सुरुवात झालेली आहे. यावेळी होळी सोमवार २ मार्च रोजी आहे तर ३ मार्च रोजी धुलीवंदन आहे. होळीपूर्वी घरातील नको असलेल्या, निरुपयोगी किंवा खराब झालेल्या वस्तू बाहेर फेकून दिल्याने वातावरण शुद्ध होते, मानसिक ताण कमी होतो आणि घरात सकारात्मक ऊर्जा वाढते आणि घरातील नकारात्मक ऊर्जा दूर होते.

धार्मिक श्रद्धेनुसार, होळीच्या पहिले घराची साफसफाई करणे शुभ मानले जाते. असे केल्याने घरातील सकारात्मक ऊर्जा वाढते आणि घरामध्ये सुख समृद्धी येते.वास्तुशास्त्राच्या मान्यतेनुसार, घरातील काही वस्तूंमुळे नकारात्मक ऊर्जा वाढते ज्यामुळे जीवनात समस्येचा सामना करावा लागतो.होळीच्या पहिले घरातून कोणत्या गोष्टी बाहेर काढाव्यात ते जाणून घ्या

जुने आणि फाटलेले चप्पल

तर घरामध्ये खूप दिवसांपासून जुने आणि फाटलेले चप्पल असल्यास ते लगेच बाहेर काढावे.असे मानले जाते की,अशा गोष्टी घरामध्ये गरिबी आणि नकारात्मकता वाढवते. याचा आर्थिक परिस्थितीवर सुद्धा परिणाम होऊ शकतो आणि मानसिक तणाव वाढू शकतो.

सुकलेले तुळशीचे रोप

तुळशीचे रोप घरामध्ये सकारात्मक ऊर्जा, शांती आणि समृद्धीचे प्रतीक मानले जाते. जर हे रोप सुकले तर ते घरात ठेवणे शुभ मानले जात नाही. सुकलेली तुळस नकारात्मकता वाढू शकते. यासाठी ते काढून त्या ठिकाणी नवीन रोप लावणे चांगले राहील.

जुने कपडे आणि रंग

घरात ठेवलेले जुने कपडे आणि न वापरणारे कपडे गरिबांना दान करणे शुभ मानले जाते. त्यामुळे घरात समृद्धी राहील. त्यासोबतच जुने आणि खराब झालेल्या रंगांचा बचाव करावा. कारण हे त्वचेसाठी हानिकारक असू शकते.

तुटलेला आरसा आणि खराब फोटो

जर घरामध्ये तुटलेला आरसा असेल तर ते बाहेर काढून टाका. वास्तुशास्त्रानुसार, तुटलेल्या आरशामुळे घरात नकारात्मक ऊर्जा पसरवते आणि जीवनात समस्या येऊ शकतात. याव्यतिरिक्त देवदेवतांच्या तुटलेल्या मुर्त्या किंवा फोटो घरात ठेवू नये.

तुटलेल्या मुर्त्या

घरामध्ये तुटलेल्या मुर्त्या ठेवणे अशुभ मानले जाते. या मुर्त्या वाहत्या पाण्यामध्ये विसर्जन कराव्यात. ज्यामुळे घरात सकारात्मक ऊर्जा टिकून राहते आणि शांतीचे वातावरण राहते.



# या दिवशी बुट-चप्पल खरेदी करू नका

वास्तुशास्त्र आणि ज्योतिषशास्त्रात बूट किंवा चप्पल केवळ पायांचे रक्षण करण्याचे साधन मानले जात नाही तर ते घराच्या उर्जेशी, संपत्ती, समृद्धी आणि कौटुंबिक आनंद आणि शांतीशी देखील जोडलेले आहेत. आचार्य मुकुल रस्तोगी यांच्या मते, बूटांशी संबंधित काही नियमांचे पालन न केल्याने घरात नकारात्मक ऊर्जा वाढू शकते, विश्वास कमी होऊ शकतो आणि आर्थिक आणि मानसिक समस्या निर्माण होऊ शकतात. चला या नियमांबद्दल सविस्तरपणे जाणून घेऊया.

ज्योतिषशास्त्राच्या मते, अमावस्या, मंगळवार, शनिवार आणि ग्रहणाच्या दिवशी बूट खरेदी करणे निषिद्ध आहे. या दिवसांत नकारात्मक ग्रहांची ऊर्जा अधिक सक्रिय असते, जी रजोगुणी वस्तूंशी जोडली गेल्यास घरात आर्थिक अडचणी, कलह आणि आरोग्याच्या समस्या येऊ शकतात. मंगळवार आणि शनिवारी मंगळ आणि शनि ग्रह प्रबळ असतात, तर अमावस्या आणि ग्रहण काळात पितृशक्ती आणि राहू आणि केतू सक्रिय असतात. या दिवशी नवीन बूट खरेदी केल्याने घरात अशांतता आणि अडथळे वाढू शकतात. बूट घालताना तिजोरी किंवा लॉकर उघडू नये, कारण हे धनाची देवी लक्ष्मीचा अपमान मानले जाते. यामुळे आर्थिक नुकसान किंवा आर्थिक अडचणी येऊ शकतात. बूट घालताना स्वयंपाकघरात किंवा भांडारात प्रवेश करू नये. असे केल्याने विश्वास कमी होतो आणि कुटुंबात अशांतता निर्माण होते. नदी, तलाव किंवा तीर्थक्षेत्राजवळ बूट घालणे देखील टाळावे. बूट घालताना मंदिर, धार्मिक स्थळ किंवा रुग्णालयात प्रवेश करण्यास मनाई आहे. हे पाप मानले जाते आणि सकारात्मक उर्जेवर परिणाम करते.

जर मंदिर, धार्मिक स्थळ किंवा रुग्णालयातून बूट, मोजे किंवा चामड्याच्या वस्तू चोरीला गेल्या तर ते शुभ मानले जाते. असे मानले जाते की यामुळे दुर्दैव टळते आणि संभाव्य हानी टाळता येते. तथापि, जर घरात बूट किंवा चप्पल फाटले किंवा वारंवार तुटले तर हे पूर्वजांच्या शापाचे किंवा नकारात्मक उर्जेचे लक्षण असू शकते. अशा परिस्थितीत, बूट आणि चप्पल ताबडतोब बदलले पाहिजेत आणि घरावर गंगाजल शिंपडले पाहिजे.

बूट आणि चप्पल नेहमी घराबाहेर किंवा शू रॅकमध्ये व्यवस्थित ठेवा. ते मुख्य प्रवेशद्वाराच्या आत किंवा पूजास्थळाजवळ ठेवू नका. बूट आणि चप्पल उलटे ठेवू नका. रात्री शूज आणि चप्पल बाहेर ठेवणे शुभ मानले जाते. नवीन शूज खरेदी केल्यानंतर, प्रथम गंगाजलाने त्यांना शुद्ध करा. घरात विषम संख्येने शूज आणि चप्पल ठेवणे चांगले. या नियमांचे पालन केल्याने घरात देवी लक्ष्मीची उपस्थिती सुनिश्चित होते आणि नकारात्मक ऊर्जा दूर राहते.

# राशीत दडलंय मागच्या जन्मीचं रहस्य? काय सांगतं तुमच्याबद्दल ज्योतिषशास्त्र

आपल्या आयुष्यात काही घटना अशा घडतात की त्या का घडतात, काही लोक आपल्याला पहिल्याच भेटीत आपलेसे का वाटतात, किंवा काही घटनांची भीती का वाटते याबद्दल अनेकांना उत्सुकता असते. ज्योतिषशास्त्रानुसार या प्रश्नांची उत्तरं आपल्या राशीत आणि कुंडलीत दडलेली असतात. विशेषतः जन्मकुंडलीतील काही ग्रह मागील जन्माशी संबंधित असतात असं म्हटलं जातं.

ज्योतिष शास्त्रात राहू आणि केतू यांना छाया ग्रह म्हटलं जातं. यापैकी केतू हा मागील जन्मातील कर्म, अनुभव आणि अपूर्ण इच्छा दर्शवतो, तर राहू हा या जन्मातील महत्त्वाकांक्षा आणि अपूर्णतेची जाणीव दाखवतो. कुंडलीतील केतूची स्थिती, तो ज्या भावात आहे आणि ज्या राशीत आहे, त्यावरून व्यक्तीच्या मागील जन्मातील प्रवृत्तींचा अंदाज बांधला जातो.

उदाहरणार्थ, जर केतू पाचव्या भावात असेल तर त्या व्यक्तीला आध्यात्मिक ओढ, पूर्वजन्मीचे संस्कार किंवा एखाद्या कलेत नैसर्गिक प्रावीण्य असू शकते. बाराव्या भावातील केतू मोक्ष, परदेश किंवा एकांताशी संबंधित अनुभव सूचित करतो. काही वेळा एखाद्या गोष्टीची अनाकलनीय भीती, विशिष्ट ठिकाणाशी जुळलेपण किंवा काही नात्यांमध्ये लगेच निर्माण होणारी जवळीकहीही मागील जन्मातील कर्मबंधनाची चिन्हं मानली जातात.

तथापि, हे सर्व श्रद्धा आणि ज्योतिषीय परंपरेवर आधारित आहे. याला ठोस वैज्ञानिक पुरावे नाहीत. तरीही अनेक जण आपल्या कुंडलीच्या अभ्यासातून स्वतःला अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्याचा प्रयत्न करतात.शेवटी, मागचा जन्म काहीही असो,



वर्तमानकाळात केलेली चांगली कर्मं आणि योग्य निर्णय हेच भवितव्य घडवतात,असंही ज्योतिष सांगतं. हेच राशीनुसार कसं घडतं ते जाणून घेऊयात.

मेष रास

धाडसी आणि तेजस्वी असणारी ही मंडळी मागच्या शूर योद्धा असू शकतात असं म्हटलं जातं. तुम्ही स्वतःच्या आधी इतरांचा विचार करता त्यामुळे या जन्मात तुम्ही स्वतःची सुद्धा काळजी घ्यायला पाहिजेत.

वृषभ

या राशीच्या मंडळींनी मागच्या जन्मी कलाकार किंवा शेतीव्यवसाय करणाऱ्या कुटुंबात जन्म घेतला असावा. या जन्मात तुम्ही स्वतःच्या हट्टीपणावर नियंत्रण मिळवणं गरजेचं आहे. असं ज्योतिषशास्त्र सांगतं.

मिथुन

मगाच्या जन्मातील छबी या जन्मात देखील दिसून येते. मिथुन राशीची मंडळी मागच्या जन्मी लेखक किंवा शिक्षक असावेत असं म्हटलं जातं.

कर्क

कर्केची मंडळी मागच्या जन्मी समाजसेवक किंवा केयर टेकर या क्षेत्रात असावेत. म्हणूनच ही माणसं आपल्या माणसांची प्रेमाने आपुलकीने काळजी घेतात.

सिंह

सिंह राशीत जन्माला आलेली माणसं मागच्या जन्मी बहुप्रतिष्ठीत व्यक्तीमत्व असावेत.या जन्मात तुम्हाला स्वतः कोणत्याही गोष्टीचा गर्व होणार नाही याची खबरदारी घ्यायला पाहिजेत.

कन्या

कन्या राशीत जन्मलेली मंडळी त्यांच्या आधीच्या जन्मात गणिततज्ज्ञ किंवा डॉक्टर असू शकतात. म्हणूनच ही मंडळी फार घोळक्यात वावरणारी नसतात.

तूळ

तूळेची मंडळी मागच्या जन्मी न्यायाधीश किंवा कलाप्रिय आयुष जगलेली असतात. या जन्मात त्यांनी स्वतःवर विश्वास ठेवून वाटचाल करणं गरजेचं आहे.

वृश्चिक

वृश्चिक राशीचा केतू प्रभावी असतो त्यामुळे यांना कधी कधी मागच्या जन्माचा संबंध या जन्मी जाणवतो. ही माणसं गत जन्मात गुढ विद्या करणारे असतात. या जन्मात यांनी एखाद्यावर राग धरुन ठेवणं टाळावं.

धनु

गुरु बळकट असणारी ही माणसं मागच्या जन्मात तत्वज्ञानी असावित असं म्हटलं जातं. ही माणसं कायम ज्ञान वाटतात.

मकर

मागच्या जन्मी कोणाला दुखावलं असलं किंवा चुकीच्या गोष्टी केल्या की या जन्मात ही माणसं मकर राशीत जन्म घेतात असं म्हटलं जातं. यांचा देखील स्वामी शनी आहे. ही मंडळी फार कष्टाळू असतात शनी यांना संयम आणि मेहनत शिकवतो.

कुंभ

ही माणसं मागच्या जन्मी प्रवाहाच्या विरुद्ध चालणारी असावीत असं म्हटलं जातं. या जन्मात यांनी जवळच्या माणसांबाबत जिव्हाळा ठेवणं गरजेचं आहे.

मीन

मागच्या जन्मातूनच यांना या जन्मी अध्यात्मिक ओढ आलेली असते. मीन राशीत जन्माला आलेली मंडळी मागच्या जन्मी संत साधू असतात असं म्हटलं जातं.

# साप्तहिक राशीभविष्य

**२८ फेब्रुवारी २०२६ ते ६ मार्च २०२६**

**आर्थिक आघाडी ठीक राहील**

**मेष:** या आठवड्यात आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटना काही वेळेस आपली मनस्थिती विचित्र करू शकतात. काही नकारात्मक विचारांच्या व्यक्ती भेटल्यामुळे आपल्या कार्यात अडथळा येऊ शकतो.त्यामुळे आपण एखाद्या ताणतणावाखाली राहू शकता.कुटुंबात आपल्या जीवनसाथीची आपल्याला मदत मिळेल.मोलाचा सल्ला मिळेल.नोकरीत तसेच व्यवसाय-धंद्यात कोणाशीही वाद-विवाद घालण्याचे टाळलेले बरे. आर्थिक आघाडी ठीक राहील.

**प्रश्न सुटतील**

वृषभ: बदलत्या ग्रहमानाच्या पार्श्वभूमीवर या आठवड्यात आपल्याला भाग्याचे पाठबळ मिळेल. काही अनुकूल घटना आपल्या अवतीभवती घडत जातील. कुटुंबामधील वातावरण चांगले राहून जीवनसाथी चांगली साथ देईल. वैवाहिक सख मिळेल. कुटुंबामध्ये मंगलकार्याचे नियोजन होऊ शकते. कोणतीही चर्चा करताना शांत राहण्याची आवश्यकता. आरोग्य चांगले राहील. महत्त्वाच्या कामांना गती मिळेल. भावंडांशी सख्य राहील. तरुण-तरुणींचे प्रश्न सुटतील. सहकुटुंब, सहपरिवार प्रवासाचे योग आहेत. प्रवास कार्यसिद्ध राहतील.

**महत्त्वाची कामे होतील**

**मिथुन:** नोकरीधंद्याच्या निमित्ताने अथवा कौटुंबिक कारणांसाठी आपल्याला लहान-मोठे प्रवास करावे लागण्याची शक्यता आहे. प्रवासात वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवा तसेच खाण्यापिण्यावरही लक्ष ठेवणे आवश्यक आहे. वाहतुकीचे नियम पाळा. महत्त्वाची कामे होतील. आपली महत्त्वाची कागदपत्रे तसेच मौल्यवान वस्तू जपा. जोडीदाराची साथ चांगल्या प्रकारे मिळेल. खर्चामध्ये वाढ होण्याची शक्यता. लहान-मोठे आर्थिक व्यवहार करताना सावधानता बाळगणे जरूरी आहे. नोकरी, व्यवसाय, धंद्यात समाधानकारक परिस्थिती अनुभवता येईल. विद्यार्थ्यांनी वेळेकडे लक्ष द्यायला पाहिजे.

**सहकार्य अपेक्षेप्रमाणे मिळेल**

**कर्क:** काही आपल्या मनासारख्या अनुकूल घटना घटित झाल्यामुळे आपल्या आत्मविश्वासात वृद्धी होईल; परंत अतिआत्मविश्वास टाळा. तसेच लहान-मोठे निर्णय पूर्ण विचाराअंती घ्या. इतरांच्या मतास प्राधान्य देणे हितकारक ठरेल. नोकरीमध्ये अनुकूलता. आपले मत इतरांना पटवन देण्यात यश मिळेल. वरिष्ठांचे तसेच सहकाऱ्यांचे सहकार्य अपेक्षेप्रमाणे मिळेल. कुटुंबात मात्र समंजसपणे भूमिका पार पाडावी लागेल. स्वभावात चिडखोरपणा येण्याची शक्यता आहे. इतरांवर वर्चस्व गाजवण्याचा प्रयत्न करू नका. बहीण-भावांबद्दल काळजी वाटू शकते. जुन्या ओळखी नव्याने प्रस्थापित होतील.

**कार्यकक्षा वाढेल**

**सिंह:** नोकरीत अनकूलता लाभेल. आपण पर्वी केलेल्या कामाबद्दल आपले कौतुक होईल. पदोन्नती, वेतनवृद्धीची शक्यता. अधिकारात वाढ झाल्यामुळे जबाबदाऱ्यासुद्धा वाढतील, याची जाण अत्यावश्यक ठरेल. सरकारी कामात आपल्या कार्यकक्षा ओलांडू नका. आपल्या कार्याची कार्यकक्षा वाढल्यामळे कामाचा ताण जाणवू शकतो. व्यवसाय-धंद्यात समाधानकारक परिस्थिती राहील. उलाढाल वाढून नफ्याच्या प्रमाणात वाढ होईल. जुनी येणी वसूल होतील. आर्थिक परिस्थिती चांगली राहील. एखादे मानाचे स्थान मिळेल.

**प्रयत्नात कमी नको**

**कन्या:** आपली आतापर्यंत रखडलेली काही महत्त्वाची कामे या आठवड्यात गतिमान होऊन पूर्ण होण्याची शक्यता आहे. मात्र आपल्या प्रयत्नात कमी पडू देऊ नका. भाग्याची साथ मिळेल. अडचणी दूर होतील. नोकरीधंद्यात चांगली परिस्थिती राहील. नोकरीत पदोन्नती किंवा वेतनवृद्धी मिळू शकते. लहान-मोठ्या अंतराचे प्रवास करावे लागतील. मात्र प्रवास जपून करावा. गृहसौख्य चांगले राहील. जोडीदाराची साथ मिळेल. स्थावर मालमत्तेच्या व्यवहारात वाद-विवाद टाळा. ओळखी मध्यस्थीतून कामे होतील.

**आरोग्याकडे लक्ष द्या**

**तूळ :** व्यवसाय धंद्यातील दीर्घकाळ रखडलेली येणी वसल झाल्यामुळे आर्थिक परिस्थिती चांगली राहील तसेच व्यवसायातील उलाढाल वाढून नफ्याचे प्रमाण वाढेल. प्रवास करावे लागतील; परंतु प्रवासात जास्त दगदग होण्याची शक्यता आहे. कोणाशीही वादविवाद टाळणे हिताचे ठरेल. आपल्या स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष द्या. व्यवसायातील केलेले बदल सकारात्मक परिणाम घडवून आणतील. मात्र महत्त्वाच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे. संयम बाळगा. आजूबाजूच्या परिस्थितीचे अवलोकन करून शांतपणे निर्णय घ्या.

**ओळखी-मध्यस्थी उपयोगी पडतील**

**वृश्चिक:** जमीन-जुमला स्थावर मालमत्ता इत्यादींविषयी थंडावलेले व्यवहार पुन्हा गतिमान होतील व पूर्णत्वाकडे वाटचाल करतील.त्यातन भरघोस आर्थिक फायदा मिळू शकतो. अडचणी दूर होतील.ओळखी मध्यस्थी उपयोगी पडतील.सरकारी कामात होणारा विलंब टळेल.अचानक खर्चात झालेली वाढ आश्चर्यचकित करू शकते. अनावश्यक खर्च टाळा.कुटुंबातील वातावरण चांगले राहील.

**धार्मिक कार्याचे नियोजन होऊ शकेल.**

**धनु:** नोकरीत तसेच व्यवसाय-धंद्यात चांगली परिस्थिती राहील. येणाऱ्या समस्या आपण यशस्वीपणे हाताळाल. मात्र महत्त्वाच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे. त्यासाठी धावपळ करावी लागेल. दगदग होईल. काही वेळेस मनस्ताप सुद्धा सहन करावा लागेल. इतरांची वाद-विवाद होऊ शकतात, ते टाळणे हिताचे ठरेल. कुटुंबात मात्र जोडीदार आपल्याला सांभाळून घेईल. घरात सदस्यांशी चांगला समन्वय व सुसंवाद घडेल. एखाद्या धार्मिक कार्याचे नियोजन होऊ शकेल. मंगल कार्य ठरू शकते.

**प्रलोभने टाळा**

**मकर:** नोकरीत पदोन्नती किंवा वेतनवृद्धी होईल. त्याबरोबर आपल्या अधिकारातही वाढ होईल. मात्र जबाबदाऱ्या घ्याव्या लागतील. कामाच्या स्वरूपात बदल घडून स्थानाच्या स्वरूपातही बदल घडू शकतो. सरकारी नोकरीत अतिरिक्त कार्यभार स्वीकारावा लागेल तसेच बदलीची शक्यता आहे. आपण आपल्या अधिकाराच्या मर्यादा ओळखून आपले कार्य पर्ण करणे हिताचे ठरेल तसेच लहान-मोठी प्रलोभने टाळा. कामानिमित्त अथवा काही कौटुंबिक कारणांमुळे प्रवास करावा लागेल. कुटुंबातील मुलांची काळजी घेणे क्रमप्राप्त ठरेल. काही वेळेस मतभेदांची शक्यता. आपला क्रोध नियंत्रणात ठेवा. जास्तीचा खर्च होऊ शकतो.

**मुक्तहस्ते खर्च कराल**

**कुंभ:** धनलाभाच्या दृष्टिकोनातून चांगला काळ आहे. अनेक अनेक मार्गांनी धनलाभ होऊ शकतो. नेहमीच्या उत्पन्न स्त्रोतांपेक्षा नवीन मार्गाने पैसा हाती येईल. त्यामुळे आनंदित राहाल. कुटुंबासाठी तसे स्वतःसाठी मुक्तहस्ते खर्च कराल. धार्मिक कार्यात भाग घेऊन दानधर्म करण्याची इच्छा होईल. नोकरीत कामाचा ताण जाणवेल. धावपळ करावी लागेल. वेळेचे नियोजन उपयोगी पडू शकते. मात्र काही वेळा सुखद अनुभव येतील. चालू नोकरीपेक्षा जास्ती चांगली नोकरी शोधण्याच्या प्रयत्नांना यश मिळेल. सरकारी नोकरीत मानसन्मानाचे योग आहेत. आपले म्हणणे इतरांना पटवून देण्यात आपण यशस्वी व्हाल. आपला प्रभाव इतरांवर राहील.

**आर्थिक बाजू बळकट होईल.**

**मीन:** कामानिमित्त जवळचे तसेच दूरचे प्रवास घडू शकतात. नोकरीमध्ये अनकूलता लाभेल. आपण केलेल्या कामाचे बक्षीस मिळेल. पदोन्नती वेतनवाढ होऊ शकते. मात्र बदलीची तयारी ठेवावी लागेल. कामाच्या स्वरूपातही बदल घडू शकतो. वरिष्ठांशी संबंध चांगले राहतील तसेच बरोबरच्या सहकाऱ्यांचे अपेक्षित सहकार्य मिळेल. कौटुंबिक आघाडीवर समाधानी राहाल. कुटुंबात मंगल कार्य घडेल. एखाद्या धार्मिक कार्यक्रमाचे नियोजन करू शकाल. आर्थिक बाजू बळकट होईल. मालमत्तेच्या कामात यश संपादित करू शकाल. जुन्या गुंतवणुका आर्थिक फायदा मिळवून देतील. नवीन गुंतवणूक करण्याची इच्छा होईल. मात्र ती करताना त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञांचा सल्ला आवश्यक ठरेल.



जिल्हास्तरीय दक्षता समिती सदस्यांची यादी जिल्हा पोलिसप्रमुख गुप्ता यांना देताना भरत ओसवाल.

# जिल्हास्तरीय दक्षता समितीची लवकरच बैठक घेऊ

## पोलीस अधीक्षक योगेश कुमार गुप्ता

कोल्हापूर, ता. २७ –

**कोल्हापूर जिल्हास्तरीय दक्षता समिती सदस्यांची लवकरच अधिकाऱ्यांसह बैठक घेऊन योग्य ते मार्गदर्शन करू, असे जिल्हा पोलीस अधीक्षक योगेश कुमार गुप्ता यांनी सांगितले.**

सराफ व्यावसायिकांकडून चोरीची, संशयित मालमत्ता जप्त करताना तपासी अधिकाऱ्यांनी पाळावयाची मार्गदर्शक तत्त्वे तसेच सराफांच्या सुरक्षाविषयक समस्यांचे निराकरण करण्याबाबत राज्यस्तरीय दक्षता समितीची स्थापना राज्य शासनाने केली आहे. त्या अनुषंगाने दक्षता समितीचे राज्यस्तरीय सदस्य भरत ओसवाल यांनी जिल्हास्तरीय दक्षता समिती सदस्यांची यादी गुप्ता यांना दिली. त्यावेळी ते बोलत होते. गुप्ता म्हणाले, अशा दक्षता समिती जिल्हास्तराबरोबर तालुका पातळीवर स्थापन कराव्यात, ज्यायोगे गुन्ह्यांची उकल लवकर करणे पोलिसांना शक्य होईल. पुढील आठवड्यातच सर्व सदस्यांची वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेऊन दोन्ही घटकांमध्ये चोरीसारख्या घटनांबरोबर इतर प्रसंगीही समन्वय राखता येईल.ओसवाल यांनी शासनाच्या वतीने अशा समितीची स्थापना करण्यामागील भूमिका गुप्ता यांच्यासमोर स्पष्ट केली.

# रुकडीत शाळेमध्ये भीषण आग

## जुनी पुस्तके, साहित्य जळून खाक

रुकडी,ता.२७ (प्रतिनिधी)–

**येथील जिल्हा परिषदेच्या कुमार विद्या मंदिर (शाळा क्र. २) मध्ये शुक्रवारी दुपारी भीषण आग लागली. या आगीत शाळेतील जुने साहित्य आणि फर्निचर जळून खाक झाले.यात हजारो रुपयांचे नुकसान झाले असून सुदैवाने, ही खोली वापरात नसल्याने मोठी जीवितहानी टळली.**

मिळालेल्या माहितीनुसार, या शाळेत एकूण ९ वर्ग खोल्या आहेत. त्यापैकी पूर्व बाजूला सरकारी दवाखान्याला लागून कॅन्टींगच्या मागे असलेल्या तीन खोल्यांची अवस्था अत्यंत जीर्ण झाली असून त्याचे छतही पडलेले आहे. सुरक्षेच्या कारणास्तव मुख्याध्यापकांनी या खोल्यांकडे जाणारा मार्ग बंद केला होता. या खोल्यांचा वापर सध्या जुनी पुस्तके, मोडकळीस आलेले साहित्य आणि जुनी कपाटे ठेवण्यासाठी (स्टोअर रूम ) केला जात होता.शुक्रवारी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास खोली क्र.१ मधून अचानक धूर येऊ लागला. पाहता पाहता आगीने रौद्र रूप धारण केले. खोलीतील लाकडी साहित्य आणि पुस्तकांनी पेट घेतल्याने आगीची तीव्रता वाढली.

घटनेची माहिती मिळताच जि. प.सदस्य आतिष शिंगे यांनी इंचलकरंजी महानगर पालिकेच्या अग्निशामक दलाला पचारण केले तर सरपंच राजश्री रुकडीकर, उपसरपंच पाकिजा मुल्लानी, शीतल खोत, संतोष रुकडीकर, राजू मुल्लानी, शमुवेल लोखंडे, रणजित कदम, माजी सरपंच रफिक कालावंत, वैभव कांबळे, साहील कलावंत हे ग्रामपंचायतीच्या दोन टँकरसह घटनास्थळी पोहोचत आग विझवण्यात यशस्वी ठरले पण आगीमुळे खोलीत ठेवलेल्या साहित्यासह खोलीचे संपूर्ण छत जळून खाक झाले.

या आगीत शाळेचे जुने शैक्षणिक साहित्य आणि लाकडी सामान पूर्णपणे जळून खाक झाले आहे. आगीचे नेमके कारण अद्याप समजू शकले नाही. मात्र शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागली असावी असा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण पसरले होते.

## युवकाची आत्महत्या

हातकणंगले,ता.२७ (प्रतिनिधी)–

खोतनगर (तारदाळ) येथील सुरज दत्तात्रय खोत (वय ३३ ) याने नरंदे येथील सिद्धोबा डोंगरात असलेल्या दत्त मंदिरच्या पाठीमागे आंब्याच्या झाडाला नायलॉनच्या दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. याबाबतची वर्दी मारुती आण्णाप्पा खोत (रा. खोतनगर, तारदाळ) यांनी हातकणंगले पोलीस ठाण्यात दिली आहे. अधिक तपास सहा. फौजदार पाटील करीत आहेत.

## युवकाची आत्महत्या

सरूड,ता.२७ (प्रतिनिधी)–

**शाहूवाडी तालुक्यातील कोपर्डी येथे युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी घडली. संदीप पांडुरंग पाटील (वय ) असे त्या युवकाचे नाव आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, संदीप पाटील यांनी दुपारच्या सुमारास घरात कोणी नसल्याची संधी साधून राहत्या घरातील वाशाला दोरीच्या साह्याने गळफास घेतला. काही वेळाने घरातील सदस्य घरी आल्यानंतर ही घटना त्यांच्या निदर्शनास आली.

माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी येवून पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी मलकापूर ग्रामीण रुग्णालय येथे पाठविण्यात आला.त्याच्या आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

# वारणा दूध संघाची निवडणूक सलग ८ व्यांदा बिनविरोध

## २१ संचालकांमध्ये ५ नव्या चेहऱ्यांना संधी

भादोले,ता.२७ (वार्ताहर)–

**सहकार क्षेत्रातील कॉर्पोरेट ब्रँड म्हणून देशभरात लौकिक मिळवलेल्या श्री वारणा सहकारी दूध उत्पादक प्रक्रिया संघाच्या (वारणा दूध संघ) पंचवार्षिक निवडणुकीने पुन्हा एकदा इतिहास रचला. संचालक मंडळाची निवडणूक सलग आठव्यांदा बिनविरोध पार पाडत संघाने सहकार चळवळीतील ऐक्य आणि शिस्तीचा नवा आदर्श निर्माण केला आहे.**



२१ जागांसाठी २१ अर्ज शिल्लक राहिल्याने २०२६ ते २०३१ या कालावधीसाठी संचालक मंडळावर अधिकृत शिक्कामोर्तब झाले. निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी निवडणूक बिनविरोध झाल्याची घोषणा करताच वारणा परिसर जल्लोषाने दणाणून गेला. गुलालाची उधळण, फटाक्यांची आतषबाजी आणि कार्यकर्त्यांचा उत्साह यामुळे वातावरण भारावून गेले.

**नव्या–जुन्याचा संगम; ५ नव्या चेहऱ्यांना संधी**

यंदाच्या संचालक मंडळात अनुभव आणि नवचैतन्य यांचा सुंदर मिलाफ पाहायला मिळत आहे. पाच नव्या चेहऱ्यांना संधी देत संघाने बदलाची सकारात्मक दिशा स्वीकारली आहे. अनुभवी संचालकांच्या मार्गदर्शनाखाली नव्या विचारांची भर पडणार असून, संघाच्या प्रगतीला अधिक वेग मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त होत आहे.

**सहकार हीच शक्ती : आम. विनय कोरे**

नवनिर्वाचित संचालकांचे अभिनंदन करताना आमदार विनय कोरे म्हणाले, वारणा समूहाची बिनविरोध निवडणुकीची परंपरा महाराष्ट्रात आदर्शवत ठरली आहे. सभासदांनी दाखवलेला विश्वास आम्हाला दूध उत्पादकांच्या हितासाठी अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा देतो. सहकाराची भक्कम पायाभरणी हीच वारणा समूहाची खरी ताकद आहे.

**निवडणूक प्रक्रिया काटेकोर**

सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी समीर शिंगटे (पन्हाळा), सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (दुग्ध) कोल्हापूरचे प्रदीप मालगावे तसेच संघाचे कार्यकारी संचालक सुधीर कामेरीकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण प्रक्रिया पार पडली.

संचालकांमध्ये अ वर्ग उत्पादक गटातून डॉ. विनय कोरे, प्रदीप देशमुख, शिवाजी कापरे, राजवर्धन मोहिते, अभिजित पाटील, अधिकराव पाटील, दीपकराव पाटील, कृष्णा पाटील, नेमगोंडा पाटील, महेंद्र शिंदे, विश्वास पायमल, सागर पाटील, संजय देसाई, ब वर्ग संस्था गटातून अरुण पाटील, लालासाहेब पाटील,महिला प्रतिनिधीमधून तेजस्विनी पाटील, नाजीया मुल्ला, अनुसूचित जाती/जमाती मधून डॉ. मिलिंद हिरवे, शिवाजी जंगम, क वर्ग गटातून माधव गुळवणी, हिंदुराव जाधव यांचा समावेश आहे.

**वारणा परिसरात जल्लोष**

निवडणूक बिनविरोध झाल्याचे अधिकृत जाहीर होताच वारणा परिसरात उत्साहाची लाट उसळली.

कार्यकर्त्यांनी आनंदोत्सव साजरा करत सहकार एकतेचा विजय साजरा केला.सलग आठव्यांदा बिनविरोध निवडणूक हा केवळ विक्रम नसून, तो वारणा समूहाच्या संघटित शक्तीचा आणि सभासदांच्या अभेद्य एकजुटीचा ठोस पुरावा मानला जात आहे.

वारणा दूध संघाचा हा ऐतिहासिक प्रवास आता नव्या उंचीच्या दिशेने वाटचाल करणार, यात शंका नाही.

# ऑनलाईन नोंदणी त्रुटीसंदर्भात वस्त्रोद्योग मंत्र्यांशी चर्चा

इचलकरंजी,ता.२७–

**वीज सवलतीसाठी ऑनलाईन नोंदणी करताना त्यातील बदलाची त्रुटी काढण्यात येऊ नये, मागील ६ महिन्यांऐवजी १ महिन्याचे वीज बिल ग्राह्य धरणेत यावे, जूने एसएसआय सर्टिफिकेट व उद्यम रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट हे दोन्हीही ग्राह्य धरणेत यावे, जास्त युनिट असलेल्या उद्योजकास प्रत्येक युनिटला वेगवेगळा ऐवजी एकच मोबाईल नंबर व ईमेल आयडी ग्राह्य धरणेत यावा, अशा विविध मुद्द्यावर वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत चर्चा करण्यात आली.**



वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीप्रसंगी आम.राहूल आवाडे, प्रधान सचिव अंशू सिन्हा, उपसचिव श्रीकृष्ण पवार व इतर.

यंत्रमाग उद्योगाची वीज सवलत सुरू ठेवण्यासाठी ऑनलाईन नोंदणी आवश्यक असून त्या संदर्भातील फॉर्म उपलब्ध करून देणेत आला होता. पण फॉर्म भरताना येणाऱ्या अडचणी त्याचबरोबर कांही माहिती उपलब्ध होत नसल्याची बाब दि इचलकरंजी पॉवरलुम असोसिएशनने आमदार आवाडे यांच्या निदर्शनास आणून देत वस्त्रोद्योग मंत्र्यांच्याबरोबर बैठक घेण्याची विनंती केली होती. त्यानुसार मिटींग संपन्न झाली. यावेळी आमदार राहुल आवाडे, प्रधान सचिव अंशू सिन्हा, उपसचिव श्रीकृष्ण पवार, नागपूरचे आयुक्त संजय दैने, तांत्रिक सहाय्यक आयुक्त गणेश वांडकर व स्वीय सहाय्यक प्रल्हाद रोडे उपस्थित होते.

फॉर्म भरताना एखादे युनिट दुसऱ्याला विकले अथवा रजिस्टर घटकाचा मृत्यु झाला असलेस वस्त्रोद्योग घटकाच्या नावामध्ये बदल करता येत नाही, भाडेकरूच्या संदर्भात फॉर्म भरताना मालकाच्या नांवे फॉर्म भरावा का भाडेकरूच्या नांवे हे कळत नाही, वीज बिलावरील पत्ते हे बऱ्याच वर्षांपूर्वीचे असून उद्यम नोंदणीवर सध्याचे पत्ते आहेत. यामुळे पत्यांमध्ये तफावत येत असल्याने पत्यातील बदल अशी त्रुटी काढणेत येऊ नये, मागील ६ महिन्यांऐवजी १ महिन्याचे वीज बिल ग्राह्य धरणेत यावे, जूने एस.एस.आय. सर्टिफिकेट व उद्यम रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट हे दोन्हीही ग्राह्य धरणेत यावे, जास्त युनिट असलेल्या उद्योजकास प्रत्येक युनिटला वेगवेगळा मोबाईल नंबर व ईमेल आयडी देणे अशक्य असलेने एकच मोबाईल नंबर व ईमेल आयडी ग्राह्य धरणेत यावा, जोडावयाच्या कागदपत्रांसाठी प्रत्येक कागदपत्रास वेगळा टॅब देणेत यावा यासह इतर त्रुटींबाबत सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती उद्योजकांना सहज व सोप्या रितीने भरता येईल असा फॉर्म उपलब्ध करून देणेचे ठरले. २७ एच.पी. खालील यंत्रमागधारकांना स्वत:च्या मशिनरीचे स्वयंघोषणापत्र देता येईल. परंतू जे २७ एच.पी. वरील यंत्रमागधारकांना चार्टर्ड इंजिनिअर यांचे सर्टिफिकेट द्यावे लागेल. त्यानुसार २७ एच.पी. खालील व वरील यंत्रमाग उद्योजकांनी ३० एप्रिल २०२६ पूर्वी ऑनलाईन फॉर्म भरणेचे आहेत.

यासंदर्भात लवकरच दि इचलकरंजी पॉवरलुम असोसिएशन यंत्रमागधारकांना माहिती देईल व फॉर्म भरणेसाठी सर्वतोपरी मदत करेल. बैठकीस दि इचलकरंजी पॉवरलुम असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील, उपाध्यक्ष रफिक खानापूरे, संचालक सतीश कोष्टी उपस्थित होते.

## दोघांकडून अर्धा किलो गांजा हस्तगत

कोल्हापूर, ता.२७ (प्रतिनिधी) –

**कोल्हापूर शहरातील हॉकी स्टेडियम रोड परिसरात अर्धा किलो गांजा विक्रीसाठी नेत असताना जुना राजवाडा पोलीस ठाणे यांच्या पथकाने सापळा रचून दोघांना अटक केली.**

कुणाल किरण सांगवडेकर (वय २५, रा. योगेश्वर कॉलनी, पाचगाव) आणि भूषण रंगराव पाटील (वय २३, रा. पोवार कॉलनी, पाचगाव) अशी अटक करण्यात आलेल्या संशयितांची नावे आहेत. पोलिसांनी दोघांकडून सुमारे अर्धा किलो वजनाचा गांजा तसेच मोबाईल फोन जप्त केले आहेत.कुणाल आणि भूषण हे दोघे दुचाकीच्या डिकीत गांजा घेवून विक्रीसाठी जाणार असल्याचे पोलिसांना कळाले होते. पोलिसांनी सापळा रचून त्यांना पकडले. दोन्ही आरोपींकडून मोबाईल, अर्धा किलो वजनाचा गांजा मिळून आला.

# सर्वांग सुंदर कागल बनविण्यासाठी विविध विकासात्मक कामांना मंजुरी

कागल,ता.२७ (प्रतिनिधी)–

**पर्यटन,आरोग्य,शिक्षण,महिलांचे विविध प्रश्न, पाणी,रस्ते,बॅनर व खोकी मुक्त शहर,पार्किंग व्यवस्थेसाठी ट्युईंग व्हॅन घेणे आदी विकासात्मक कामांवर चर्चा झाली.पटलावरील पंधरा विषयांना एकमताने मंजुरी मिळाली. पालिकेची सर्वसाधारण सभा श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात नगराध्यक्ष सविता माने यांच्या अध्यक्षतेखाली झाली.**

जागतिक महिला दिन ८ मार्च रोजी आहे. त्या अनुषंगाने महिला व बालकल्याणसाठी विविध कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. त्यासाठी आर्थिक तरतूद करावी, अशी मागणी सारिका बारड यांनी केली.

बॅनर मुक्त कागल शहर करणार असल्याने ठाकरे चौक ते बस स्टॅन्ड, बस स्टॅन्ड ते निपाणी रस्त्यादरम्यान बॅनर लावण्यास परवानगी देऊ नये अशी मागणी अमित पिष्टे यांनी केली. शहरात बॅनर लावण्या ऐवजी डिजिटल स्क्रीनचा वापर करावा. त्यातून पालिकेचे उत्पन्न वाढेल, अशी मागणी बहुतांशी नगरसेवकांनी केली.त्यास मंजुरी देण्यात आली.

खर्डेकर चौकात बसविण्यात येत असलेली खोकी काढावीत, अशी मागणी दीपक मगर यांनी केली. खोकी ठेवणार असाल तर तो भाग माझ्या प्रभागात येतो. माझ्या प्रभागातील लोकांना न्याय द्यावा, अशी टिपण्णी नगरसेविका स्वरूपा जकाते यांनी केली.

वैशिष्ठ्यपूर्ण योजनेतून उद्यानांची विभागीय स्तरावर स्पर्धा असल्याने प्रथम क्रमांकास पाच कोटी रूपयांचा निधी मंजूर केला जाणार आहे. सुंदर उद्यान करण्यासाठी मंजुरी दिली.















## जाहीर नोटीस



आमचे अशिल **१) श्री.चंद्रशेखर बसवराज तेलसंग** व २) **श्री अरूण बसवराज तेलसंग,** रा. खासबाग, बेळगाव यांनी दिलेल्या माहितीनुसार तमाम लोकांना कळविण्यात येते की,

जि. कोल्हापूर, ता. शिरोळ, इचलकरंजीजवळ यड्राव गावातील पार्वती इंडस्ट्रीयल इस्टेटमधील, सेक्टर जी फेज ५, गट नं ७० मधील औद्योगिक वसाहतीतील प्लॉट नं. ४४ व ४५ क्षेत्र ९०० स्के. मीटर्स यामधील औद्योगीक कारखाना, दुमजली आरसीसी इमारत व त्यातील १२ टेक्स्टाईल मशिनरी (NP) यांची चकबंदी पूर्वेस- प्लॉट नं. ४९, पश्चिम- प्लॉट नं ४६, उत्तर-रोड व दक्षिण- प्लॉट नं २८ व २९ सदर चकबंदीमधील मिळकतीचे आमचे अशील सामायिक मालक व कब्जेदार असून त्यांच्या वहिवाटीत आहे, तसेच सदर मिळकतीबद्दल व आमच्या अशिलांच्या घराण्याचा वाडवडिलार्जित व एकत्रित इतर कुटूंब मिळकती व व्यवसायबद्दल सरस नीरस वाटणीकरिता श्री सोमशेखर बसवराज तेलसंग व इतर, रा. बेळगाव यांच्याविरूद्ध आमचे अशिल व इतर यांनी मे. चतुर्थ अतिरिक्त सिनीयर दिवाणी न्यायालय बेळगाव येथे अस्सल दावा नं. ६९/२०२१ हे प्रकरण सदर मिळकतीबद्दल सरस नीरस वाटणी व इतर मागणीकरिता दाखल केले असून सदरी दाव्यामध्ये तुर्तातुर्त मनाई अर्ज १ ते ३ च्या आदेशाविरूद्ध मे. कर्नाटक उच्च न्यायालय , धारवाड येथे MFA. १००३७५/२०२३ (CPC.),C/W. MFA.१००३९९/२०२३ व MFA.१००४१६/२०२३ अपील प्रतिवादी विरूद्ध दाखल, करून सदरी अपीलमधील अंतिम आदेशानुसार सदरी मिळकतीची विल्हेवाट लावू नये. असा मनाई आदेश प्रतिवादी विरूद्ध बजाविला आहे. व सदरी वाटणी दावा विचारधीन आहे. अशी सत्य परिस्थिती असताना श्री. सोमशेखर बसवराज तेलसंग हे लोकांची दिशाभूल करून आमच्या अशिलांचा हक्क डावलून वर नमूदीत सदर मिळकत व त्यातील मशिनरीबद्दल परस्पर गैरव्यवहार करून विल्हेवाट लावण्याच्या खटपटीत आहेत. असे खात्रीलायक वृत्त समजते, तरी कोणीही वर नमूदीत सदर मिळकतीबाबत श्री. सोमशेखर बसवराज तेलसंग व त्यांच्या वतीने अन्य कोणाशीही कुठल्याही प्रकारचा खरेदी करार, खरेदी, बक्षीस, लीज, गहाणवट व इतर अन्य प्रकारे व्यवहार करू नये व केल्यास सदरहू व्यवहार बेकायदेशीर ठरेल व आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, म्हणून दिली जाहीर नोटीस.

**ॲड.रूपेश.जी.जाधव**

सोम–मुक्ताई, शास्त्री नगर, ४ था क्रॉस, बेळगावी,
मो.नं. ९८४५९२५९३२

# आयपीएलचे वेळापत्रक बदलण्याची शक्यता

## २६ ऐवजी २८ मार्चला पहिला सामना?

नवी दिल्ली,ता.२७–

**विधानसभा निवडणुकांमुळे आयपीएल २०२६ चे वेळापत्रक बदलू शकते. अहवालानुसार, स्पर्धेची सुरुवात आता २६ मार्चऐवजी २८ मार्च रोजी होऊ शकते. तथापि, बीसीसीआयने अद्याप नवीन तारखेवर अंतिम निर्णय घेतलेला नाही.**

तामिळनाडू, केरळ, आसाम, पश्चिम बंगाल आणि पुद्दुचेरीमध्ये होणाऱ्या निवडणूक कार्यक्रमामुळे काही शहरांमध्ये सुरक्षा आणि लॉजिस्टिक्सचे आव्हान उभे राहू शकते. याच संभाव्य संघर्षामुळे बोर्ड सुरुवातीच्या सामन्यांची तारीख पुढे ढकलण्याचा विचार करू शकते.

विधानसभा निवडणुका असलेल्या राज्यांमध्ये तीन प्रमुख स्टेडियम आहेत,जे आयपीएलच्या ठिकाणांसाठी वापरले जात आहेत. तामिळनाडूच्या चेन्नई येथील एम. ए. चिदंबरम स्टेडियम (चेपॉक) चेन्नई सुपर किंग्सचे होम ग्राउंड आहे. पश्चिम बंगालच्या कोलकाता येथे असलेले ईडन गार्डन्स हे कोलकाता नाइट रायडर्सचे घरचे मैदान आहे, तर आसाममधील गुवाहाटी येथे असलेले बारसापारा क्रिकेट स्टेडियम हे राजस्थान रॉयल्सचे दुसरे होम वेन्यू राहिले आहे.

२००८ मध्ये आयपीएल सुरू झाल्यापासून, जेव्हा जेव्हा देशात सार्वत्रिक निवडणुका (२००९, २०१४, २०१९ आणि २०२४) किंवा कोणत्याही राज्यात विधानसभा निवडणुका झाल्या आहेत, तेव्हा स्पर्धेचे वेळापत्रक दोन भागांमध्ये जारी करण्यात आले आहे. त्यामुळे यावेळीही बीसीसीआय असेच करेल अशी शक्यता आहे.आयपीएल गव्हर्निंग कौन्सिल यावरही विचार करू शकते की स्पर्धेचा उद्घाटन सामना कुठे आयोजित केला जावा, कारण गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळूरू यात सहभागी होईल.

**बीसीसीआयने गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये अबू धाबी येथे झालेल्या आयपीएलच्या लिलावादरम्यान फ्रँचायझींना सांगितले होते की, हंगाम २६ मार्च ते ३१ मे पर्यंत चालेल. त्यावेळी २६ मार्चपासून सुरुवात निश्चित मानली जात होती. आता जर सुरुवातीची तारीख पुढे ढकलली गेली, तर अंतिम सामन्याच्या तारखेत बदल होईल की नाही, याबाबत अद्याप कोणतेही संकेत नाहीत.**

# अभिषेकने खेळीतून टीकाकारांची तोंडे बंद केली : गावस्कर

चेन्नई,ता.२७ –

**अभिषेक शर्माने झिम्बाब्वेविरुद्ध टी–२० विश्वचषकाच्या सुपर–८ सामन्यात शानदार अर्धशतक झळकावत दमदार पुनरागमन केले. मात्र, त्याची संयमी आणि बचावात्मक फलंदाजी पाहून भारतीय संघाचे दिग्गज फलंदाज सुनील गावस्कर आश्चर्यचकित झाले. त्यांनी म्हटले की, या खेळीने अभिषेकने टीकाकारांची तोंडे बंद केली.**

आपल्याला माहिती आहे की अभिषेक शर्मा किती गुणी फलंदाज आहे. झिम्बाब्वेविरुद्धची ५५ धावांची खेळी त्याने टीकाकारांना दिलेले योग्य उत्तर आहे. नैसर्गिक आक्रमक खेळ सुरू करण्यापूर्वी त्याने वेळ घेतला. त्याच्या फलंदाजीत शिस्त आणि नियोजन दिसत होते. ऑफ–स्पिनरचा त्याने आदर राखला,कोणताही अविचारी फटका खेळला नाही आणि शांतपणे, संयमाने डाव उभारला. त्याने काही चेंडू रोखलेदेखील. हे पाहून मला आश्चर्य वाटले, कारण आपण सहसा अभिषेकला असे खेळताना पाहत नाही.

गावस्कर म्हणाले,मला खरोखर वाटते की त्याच्यासाठी ही उत्तम शिकवण आहे. प्रत्येक क्रिकेटपटू सलग दोन–तीन सामन्यांत धावा न होण्याचा काळ अनुभवतो. महत्त्वाचे म्हणजे त्यातून तुम्ही काय शिकता. मला वाटते अभिषेकने बरेच काही शिकले आहे आणि कोलकात्यात वेस्ट इंडिजविरुद्ध होणाऱ्या महत्त्वाच्या सामन्यात त्याचा फायदा होईल.



नगरसेवक रवी रजपुते यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीराप्रसंगी रक्तदात्यांना प्रमाणपत्र देताना युवा नेते रोहित रजपुते सोबत दिलीप मुथा व इतर.

* मेक्सिको,ता.२७–

**अर्जेंटिनाचा विश्वचषक विजेता कर्णधार लिओनेल मेस्सीने कारकिर्दीतील आणि वैयक्तिक आयुष्यातील अनेक महत्त्वाच्या पैलूंवर प्रकाशझोत टाकत लहानपणी इंग्रजी न शिकणे हा सर्वात मोठा पश्चात्ताप वाटतो. कारकिर्दीदरम्यान मला जगातील अनेक मोठ्या व प्रभावशाली व्यक्तींना भेटण्याची संधी मिळाली, पण भाषेच्या कमतरतेमुळे त्यांच्याशी संवाद साधू शकलो नाही. अशा भावना व्यक्त केल्या.**

### राष्ट्रीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत

# मंडलिक कुस्ती संकुलच्या ज्ञानेश्वरी पाटीलला कांस्यपदक

मुरगूड ता.२७ (प्रतिनिधी)–

**सेलम (तामिळनाडू ) येथे झालेल्या १५ वर्षाखालील राष्ट्रीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत मुरगूडच्या लोकनेते सदाशिवराव मंडलिक राष्ट्रीय कुस्ती संकुलची मल्ल ज्ञानेश्वरी यल्लाप्पा पाटील हिने ६६ किलो वजन गटात कांस्यपदक पटकावले.**

ज्ञानेश्वरीने पहिल्या कुस्तीत कर्नाटकच्या अन्विता लारे हिला १०–० अशा गुण फरकाने पराभूत करून दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. यात ज्ञानेश्वरीने गुजरातच्या राजकमल हिला चितपट करत उपांत्यफेरीमध्ये धडक मारली.उपांत्य फेरीत ज्ञानेश्वरी व उत्तर प्रदेशची आनुशिला यांच्यात झालेल्या अटीतटीच्या कुस्तीत आनुशिलाने अनुभवाच्या जोरावर ज्ञानेश्वरीला ८–६ अशा गुण फरकाने पराभूत केले. रिपॅचेस नियमाप्रमाणे ज्ञानेश्वरीला पुन्हा एकदा कांस्यपदकाच्या लढतीची संधी मिळाली व तिने त्या कांस्य पदकाच्या लढतीत केरळच्या निहिराला चितपट करत कांस्यपदक पटकावले.ज्ञानेश्वरीचे राष्ट्रीय स्पर्धेतील हे पहिलेच पदक आहे. या पदकामुळे ज्ञानेश्वरीला या वर्षात होणाऱ्या आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेच्या निवड चाचणीसाठी व भारतीय कुस्ती संघाच्या शिबिरासाठी संधी मिळाली आहे.

तसेच या स्पर्धेत लोकनेते सदाशिवराव मंडलिक राष्ट्रीय कुस्ती संकुलची सोनाक्षी कदम हिने ५४ किलो वजन गटात चांगल्या कुस्त्या करत ४ थे स्थान प्राप्त केले. ज्ञानेश्वरी पाटील व सोनाक्षी कदम यांना राष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षक दादासो लवटे व दयानंद खतकर यांच्याकडून मार्गदर्शन तर संकुलचे प्रमुख माजी खासदार संजय मंडलिक, कार्याध्यक्ष विरेंद्र मंडलिक, प्रशांत अथणी व समन्वयक चंद्रकांत चव्हाण यांच्याकडून प्रोत्साहन मिळाले.



**राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेतील कांस्यपदकासह ज्ञानेश्वरी पाटील व सोबत मार्गदर्शक दादासो लवटे**

**वारजे येथे झालेल्या १५ वर्षाखालील राज्य निवड चाचणीतून मुरगूड येथील लोकनेते सदाशिवराव मंडलिक राष्ट्रीय साई कुस्ती संकुलची सोनाक्षी अर्जुन कदम हिने ५४ किलो वजन गटात तर ज्ञानेश्वरी यल्लाप्पा पाटील हिने ६६ किलो वजन गटात सुवर्णपदक मिळविले होते.दोघींनी सातारा, सांगली, पुणे, सोलापूर या जिल्ह्यातील प्रतिस्पर्धी कुस्तीगीरांना आपापल्या गटामध्ये पराभूत करून राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी स्थान मिळवले. झाल्या. या दोघीही विजयमाला मंडलिक गर्ल्स हायस्कूलमध्ये इयत्ता दहावीत शिकत आहेत.**

# नगरसेवक रवी रजपुते यांच्या वाढदिनी रक्तदान शिबिरास प्रतिसाद

इचलकरंजी,ता.२७–

**माजी उपनगराध्यक्ष आणि महापालिकेचे नगरसेवक रवी साहेबजी रजपुते यांच्या वाढदिवसानिमित्त कामगार चाळीजवळ जनसंपर्क कार्यालयसमोर भव्य रक्तदान शिबिर आयोजित केले होते. त्यामध्ये २५०रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. रक्तदानाच्या या विधायक उपक्रमास चालना मिळावी, यासाठी रक्तदात्यांना आकर्षक भेटवस्तू प्रदान करण्यात आले.**

रवी रजपूते यांच्या वाढदिवसासह छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून प्रत्येक वर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते. चालू वर्षीही रक्तदान शिबिरास चांगला प्रतिसाद मिळाला.नगरसेवक रवी रजपूते हे पूर्ण नियोजित कार्यक्रमामुळे परगावी गेल्यामुळे त्यांचे चिरंजीव व युवा नेते रोहित रजपुते यांनी शुभेच्छांचा स्वीकार केला.

शिबिराला भेटी देणाऱ्यांत तानाजी पोवार, नूतन मुथा, दिलीप मुथा,मनोज साळुंखे, संतोष बागेवाडी, राजेश रजपुते, प्रशांत कांबळे,करण मुथा, किरण पवार, मनोहर कांबळे, नितेश रजपुते,भैय्या गाताडे, सुधाकर कांबळे,संतोष रेडेकर, संजय माने, नारायण यरगुंटला, श्रीनिवास फुलपाटी, उत्तरेश्वर कांबळे, तानाजी अनंतपुरे, नरेश सावंत, रॉबिन कांबळे,सोनू रजपूत,नितीन गुलफागे, बबन कांबळे,कुणाल जावळे, राजू कांबळे,सुनील प्रताप, दीपक कांबळे, अमर कांबळे,प्रवीण चव्हाण, विनोद कांबळे, शंकर वराळे, अशोक कांबळे,सोनू वराळे,शुभम कंगने, चिन्या वराळे यांचा समावेश होता.

# जुना बुधवार,उत्तरेश्वर,खंडोबा विजयी

कोल्हापूर,ता.२७(प्रतिनिधी)–

**संयुक्त जुना बुधवार पेठ सेवाभावी संस्था आयोजित राजेश चषक फुटबॉल स्पर्धेत शुक्रवारी झालेल्या सामन्यात संयुक्त जुना बुधवार पेठने मर्दानी खेळाचा आखाडा तालीम मंडळवर ४–० गोलने तर उत्तरेश्वर प्रासादिक वाघाची तालीम मंडळने संध्यामठ तरुण मंडळवर २–१ने तसेच खंडोबा तालीम मंडळने फुलेवाडी फुटबॉल क्रीडा मंडळवर २–१ गोलने विजय मिळवला.**

जुना बुधवारने मर्दानी खेळाचा आखाडावर ४–० असा एकतर्फी विजय मिळवला. पूर्वार्धातील ४० मिनिटे गोलफलक कोराच राहिला. अखेर जादावेळेत सचिन मोरेने गोल नोंदवून जुना बुधवारला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर उत्तरार्धात मयूर सुतारच्या पासवर संकेत कांबळेने ५८व्या मिनिटाला गोल करत संघाची आघाडी २–० अशी केली. ६१व्या मिनिटास देवराज जाधवने गोल नोंदवून आघाडी ३–० अशी भक्कम केली. एका चढाईत मर्दानी खेळाचा आखाड्याच्या गोलक्षेत्रात संदीप पोवारचा हॅण्डबॉल झाल्याने मुख्यपंचानी जुना बुधवारला पेनल्टी किक दिली. त्यावर मयूर सुतारने अचूक गोल नोंदवला.मर्दानी खेळाचा आखाडाकडून अक्षय सरनाईक, निखिल साळोखे, पार्थ जाधव व श्रेयश मरळकर यांनी गोलसाठी केलेल्या चढाया फिनिशिंगअभावी वाया गेल्या. अखेर पूर्णवेळेत ४–०ची आघाडी राखतच जुना बुधवारने विजय मिळवला. जुना बुधवारच्या मयूर सुतारला सामनावीर म्हणून गौरविण्यात आले.दुपारच्या सत्रातील पहिल्या सामन्यात उत्तरेश्वरने संध्यामठवर २–१ने विजय मिळवला. १०व्या मिनिटाला अझर मोमीनने गोल नोंदवून उत्तरेश्वर संघाला आघाडीवर नेले. त्यानंतर २२व्या मिनिटाला शेल्टॉन पॉल याने गोल नोंदवून आघाडी २–० अशी केली. उत्तरार्धात संध्यामठकडून श्रेयस नलवडेने ४६व्या मिनिटास गोल नोंदवून आघाडी २–१ वर आणली. अखेर उर्वरित वेळेत २–१ ची आघाडी राखून उत्तरेश्वरने सामना जिंकला. शेल्टॉन पॉल सामनावीर ठरला.सकाळच्या सत्रात झालेल्या सामन्यात खंडोबाने फुलेवाडीवर २–१ ने मात केली. फुलेवाडीच्या शुभम देसाईने ३६व्या मिनिटास गोल नोंदवून संघाला आघाडी मिळवून दिली. त्या गोलची परतफेड खंडोबाच्या विष्णू टी.एम.ने जादावेळेत (४६व्या मिनिटास) करून सामना १–१ असा बरोबरीत आणला. उत्तरार्धात शहीर सिद्दीक याने ५९व्या मिनिटाला गोल करून संघाला २–१ अशी महत्वपूर्ण आघाडी मिळवून दिली. अखेर आघाडी कायम राखून खंडोबाने विजय साकारला. खंडोबाच्या विष्णू मणिकंदमला सामनावीर म्हणून गौरवण्यात आले.





मूळ क्षेत्र मेतके येथे सद्गुरू बाळूमामा भंडाऱ्यानिमित्त हजारो भक्तगणांच्या साक्षीने अश्वरिंगण सोहळा झाला. (छाया: सात्ताप्पा चव्हाण,बेनिक्रे)

# मेतकेत अश्वरिंगण सोहळा अपूर्व उत्साहात

## चिकोत्रा पंचक्रोशी भक्तीरसात चिंब : ज्ञानोबा माऊलीचा अखंड गजर

मुरगूड, ता.२७ (प्रतिनिधी)–

**कागल तालुक्यातील मेतके येथे प्रथमच बाळूमामा भंडाऱ्यामध्ये सुरू झालेला अश्वरिंगण सोहळा भक्तगणांच्या अफाट उत्साहात आणि ज्ञानोबा–माऊली...ज्ञानराज माऊली तुकारामच्या नामघोषात भक्तीमय वातावरणात झाला.**

मुळ क्षेत्र मेतके येथे श्री हालसिध्दनाथ बाळूमामा भंडारा उत्सवानिमित्त शुक्रवारी माऊलींचा अश्वरिंगण सोहळा याचि देही याचि डोळा अनुभवण्यासाठी पंचक्रोशीतून वैष्णवजन मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. श्री सद्गुरू बाळूमामा चॅरिटेबल ट्रस्ट, बाळूमामांचे भक्त व मेतके ग्रामस्थ यांच्यावतीने या सोहळ्याचे नेटके आयोजन करण्यात आले होते.

सकाळी ९ वाजता पंढरपूर येथील पायीवारीत १९४ वर्षांची समृद्ध परंपरा असणाऱ्या अजितसिंगराजे शितोळे



यांच्या अश्वांचे येथे आगमन झाले.यावेळी मंदिरात त्यांचे पूजन झाले. पंचक्रोशीतून दाखल झालेल्या दिंड्यांच्या नामघोषात हे अश्व रिंगण सोहळ्याकडे रवाना झाले.

ज्ञानोबा–माऊली...ज्ञानराज माऊली तुकारामचा नामघोष...मुख्यमार्गावर फुलघडया...रांगोळ्यांनी सजलेली अंगण...टिपेला पोहचलेला जयघोष अशा भक्तीमय वातावरणात अश्वरिंगण सोहळ्यासाठी आलेल्या शितोळे सरकार यांच्या अश्वांचे पूजन व औक्षण दारोदारी होत होते. यावेळी महिला व ग्रामस्थांनी गर्दी केली होती.

हमिदवाडा –करडयाळ मार्गावर उभे रिंगण झाले. तर गावच्या आग्नेयला भव्य पटांगणावर गोल रिंगण सोहळा पार पडला. यावेळी ज्ञानोबा माऊलीचा अखंड गजर आणि माऊली माऊली अशा नामघोषाने रिंगण सोहळा टिपेला पोहोचला होता. यामुळे दणाणून गेलेला चिकोत्रा काठ भक्तिरसात चिंब झाला होता. यावेळी श्री सद्गुरू बाळूमामा चॅरिटेबल ट्रस्टचे कार्याध्यक्ष पापा कौलवकर, नुल मठाचे मठाधिपती भगवान गिरी महाराज,अध्यक्ष राजेंद्र पाटील, ट्रस्टी पद्मजा तिवले, बाबासाहेब पाटील,दयानंद पाटील, देवाप्पा पुजारी, बळीराम मगर तसेच मेतकेसह चिकोत्रा काठावरील व परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

